UNIVERSAL LIBRARY

OU_192803

UNIVERSAL LIBRARY

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M 83|P53Bu Accession No M 4723

Author फड़के ना. सी

Title बंसी नंबर बारा 1944

This book should be returned on or before the date last marked below.

# बस नंबर बारा

( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )

( रत्ना )

प्रो. ना. सी. फडके

कमला प्रकाशन
२

एकमेव विक्रेते—रामकृष्ण बुक डेपो : मुंबई ४

मुद्रक
एम्. इ. करीम,
डिलक्स प्रिंटर्स,
व्हिक्टोरिया गार्डन
रोड, भायखळा,
मुंबई, नं. २७

*

प्रकाशक
वि. श्री. मोडक,
कमला प्रकाशन
५७५ शनिवार, पुणे २

*

द्वितीयावृत्ति
१९४४ Checked 1969

*

कमला प्रकाशन
२

या कादंबरीतील सर्व पात्रें, घटना, बसचा क्रमांक
व रेल्वेचे वेळापत्रक सर्वस्वी काल्पनिक आहे.

कादंबरीचे सर्व हक्क सुरक्षित.

# बस नंबर बारा

प्रो. ना. सी. फडके

# प्रो. फडके यांचें इतर वाङ्मय

**गोष्टी**

१ प्रो. फडके यांच्या गोष्टी भाग १ ला
२ ,, ,, ,, ,, ,, २ रा
३ लीला आणि इतर गोष्टी
४ नमुनेदार गोष्टी
५ उल्हास कथा
६ वत्सला व इतर गोष्टी
७ चंद्रा व इतर गोष्टी
८ लाडकी लक्ष्मी व इतर गोष्टी
९ माझा देश व इतर गोष्टी

**नाटकें**

१ युगांतर
२ संजीवन
३ तोतया नाटककार
४ जडावाची देवी ( २ री आ. )
५ आगलावी
६ क्षमेसाठी अपराध

**प्रबंध**

१ मानसोपचार ( २ री आ. )
२ मानसोन्नति
३ सुखाचे संसार
४ संततिनियमन
५ आजचे तरुण स्त्री-पुरुष व त्यांजपुढील प्रश्न ( २ री आ. )
६ प्रतिभासाधन ( ३ री आ. )
७ वाङ्मयविहार ( २ री आ. )
८ आधुनिक गीता ( २ री आ. )
९ मानसमंदिर
१० साहित्य व संसार ( २ री आ. )
११ आकाशवाणी ( २ री आ
१२ वेचलेले मोती
१३ टांकीचे घाव
१४ टाचाच्या फेकी
१५ माझ्या साहित्यसेवेतील स्मृति भाग १ ला ( २ री आ. )
१६ अलापागोष्ट

**ललितनिबंध**

१ गुजगोष्टी ( २ री आ. )
२ नव्या गुजगोष्टी ( २ री आ. )
३ धूम्रवलयें

**चरित्रें**

१ दादाभाई नौरोजी ( ३ री आवृत्ति )
२ टेरेन्स मॅकस्विनी
३ डी. व्हॅलेरा
४ तीन थोर देशभक्त

**व्याख्यानें**

१ गाजलेली भाषणें
२ मित्रहो !

**इंग्रजी**

1 Sex Problem in India ( 2nd Edition )
2 Psychology
3 Elements of Ethics
4 Manual of Logic ( 3rd Edition )
5 Birth Control
6 History of Philosophy

## प्रो. फडके यांच्या कादंबऱ्या--

अल्ला हो अकबर
कुलाब्याची दांडी
जादुगार
दौलत
अटकेपार
निरंजन
समरभूमि
कलंकशोभा
उद्धार
काश्मिरी गुलाब
आशा
प्रवासी
उन्माद
गुप्त प्रायश्चित्त
इंद्रधनुष्य
प्रतिज्ञा
वादळ
शाकुंतल ( सरकार जमा )
अखेरचं बंड
बस नंबर बारा

# १

आमच्या दादांना जेव्हां मी नुसतं मोघम कळविलं, कीं मला पुण्यास वऱ्यापैकीं नोकरी लागली आहे तेव्हां त्यांना साहजिकच आनंद झाला. मी कांहीं त्यांच्याशीं भांडणतंटा करून पुण्याला निघून आलों नव्हतों. परंतु दादा आणि वहिनी एका बाजूला आणि मी एका बाजूला अशा प्रकारचा मतभेदाचा सामना झालाच होता. महायुद्धामुळें प्रत्यक्ष आघाडीवर कशा प्रकारची रणधुमाळी उडाली असेल ती असो, परंतु तिकडे ती रणधुमाळी यशस्वी व्हावी यासाठीं इकडे देशांत सतरा उद्योग आणि अठरा कारखाने चालू ठेवणं सरकारला भाग होतं; आणि त्यामुळें जे आपली शारीरिक शक्ति अगर बुद्धि विकायला तयार असतील त्यांच्या-साठीं हजारों प्रकारच्या नोकऱ्या वाढून तयार होत्या. आमच्या छोट्या गांवापासून पंचवीस मैलांवर असलेल्या शहरांत रंगरूट कचेरी उघडली गेली, आणि तिथल्या शाळेच्या ड्रॉइंग-हॉलचं ऑफिस बनवून एक गांवठी साहेब लांडी विजार, दुमड-लेल्या बाह्यांचा शर्टसारखा दिसणारा कोट, आणि जाड लठ्ठ बूट असा थाट करून सकाळ संध्याकाळ बसूं लागला तेव्हां दादा आणि वहिनी या दोघांनाहि वाटूं लागलं कीं मी चटदिशीं कोणत्या तरी कचेरींत जी नोकरी मिळत असेल ती पत्करावी. त्यांना तसं वाटावं हें अगदीं साहजिक होतं. पी. डब्ल्यू. डी. खात्यांत स्टोअर कीपरची नोकरी करतां करतां आमचे दादा आतां थकले होते. त्यांना साहाजिकच वाटत होतं कीं मी आतां कुठेंतरी चिकटावं आणि त्यांच्यावरची माझी जबाबदारी संपवून टाकावी. परंतु कारकुनी करण्याची माझी बिलकुल इच्छा नव्हती. त्या कामाबद्दल माझ्या मनांत अगदीं भयंकर शिसारी होती. साठ नव्हे एकशेंसाठ रुपये कुणी दिले तरी रोज दहा तास या हिशोबानं आयुष्य कारकुनींत

घालवायला माझ्या मनाची तयारी कधी होणं शक्य नव्हतं. दादा वहिनींचं बोलणं मला पटेना. माझं त्यांना समजेना. मतभेदाचा तो सामना चिघळूं लागला तेव्हां मनाशीं विचार केला कीं आतां या घरांत राहण्यांत शोभा नाहीं. पुण्यास निघून आलों. माझं नशीब चटकन उघडलं. दादांना मोघम कळविलं की मला नोकरी लागली आहे, एकदोन महिन्यांत माझा चांगला जम बसेल आणि मग माझा इथला खर्च भागवून महिना पंधरा रुपये मी तुम्हाला पाठवूं शकेन. दादांनी पत्रात लिहिलं, " तूं आपली स्वतःची आबाळ करून इकडे पैसे पाठविण्याच्या भानगडींत पडूं नकोस. अरे, मला कां पैशाची गरज आहे ? देवाच्या दयेनं पुष्कळ मिळतं आहे मला. तूं आपल्या पायांवर उभा राहिलास यांतच आम्हा दोघांनाहि फार आनंद आहे...."

'पायावर उभा' हें दादांच्या पत्रांतील शब्द वाचतांच मला हंसूं आलं. कारण मी जी नोकरी पत्करली होती ती खरोखरच दिवसभर पायावर उभं राहण्याची होती ! नुसतं उभं राहण्याची नव्हे, तर 'बस'च्या पायरीवर एक पाय ठेवून आंतल्या उभ्या दांडयाला उजव्या हातानं लोंबकळून तोल सावरण्याची नोकरी होती ती ! 'सिल्व्हर ज्युबिली' कंपनीची 'बस सर्व्हिस' पुण्यास नव्यानं सुरू झाली होती, व कंडक्टरची नोकरी मी पत्करली होती. मी अगदीं विशेष अर्थानं आपल्या पायांवर उभा होतो ! आणि म्हणूनच दादांना मी फक्त मोघम कळविलं होतं मला नोकरी लागली म्हणून. चांगला इंटरपर्यंत शिकलेला, साहित्यिक कर्म करून होतकरू लेखक म्हणून थोडाफार प्रसिद्धीस आलेला, कारकुनीचा पेशा अपमानाचा वाटतो अशा सबबीवर त्या नोकरीचा अव्हेर करून घराबाहेर पडलेला आपला धाकटा भाऊ 'बस' मधील उतारूंना तिकिटं फाडून देणारा कंडक्टर झाला आहे हें कळल्याबरोबर दादा काय म्हणतील आणि वहिनीच्या तोंडून काय काय मुक्ताफळं बाहेर पडतील याची मला पूर्ण कल्पना होती. शक्य तों आपण पत्करलेल्या नोकरीचं नक्की स्वरूप दादा—वहिनींना कळूं द्यायचं नाहीं असा मी मनाशीं बेत केला होता.

परंतु मोठमोठ्या सेनापतींची वेळापत्रकं चुकतात, मग माझ्यासारख्याची गोष्ट कशाला हवी ? एके दिवशी डेक्कन जिमखान्याच्या चौकांतून 'बस' सुटल्यावर उतारूंना तिकिटं द्यायसाठी गाडीत वर शिरून पाहतो तों कडेच्या पहिल्याच जागेवर आमच्या गावच्या सदूभाऊ कुळकर्ण्यांचा थोरला मुलगा पांडुरंग बसलेला ! त्याला पाहतांच मनांत आलं, झाला कां घात आता. त्यानं प्रथमदर्शनी मला ओळखलं नाहीं. मी मारे गळ्यांत पट्टा अडकविलेला, कोटाला बिल्ला लावलेला ! आणि जरा चावटपणानंच मी रुबाबांत विचारलं, "काय पाहुणे, कुठं जायचं ?" त्यानं चांचरत ठिकाण सांगून एक पावली काढून माझ्या हातावर ठेवली ! पण मी दुसऱ्या उतारूकडे तोंड वळविणार तोंच माझा कोट ओढून तो उद्गारला "हें रे काय ? अरे तूं ? शाबास !" मी त्याला चूप राहण्याची बोटानं खूण केली आणि आपल्या कामाला लागलो. मनाशी मात्र सारखा विचार करूं लागलों कीं हा आतां गांवी गेला की दादांच्याजवळ आपलं बेंड फोडणार. स्टेशनावर पोंचल्यानंतर दहा मिनिटं मला विश्रांति होती तेवढ्यांत पांडुरंगाला 'लक्ष्मीविलास विश्रांति-गृहां'त घेऊन गेलों, चहा, चिवडा, भजी अशी पोटभर लांच त्याला दिली, आणि त्याला बजावलं, "पांडोबा, तुमच्या धाकट्या भावाचं उत्तम चाललं आहे एवढंच दादांना सांगायचं हं !" परंतु चहापाण्याला माणसं अशीं जागत असतीं तर काय हवं होतं. पांडोबा जाऊन पुरते दहा दिवस झाले नसतील तोंच दादांचं मला पत्र आलं कीं, "ही नोकरी ताबडतोब सोड. दुसरी मिळत नसली तर घरीं निघून ये. तुला पोसणं मला कांहीं अवघड नाहीं." दादांचा तो हुकूम मी मान्य करीन हें शक्यच नव्हतं, मी त्यांना उलट कळविलं कीं, "माझ्या नोकरींत तुम्हाला वाटतं तसं वावगं कांही नाहीं. तुम्ही उगीच भलत्या समजुतीनं मनाला त्रास करून घेऊं नका."

खरंच, त्या माझ्या नोकरींत वावगं काय होतं ? उलट मला ती फार गंमतीची वाटत होती !

## बस नंबर बारा

"सिल्व्हर ज्युबिली कंपनी" च्या 'बस' गाड्या नुकत्याच सुरू झाल्या होत्या, आणि केवळ एका टांग्याच्या आधारानं जवळ दूरच्या साऱ्या हालचाली उरकण्याची पुणेकरांना पाऊणशें वर्षांची अव्याहत संवय झालेली असल्यामुळें वाहनाचा हा प्रकार प्रथम लोकांच्या कुतूहलाचा एक विषय होऊन बसला होता. बस सर्व्हिस सुरू झाली तर टांगेवाल्यांचा धंदा पार बसेल अशी पुष्कळ लोकांनी आधीं ओरड केली होती. या प्रश्नावर पुण्याच्या म्युनिसिपालटींत मोठी रणंहि माजली होतीं. आपल्या तक्रारीच्या अर्जाचा खरडा घेऊन टांगेवाल्यांचा जंगी मोर्चा विश्रामबागेवर चाल करून गेला तें दृश्यहि लोकांच्या स्मरणांतून अजून गेलेलं नव्हतं. बस सर्व्हिसच्या जन्माची अशी जरा झटापटीची नवलपूर्ण कहाणी असल्यामुळें कंपनीच्या छोटया गाडया चार मुख्य रस्त्यावरून धांवूं लागल्या तेव्हां पुणेकर मंडळी त्यांकडे निरनिराळया भावनांनी पाहूं लागली. कुणी म्हणावं, "बरं झालं बाबा, फार दिवसांची उणीव दूर झाली. आतां या टांगेवाल्यांची मिजास नको. स्टेशनावर किंवा कचेरीत जायचं असलं तर दोन आणे फेंकले की झालं काम." कुणी म्हणावं, "या काय बस गाड्या कीं थट्टा? अरे एखाद्या मजबूत घोडयानं टाप मारली तर उडून जाईल ही गाडी. कोंकणपट्टीत हाफ्टन गाड्या असतात तसलीं हीं सोंगं आमच्या शहराची शोभा पार घालविणार" आणि कुणी भविष्य करावं, "चार दिवस चालतील या गाडया. मग कोण बसतो आहे या टमरेलांत. एका वर्षभरांत या कंपनीला गाशा गुंडाळून पळ काढावा लागला नाहीं तर विचारा! अरे बकाल वस्तीची मुंबई नाही ही! हे पेशव्यांचं पुणं आहे! पंढरपुरी घोडयांचा दोनचाकी टांगा हेंच पुणेकरांचं राष्ट्रीय वाहन आहे."...अशा प्रकारें कुणी कांही कुणी कांहीं बोलावं. ज्युबिली सर्व्हिसच्या बसगाडया म्हणजे कांही दिवस अस्सल पुणेरी जिज्ञासेचा आणि चर्चेचा एकच विषय होऊन राहिला होता.

आम्हां नोकर लोकांना कंपनीच्या नवेपणाचे कांहीं तोटे सोसावे लागत होते तर कित्येक फायदेहि मिळत होते. मुख्य तोटा असा की, पगार बेताचा

होता आणि नोकरीची शाश्वति नव्हती. शिवाय कोणत्या नोकराचं कोणतं काम याबद्दल रेखीव नियम अजून झाले नव्हते. कंपनीच्या एकंदर कारभाराला अजून अगदी शिस्तशीर स्वरूप यायचं होतं त्यामुळे गोंधळ अव्यवस्था इत्यादि प्रकार वरचेवर होत. परंतु या गोष्टीचाच एक फायदा होता. निदान मला तरी तो फायदा वाटत असे. कंडक्टर लोकांचे युनिफॉर्म अजुन शिवून तयार व्हायचे होते. त्यामुळे आम्ही आपल्या नेहमीच्या साध्या पोशाखांतच काम करीत असू. पुष्कळ वेळां उतारूंनी मला म्हणावं, " असे लोंबकळत पायरीवर कां उभे राहतां हो ? या की आंत. बसा. जागा आहे "; आणि मग त्यांना मी तिकिट देऊं लागलो कीं, त्यांनी वरमल्यासारखं स्वतःशी उद्गारावं " असं होय ! " बस् थांबण्याच्या जागा अजून पक्क्या झाल्या नव्हत्या. त्यामुळे कुणी कुठेहि बस थांबवायला सांगून उतरावं अगर चढावं असा प्रकार चाले. आमच्या अंगावर युनिफॉर्म नसल्यामुळें उतारुमंडळी आमच्याशीं दोस्तीच्या गप्पागोष्टी करीत. लोकांना विशेषतः आमच्या पगाराबद्दल जिज्ञासा असलेली दिसे. कंपनीला पेट्रोल काय भावानं मिळतं, एका दिवसात एका बस्वर पेट्रोलचा खर्च किती येतो आणखी कंपनीला तिकिटांचं उत्पन्न किती होतं, याबद्दलच्याहि चौकशा उतारू माझ्याजवळ करीत. कित्येकांनी तर माझं नांव गांव विचारावं, आणि मी जातीनं कोण आहे, शिक्षण किती झालं आहे अशी विचारपूस देखील करावी. पुण्याच्या एका मोठ्या हायस्कूलमधले एक मास्तर लेखक म्हणून नावाजलेले होते. ते एके दिवशी बस्मध्ये चढून बसले तेव्हां त्यांना तिकिट देतां देता मी नमस्कार केला व हंसून म्हटलं " आपल्याला ओळखतो मी. " " असं का ? " असं म्हणून त्यांनी माझी चौकशी केली, व मग त्यांचा उतरायचा टप्पा येईपर्यंत ते आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाबद्दल माझ्याशी बोलत राहिले. त्यांच्याशी बोलण्यांत गुंतल्यामुळें दहावीस उतारू चढले, उतरले, अन् फुकट प्रवास करून गेले हे माझ्या लक्षांत आलं होतं. परंतु आमच्यावर ' चेकिंग ' करायला कंपनीनं अजून इन्स्पेक्टर न नेमल्यामुळें मी बेफिकीर होतों. शिवाय मनाशीं विचार केला, कंपनीला रुपया दीड रुपयाच्या खड्ड्यांत घालून या एका मोठ्या साहित्यिकाशीं मला परिचय करून घेतां येत

आहे तो कां सोडा ? त्यानंतर ते साहित्यिक मास्तर जेव्हां जेव्हां बस्मध्ये चढून बसत तेव्हां मला पाहिलं कीं, हंसून म्हणत " तुम्हींच आहांत कां आम्हाला न्यायला ? ठीक." आणि मग मराठी साहित्याच्या आघाडीवरच्या सगळ्या ताज्या बातम्या ते मला पुरवीत. त्यांना मी तिकिट कधींच देत नसे. मनांतला विचार असा की, तेवढीच आपल्या हातून साहित्यसेवा घडत आहे. यामुळें ते मास्तर इतर बसमध्यें कधीं न शिरतां मी पायरीवर उभा आहे अशी खात्री करून घेऊन मगच बसमध्ये चढूं लागले. दोन चार वेळां तर आपली बायको, चार पोरं, दोन मेहुण्या अशा सरंजामासकट त्यांनीं स्वाराच्या गेटापासून तों भांबुर्ड्यापर्यंत माझ्या गाडीतून संध्याकाळची सफर काढली. ही माझी साहित्य-सेवा किती दिवस चालली असती व त्या मास्तरांनीं तिचं प्रमाण किती वाढविलं असतं कुणास ठाऊक ? पण मग कंपनीचे इन्स्पेक्टर्स नेमले गेले, आणि माझी ती अल्पशी साहित्यसेवा संपुष्टांत आली !

परंतु असं झालं तरी या माझ्या नोकरींत मी ज्या गोष्टीमुळे रमलों होतों ती कायमच होती. ती ही की, रोज शें पांचशे माणसं मी ज्या गाडीवर होतों तिच्यांत प्रवास करीत होतीं, मनुष्यस्वभावाचे अनेकविध नमुने मला पहायला मिळत होते, उतारूंच्या आपापसांतल्या संभाषणांवरून गांवातल्या हजार बातम्या माझ्या कानांवर पडत होत्या, दहा दहा वीस वीस मिनिटंच उतारू माझ्या समोर बसलेले असत परंतु तेवढ्यांत त्यांच्या स्वभावांच्या छटा, आणि त्यांची लहान-मोठी सुखदुःखं, त्यांच्या एकमेकांतल्या उद्गारांवरून मला थोडीफार कळत असत. जवळ जवळ पंचाण्णव टक्के उतारू उपरे असत. म्हणजे ते एकदां उत-रले की, पुन्हां कधीं दृष्टिस पडत नसत. परंतु पांच टक्के उतारू निराळ्या प्रका-रचे असत. ' कायमची गिऱ्हाइकं ' असं मी त्यांना आपल्या मनाशी नांव दिलं होतं. ही माणसं दिवसाच्या कोणत्या प्रहरीं कोणत्या टप्प्यावर गाडींत चढणार आणि कुठें जाणार तें मला पाठ झालेलं होतं. कंपनीच्या एकंदर व्यवहाराला आतां अगदी रेखीव शिस्त लागल्यामुळे पूर्वींचं तें खेळीमेळीचं वातावरण आणि आमच्या

व उतारूं लोकांच्या गप्पा आतां बंद झाल्या होत्या. परंतु त्या बंद झाल्या असल्या तरी देखील ' कायमची गिऱ्हाइकं ' असं ज्यांचं वर्गीकरण मी केलं होतं त्यांच्यांत व माझ्यांत एक प्रकारचा आपलेपणा उत्पन्न झाला होता. एकमेकाकडे पाहण्याच्या एका विशिष्ट तऱ्हेपलीकडे तो व्यक्त होत नसे, तथापि तो आपलेपणा आहे ही गोष्ट त्या उतारूंनाहि कळे अन् मलाहि कळे. एखाद्या दिवशीं ठराविक टप्प्यावर या व्यक्तींपैकीं एखादी चढून बसली नाहीं तर तिची गैरहजेरी चटकन् माझ्या लक्षांत येई. दुसऱ्या दिवशीं तिकिट देतांना मी तिला विचारावं, " काल दिसला नाहीं ? ' तिनं उत्तर द्यावं, " हं. काल गांवाला गेलों होतों..."

मी ज्या बसवर ड्यूटीला होतों तिची डेपोपासून पहिली खेप अगदी उजाडतांच होत असे, आणि रात्रीं नऊच्या सुमाराला ती शेवटची ट्रिप करून डेपोवर परत येत असे. मला सकाळीं सहा ते बारा आणि संध्याकाळीं सहा ते नऊ अशी डयूटी याच गाडीवर असल्यामुळे तिच्या अगदीं पहिल्या व अखेरच्या अशा दोन्ही फेऱ्यांच्या वेळेस मी तिच्यावर कामाला असे. सकाळीं बरोबर ६-२० ला माझी ही बारा नंबरची गाडी हिराबागेच्या चौकांत येऊन उभी राही. आणि त्या ठिकाणीं एक व्यक्ति अगदीं नियमानं गाडींत चढण्यासाठीं हातांत एक छोटीशी बॅग घेऊन उभी राहिलेली असे. क्वचित एखादे वेळीं तिला अर्धापाव मिनिट उशीर होई. परंतु ती टप्प्याच्या खांबाशी उभी नसली तरी पुरंदरे कॉलनीच्या मोठ्या रस्त्यानं झपाझप पावलं टाकीत येत असलेली मला दिसे, आणि मग ती येईपर्यंत मी गाडी उभी करीत असे. एखादे वेळीं ती लांब असली की बस उभी राहिलेली दिसतांच हात उंच करून रुमाल हालवी, आणि मलाहि ओरडून म्हणावसं वाटे " सावकाश या. तुम्हीं आल्याशिवाय गाडी नाही सुटत "...

ती अगदीं प्रथम गाडींत चढलेली मी पाहिली तेव्हांच माझं तिच्याकडे एकदम लक्ष वेधलं होतं. अरुणोदयाच्या प्रकाशांत अगदीं शुभ्र वस्त्रं परिधान

केलेली तिची मूर्ति मला मोठी आकर्षक, गंभीर आणि सात्विक वाटली होती. तिच्या काळ्यासावळ्या रंगाला अगदी पांढरी स्वच्छ साडी आणि पांढरं स्वच्छ पोलकं असा तो पोशाख फार शोभून दिसत होता. गाडी लकडी पुलावरून जाऊं लागली तेव्हां क्षितिजावर हलकेंच डोकावणाऱ्या सूर्यबिम्बाचीं कोवळी किरणं तिच्या चेहऱ्यावर पडलीं व त्या प्रकाशांत तिचा चेहरा मला स्पष्ट दिसला. तिचं नाक, तिची जिव्हणी इत्यादि अवयव अतिशय रेखीव होते. अन् डोळे तर कांही विचारूं नका. शिवाजीनगर स्टेशनावर ती उतरली तोंपर्यंत मी वेड्यासारखं कितीदां तरी तिच्याकडे चोरून पोटभर पाहून घेत होतों. ती उतरून स्टेशनाकडे गेली, फाटकातून आंत शिरून दिसेनाशी झाली, अन् मी गाडींत परत दृष्टि टाकली त्याबरोबर मला अगदी उदास वाटलं. इतक्या सात्विक मुद्रेची, काळीसावळी असूनहि अत्यंत मोहक वाटणारी, आणि आपल्या अंतःकरणाचा साधेपणा व निर्भयपणा चालण्याच्या पद्धतीत व दृष्टीच्या कटाक्षांत-देखील व्यक्त करणारी स्त्री मी तोंपर्यंत कधीं पाहिली नव्हती. त्या दिवशी गाडीवर काम करतां करतां माझं मन सारखं तिची आठवण काढीत होतं. आपल्या दृष्टीला ती पुन्हा दिसेल काय असा प्रश्न मी स्वतःला पुनः पुनः करीत होतों. ती आपल्याला पुन्हा दिसण्याचा संभव फार कमी आहे असा विचार मनांत आला की अंतःकरण दुखल्यासारखं वाटत होतं...पण रात्रीच्या शेवटच्या खेपेस शिवाजीनगरच्या स्टेशनपुढे बस् उभी असतांना ती पुन्हा गाडींत शिरलेली मला दिसली. एकदम गाडी फुलल्यासारखं मला वाटलं. आतां गाडीत उतारूंची चांगलीच गर्दी होती. परंतु त्यांपैकीं बहुतेक डेक्कन जिमखान्यावर उतरले, आणखी दोघे चौघे टिळक मंदिरापाशीं उतरले, आणि मग तेथून हिराबागेचा चौक येईपर्यंत बस्मध्यें ती तरुण स्त्री एकटीच राहिली होती. हिराबागेच्या चौकांत बस् उभी राहतांच ती झटकन उतरली व झपाझप पावलं टाकीत पुरंदरे कॉलनीकडे निघून गेली. चांदण्याच्या प्रकाशांत तिची मूर्ति मला क्षणभरच दिसली असेल, परंतु कितीतरी वेळ बसच्या पायरीवर उभा राहून मी पुरंदरे कॉलनीच्या बाजूला पहात राहिलों होतों !...

त्यानंतर रोज दोन वेळां तिची व माझी गांठ पडूं लागली. 'गांठ' पडूं लागली याचा अर्थ माझं तिचं कांहीं बोलणं चालणं होत असे असं नव्हे. परंतु ती माझ्या दृष्टीस पडे व तेवढ्यानंच माझ्या अंतःकरणाला मोठं सुखावल्यासारखं होई. म्हणून डोळ्यांना ती दिसणं यालाच मी 'गांठ' म्हणूं लागलों. तिनं सकाळीं ६-२० ला माझ्या गाडींत चढायचं, शिवाजी नगर स्टेशनवर उतरायचं, रात्रीं माझ्या गाडीच्या शेवटच्या खेपेस तिनं शिवाजी नगरवर गाडींत बसायचं आणि हिराबागेच्या चौकांत उतरायचं, हा नित्यक्रम ठरून गेला. ती दिसावी म्हणून माझे डोळे अगदीं उत्सुक झालेले असत. रात्रीं ती गाडींतून उतरून चालूं लागली कीं मी मनाशीं म्हणे "आतां उद्यां सकाळीं." एकदां मनाचा मोठा हिय्या करून मी तिला म्हटलं "गुड नाइट". तिनं झटकन माझ्याकडे पाहिलं व मोठ्या आर्जवी गोड शब्दांत ती म्हणाली "गुड नाईट" तसं म्हणतांना ती हंसली की नाहीं हे मी रात्रभर आपल्या मनाशीं ठरवीत होतों...

तिच्याविषयीं मला विलक्षण जिज्ञासा वाटूं लागली. तिचं नांव काय असावं, ती कुणाची कोण असावी, ती रोज कुठे जाते, कुठून परत येते, तिचं जीवन कशा प्रकारचं असेलं इत्यादि गोष्टींविषयीं माझ्या मनांत तीव्र कुतूहल निर्माण झालं. पण तिच्याशीं बोलण्याचा धीर मला करवेना. ती सकाळीं गाडींत चढे त्या वेळेस व रात्रीं उतरे त्या वेळेस गाडी बहुधा रिकामी असे. सकाळीं मी तिला तिकिट देण्यापूर्वी म्हणावं, "गुड मॉर्निंग", तिनंहि म्हणावं "गुड मॉर्निंग" आणि रात्रीं ती उतरूं लागली कीं मी म्हणावं "गुड नाइट" व तिनंहि तेच म्हणावं! परंतु यापलीकडे तिचं माझं बोलणं एका शब्दानंहि होणं शक्य नव्हतं. माझा स्वभाव अगदींच भित्रा होता असे नव्हे. परंतु तिची चर्या जरी हंसरी आणि खेळकर होती तरी तिचा स्वभाव फार सात्विक आणि गंभीर असला पाहिजे याबद्दल माझी खात्री होती. त्यामुळें तिचा मला जरा दरारा वाटे. आपण कांहीं बोलणं काढलं तर तिला तें रुचेल अशी खात्री मला कांहीं केल्या वाटत

नसे. तिच्याशीं बोलण्याची मला विलक्षण इच्छा होई, परंतु माझ्या तोंडाशीं आलेले शब्द कांहीं केल्या बाहेर पडत नसत. माझ्या दृष्टीस ती प्रथम पडली त्या गोष्टीला एक महिना होत आला तरी तिचं माझं संभाषण झालं नव्हतं, व ती मला एखाद्या रहस्यासारखीच वाटत होती !...

तिच्याविषयीं मला केवढीहि जिज्ञासा वाटली तरी ती पूर्ण करून घेण्याच्या मार्गांत माझ्या पेशाची अडचण होती हे जसं खरं, त्याचप्रमाणें हेहि खरं की तिच्याविषयीं थोडी थोडी माहिती मला हलके हलके मिळूं लागली ती माझ्या त्या पेशाचा मला फायदा मिळाला म्हणूनच. बसवरच्या कंडक्टरला उतारूंशीं वागतांना शिस्त संभाळावी लागते, एखाद्या यंत्राप्रमाणें काम करावं लागतं, ओळखदेख, खाजगी चौकशी, सलगी, इत्यादि गोष्टी वर्ज्य मानणं त्याला भाग असतं. बस कंपनीच्या कारभारांत बस म्हणजे जसं एक यंत्र त्याप्रमाणेंच बस हाकणारा ड्रायव्हर हे एक यंत्र, आणि उतारूंच्या चढण्या-उतरण्यावर देखरेख ठेवणारा आणि त्यांना तिकिटं देऊन पैसे गोळा करणारा कंडक्टर म्हणजे आणखी एक यंत्र ! कुणाच्याहि खाजगी चौकशा करण्याची त्याला बिलकुल परवानगी नसते. तुम्हीं कोण कुठले असले प्रश्न त्यानं विचा-रायचे नसतात. किंबहुना 'कुठे जायचं ?' म्हणून विचारण्यापलीकडे तोंड उघडायलाच त्याच्या पेशानं बंदी केलेली असते.

परंतु तोंड उघडतां येत नसलं तरी डोळे अन् कान उघडे ठेवण्यास आम्हांला कोणाचाहि प्रतिबंध नसतो. नको ते चेहरे पहावे लागतात व उतारूं-मधल्या नको त्या गप्पा आमच्या कानावर येत असतात, आणि कधीं कधीं वाटतं डोळे आणि कान मिटून घेतां आले तर फार बरं. शिवरामपंतांच्या थोरल्या मुलीला नवरा नांदवून घेत नसला, आबाजी देशपांड्यांच्या वाड्यांत बिऱ्हाड कांहीं केल्या टिकत नसलं, चंदुभाऊजींच्या लग्नांत मिळालेल्या आहेराचं लुगडं लौकर विटलं असलं, अगर विश्रामबागेपासला 'तो मेला दुकानदार'

महागरा असला तरी आम्हाला त्याच्याशीं काय करायचं आहे ? परंतु लोकांचा बेट्यांचा चमत्कार असा कीं या सगळ्या गोष्टी बसमध्यें निघाल्याच पाहिजेत. आणि बसमध्यें हलके बोललेलं ऐकूं येत नाही म्हणून अगदीं तारसप्तकांत त्या झाल्या पाहिजेत. 'भावबंधन' नाटकांत गडकऱ्यांनीं एके ठिकाणीं म्हटलं आहे कीं स्टेशनवरची वेटिंगरूम पाहिली की मनुष्यानं या जगात येऊन केवढी घाण माजविली आहे त्याचा प्रत्यय येतो. आमची बस म्हणजे त्या वेटिंगरूम-सारखंच एक चमत्कारीक स्थळ म्हणावं लागेल. तिच्यात् प्रवास करणारे स्त्री-पुरुष आत्तां चढतील आणि पांच मिनिटांत उतरतील. परंतु तेवढ्या पांच मिनिटांत एकमेकांशी उंच आवाजांत बोलतांबोलतां ते अशा गोष्टी बोलतील कीं ज्या एकांतांत देखील त्यांनी सहसा सांगितल्या नसत्या. या त्यांच्या बडबडीशीं आम्हाला कांहीं करायचं नसतं म्हणून आम्हीं त्या या कानानं ऐकून त्या कानानं सोडून देतों. परंतु उतारूंच्या असल्या बडबडीमुळेंच हवी असेल ती माहिती आम्हाला कधीं कधीं आपोआप मिळते. एखादा उतारू मधल्याच एखाद्या टप्प्यावर उतरला कीं त्याला थोडं फार ओळखणारे दोघे तिघे उतारू जर गाडींत असले तर त्यांची आपापसांत त्याच्याबद्दल भाषा सुरूं व्हायची हें अगदीं ठरलेलं आहे. तो माणूस उतरून जाईपर्यंत गप्प राहिलेली त्यांचीं तोंडे एकंदम खुलीं होतात, अन् त्या माणसाची क्वचित् स्तुति, बहुधा निंदा, आणि त्याच्या खाजगी गोष्टींची चर्चा जोरांत सुरूं होते. बसमधून जाणाऱ्या लोकांच्या मनाची ही प्रतिक्रिया अगदी ठरलेली असल्यामुळें कितीतरी लोकांबद्दल किती तरी माहिती आम्हाला आपोआप मिळत असते. हुशारीनं कान उघडे ठेवले म्हणजे झालं.

त्यामुळेच हिराबागेच्या चौकांत रोज सकाळीं ६–२० ला चढणाऱ्या आणि रात्रीं परत उतरणाऱ्या त्या तरुणीशीं प्रत्यक्ष बोलून तिची माहिती मिळविणं मला जसं अशक्य होतं, तसंच बाकीच्या उतारूंमध्ये अधुनमधुन तिच्या-विषयीं होणारी चर्चा माझ्या कानांवर पडावी आणि तिच्याबद्दलची माहिती मला

पर्यायानं मिळावी हे अपरिहार्य होतं. अर्थात् ही माहिती मला कधीं एकाच वेळीं सुसंगत ऐकायला मिळाली नाही परंतु एखाद्या चित्राचे मुद्दाम कोड्यासाठीं केलेले तुकडे जुळवून पहात बसलं, कीं मूळ चित्राची थोडीशी कल्पना यावी त्याप्रमाणे बसमध्यें निरनिराळ्या वेळीं कानीं आलेल्या आणि इतर लोकांनी सहज बोलण्याच्या ओघांत सांगितलेल्या विस्कळित गोष्टी मनाशीं जुळवीत बसण्याचा चाळा मी जेव्हां पुष्कळ दिवस करीत राहिलों तेव्हां तिच्याबद्दलची बरीचशी सुसंगत हकीगत मी तयार करूं शकलो. तिच्याशी एकदांहि संभाषण न करतां ती माझ्या बरीचशी परिचयाची झाली.

तिचं नांव रत्ना नाईक असं होतं. रावसाहेब बाबुराव नाईकांची ती एकुलती एक मुलगी. रावसाहेब नाईक म्हणजे पुण्यांत अनेक प्रकारांनी गाजलेली एक मोठी आसामी होऊन गेली. विडीच्या धंद्यावर त्यांनी लाखो रुपये मिळविले आणि अफाट चैनबाजी करण्यांत ते सारे घालविलेहि. जात कामाठ्याची, त्यामुळे स्वारी रंगानं अगदीं काळी कुळकुळीत होती. परंतु उणीपुरी उंची, उफाड्याचं हाडपेर, लहानपणीं आखाड्याचा षोक करून कमावलेला बांधा आणि रग, रेखीव नाकडोळे आणि पिळून पिळून वळविलेल्या जाड मिशा यामुळे स्वारी अशी दिसे, कीं पाहणाराला दराराच वाटावा. कपड्यालत्त्यांचा आणि दागिन्यांचा हव्यासहि फार. दीडवीत करवती काठाचं परीटघडी पांढरंशुभ्र धोतर, पायांत काळे कुळकुळीत पंप शू, रेशमी शर्टला उंची हिऱ्याची बटनं, हातांत सलकडीं अन् कानांत अत्तराचे फाये, असा थाट असायचा स्वारीचा. कधीं कधीं ऐन साहेबी थाटाचे कपडे ते घालीत त्यावेळी हातांतल्या सलकड्यांना रजा दिलेली असे, पण मनगटावरच्या घड्याळाची पोची सहज हजारभर रुपये किंमतीची ठरावी अशा कारागिरीची असे. सूट बूट आणि डोक्याला ऐन कोल्हापुरी धर्तीचा रेशमी फेटा अशा थाटांत सुंदर अबलक घोड्याची 'डॉग कार्ट' स्वतः हांकीत ते पुण्याच्या रस्त्यानं निघाले, कीं कित्येकजण त्याना सर्कसवाले देवलच समजत. गृहस्थानं पैशाची कधीं पर्वाच केली नाहीं. पुण्यांत गणपती उत्सवाचं वेड सुरूं झालं तेव्हां

रावसाहेब नाईकांनीं आपल्या वार्डात एक हजार रुपये खर्चून टोलेजंग मंडप उभारला, हजार दीड हजार रुपयांची आरास केली, आणि मोठमोठ्या पुढाऱ्यांची व्याख्यानं आणि गावांतल्या साऱ्या मेळ्यांचें टोलेजंग संमेलन तर भरविलंच, पण नंतर स्वतःची स्पेशल हौस म्हणून गांवांतल्या हिंदू मुसलमान सगळ्या नायकिणींची गाणीं केली अन् अखेरच्या रात्रीं तर तमाशाची झकड उडवून दिली! नाईकांचा गणपती पुणेकरांच्या दृष्टीनं सगळ्यात चागला ठरला.

सरकार दरबारीं बाबुरावांचं चांगलं वजन होतं. पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे ते एक वर्ष अध्यक्ष होते. आपल्या हातून लोकोपयोगी कामं व्हावी अशी हौस त्याना दाडगी. आणि ती करतांना त्यांना पैशाची कधीं फिकीर नसायची. आणि स्वतःच्या लहरी आणि छंद पुरविण्याचा प्रश्न असला म्हणजे तर त्यांचा खर्चिकपणा आणि हट्ट या दोहोंनाहि जी भरती येई तिला कांहीं सुमार रहात नसे. स्वतःची कोणाचीहि आवड पुरवितांना त्या आवडीच्या बरोबरीनं स्वतःच्या अहंमन्यतेचं समाधान करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. आपल्या घरीं कीर्तन करायचं झालं तर आपल्या म्हाताऱ्या आईला आनंद व्हावा हा हेतु त्यांच्या मनांत असे, परंतु त्याच्या जोडीला विचार असा कीं कीर्तनाचा असला थाट कुठें पाहिला नाहीं असं म्हणत लोकांनीं घरी जावं आणि पुढे कित्येक दिवस आठवणी काढाव्या. बालगंधर्वांच्या नाटकाला जायचं तर ते एकटे कधींच गेले नाहींत. अगदीं पुढच्या दोन सबंध रांगा रिझर्व्ह करायच्या आणि मित्रपरिवार बरोबर घेऊन जायचं असा त्यांचा खाक्या ठरलेला असे. एकदां त्याना हव्या तितक्या जागा मिळेनात तेव्हां ते चिडून गंधर्व कंपनीच्या मॅनेजरला म्हणाले होते, "आजचा स्वयंवर नाटकाचा सबंध खेळच माझ्यासाठीं आहे समजा. किती पैसे पाहिजेत सांगा." आणि असं म्हणून त्यांनीं एक हजार रुपयांच्या नोटा त्यांच्यापुढे ठेवल्या होत्या. अमुक एक गोष्ट हवी असं त्यांच्या मनानं घेतल्यावर कोणतीहि अडचण त्याना रोखूं शकत नसे. एकदा भावनगरच्या महाराजांकडे एका लग्नसमारंभासाठीं ते गेले असतांना दरबारची पुष्पा नांवाची

गायिका आणि नर्तिका दृष्टीस पडतांच ते तिच्यावर मोहित झाले. काठेवाडच्या स्त्रिया जात्याच सुंदर. त्यांतून पुष्पाचं सौंदर्य खरोखरच असामान्य होतं. कुठें भावनगरच्या दरबारांतली ती पुष्पाराणी आणि कुठें रावसाहेब बाबुराव नाईक ? बाबुरावांच्या मनांत उत्पन्न झालेला अभिलाषा कुणालाहि वेडेपणाची आणि सर्वस्वी असाध्य अशी वाटली असती. परंतु बाबुरावांच्या मनानं एकदां घेतलं की ' असाध्य ' हा शब्द मानावयास ते तयार नसत. पुष्पाराणीला त्यांनी पुण्यास आणली व आपल्याजवळ ठेवली. आणि ठेवली ती अशा थाटांत की तिला भावनगरच्या दरबाराची कधी आठवण देखील होऊं नये ! त्यांची बायको दोन वर्षांपूर्वीच मेलेली होती. त्यांना अपत्य नव्हतं. पुष्पाराणीशीं त्यांनीं लग्न केलं नाहीं, परंतु लग्नाच्या स्त्रीप्रमाणेंच त्यांनीं तिला वागवलं. तिला त्यांच्यापासून मुलगी झाली तेव्हां बारशाच्या दिवशीं रावसाहेब नाईकांनीं हत्तीवरून मिठाई वांटली आणि सतत तीन दिवस गोरगरीबांना जेवण घालून कपडे वांटले. मुलीचं नांव रत्ना असं ठेवण्यांत आलं. सारं पुणं म्हणूं लागलं कीं रावसाहेब नाईकासारखा भाग्यवान् माणूस दुसरा नसेल !

परंतु रत्ना पुरती सात आठ वर्षांची झाली नाही तोच बाबुरावांच्या सौख्याला एक अनपेक्षित आणि चमत्कारिक ग्रहण लागलं. पुष्पाराणीबद्दल भलत्याच गोष्टी लोक बोलूं लागले. पुण्याच्या एका इतिहासप्रसिद्ध सरदार घराण्यांतल्या एका तरुणाच्या नांवाशीं पुष्पराणीचं नांव जोडण्यांत येऊं लागलं. हा तरुण राव-साहेब नाईकांकडे दिवसांतून दहा वेळां येत असे हे खरं; परंतु स्वतः रावसाहेब त्याला आपल्या मुलासारखा मानीत. आणि त्याच्याबद्दल स्नेहीसोबती जेव्हां रावसाहेबांना हळूच इषारा देऊं लागले तेव्हां रावसाहेबांनी मोठमोठ्यादा हंसून तें थट्टेवारी नेलं. कधी कधी ते अगदी अश्लील बोलायला कमी करीत नसत. ते म्हणाले, " अरे, त्या सरदाराच्या पोराला पुष्पाराणीनं अंगावर पाजलं तर त्याला ठसका लागेल, आणि तुम्ही हें काय सांगतां मला त्याच्याबद्दल ? हॅट् !" परंतु हलके हलके त्यांच्या लक्षांत येऊं लागलं, की लोकांत कुजबूज होती ती

विनाकारण नव्हती. दूरच्या माणसांना ज्या गोष्टी समजतात त्या अगदी जवळच्या माणसाला जवळपणामुळेंच दिसत नाहीत हे त्यांच्या लक्षांत आलं. संशयाला जागा आहे असं त्याना वाटूं लागलं; व संशयाच्या नजरेनं ते पाहूं लागले तेव्हां पुष्पाराणीनं इमान सोडलं असल्याबद्दल त्यांची खात्रीच झाली. रावसाहेब नाईकासारख्या माणसांचे प्रेम राग द्वेषादि सगळेच विकार अनावर आणि तुफान असतात. तो तरुण सरदार पुत्र व पुष्पाराणी याच्या चोरट्या प्रेमसंबंधाचा खात्री पटल्यावर रावसाहेब नाईक दुर्दैवी प्रियकराची भूमिका पत्करून आपल्या मनाशी जळत स्वस्थ बसतील हें शक्यच नव्हतं. त्या सरदारपुत्राला लोकांनी पुष्कळ सावध केलं, की बाबा तूं एका आडदांड राक्षसाचा रोष आपल्यावर ओढवून घेणार आहेस. परंतु त्या पोराच्या डोक्यांत विचार कुठे शिल्लक राहिला होता ? पुष्पाराणीनं त्याला पुरतं पागल बनविलं होतं. परंतु लोक ओळखून होते की पुष्पाराणी जो खेळ खेळते आहे तो फार भयंकर आहे, त्यांत ती स्वतः आणि ते सरदाराचं कोवळं पोर दोघंहि पुरतीं भस्मसात् व्हायला वेळ लागणार नाहीं. आणि लोकाचा तो हिशोब खराच ठरला. एकदां ऐन पावसाळ्यांत महाबळेश्वरला जाऊन राहयची रावसाहेब नाईकांना लहर आली. त्या सरदाराच्या मुलाला त्यांनी मोठा आग्रह करून बरोबर नेलं. पुष्पाराणीची ओढ त्याला होतीच. तो गेला. दहा दिवसांनी रावसाहेब नाईक महाबळेश्वराहून एकटेच परत आले. आपण सारी जणं शिकारीला गेलो होतों, पुष्पाराणी आणि सरदारसाहेब यांच्यावर वाघीणीनं झडप घातली, आपण शिताफीनं कसेबसे बचावलों, वाघीणहि मारली, पण त्याच्या आधींच तीं दोघं बिचारी वाघिणीच्या क्रौर्याला बळी पडली होतीं, इत्यादि हकीगत ते सांगू लागले. लोकांचा तिच्यावर विश्वास बसणं कठीण होतं. परंतु रावसाहेबांना खोटं ठरविणं त्याहून कठीण होतं. लोक फक्त आपापसांत म्हणत, यांनी त्या दोघांचा खुशाल खून केला असला पाहिजे.

परंतु पुष्पाराणीच्या मृत्युपासून पूर्वीचे रावसाहेब बाबुराव नाईक लोकांना दिसेनासे झाले ते कायमचे. ते नंतर आठदहा वर्षं जगले, परंतु त्यांचा अवतार

पुष्पाराणींच्या मरणानंतर संपला तो संपलाच. त्यांची हौस, त्यांची रग, आणि त्यांची संपत्तिर्ही झपाट्यानं ओसरत गेली. अखेर त्यांचा मृत्यु झाला तेव्हां स्मशानयात्रा खूप मोठी निघाली. त्यांचं शव चितेवर ठेवल्यावर भाषणं करणाऱ्यांत सर्व पक्षांचे पुढारी होते. ज्याला इंग्रजी शिक्षणाचा गंधहि नव्हता परंतु ज्यानं मोठमोठ्या पंडितांची मैत्री जोडली होती, ज्यानं लक्ष्मी अपरंपार मिळविली परंतु तिला सदा दासीसारखीच वागविली, ज्यानं विलास भोगले परंतु कधी कुणाचा घातपात केला नाहीं, असा एक मनाचा मोठा, हाताचा उदार, पुण्याचा नमुनेदार नागरिक हरपला म्हणून सर्वांनी अश्रू ढाळले. मरणारं माणूस ज्यांना पाठीमागें टाकून जातं त्यांना असल्या सार्वजनिक अश्रुसिंचनाचा कांहीच उपयोग नसतो. स्वतःचं दुःख आवरणं तरी त्यांना त्यामुळे अधिक सोपे जात असेल की काय याबद्दल शंकाच आहे. त्यांचं माणूस गेलेलं असतं, कोणी केवढालीहि भाषणं केली अगर कितीहि लांबलचक लेख लिहीले तरी ते कांही परत येणार नसतं. ती आपापल्या दुःखात चूर असतात. रत्नाचं दुःख तर फार मोठं होतं. एखाद्या राजकन्येचेंहि कुणी करणार नाहीं असे तिच्या बापानं अगदीं पहिल्यापासून तिचे लाड केले होते. पुष्पाराणी गेल्यानंतर बाबुरावांची रंगेल वृत्ति एकदम मावळली, धंद्यांतलं लक्ष उडालं, योगायोगानं एका मागोमाग एक आंतबट्ट्याच्या ठोकराहि बसल्या, वैभव झपाट्यानं ओसरलं. तथापि रतनच्या कौतुकांत त्यांनी तिळमात्रहि अंतर पडूं दिलं नाहीं. तिला त्यांनीं उत्तमांतल्या उत्तम शाळेंत तर घातलं होतंच, परंतु घोड्यावर बसणं, पोहणं, निशाण मारणं, गाणं, वाजवणं, चित्रकला, इत्यादींचं शिक्षण अगदीं निवडक शिक्षक ठेवून तिला देण्याची व्यवस्था केली होती. 'रतन' 'रतन' अशी लाडकी हाक त्यांच्या तोंडांत अष्टौप्रहर भिजत असे, आपले अत्यंत विश्वासू म्हातारे दिवाणजी खण्डूकाका यांच्या हातांत आपल्या सतरा वर्षांच्या लाडक्या रतनचा हात देऊन "काका, हा माझा प्राण तुमच्याजवळ ठेवून मी जातों. संभाळा! रतन, काका म्हणतील तसं वाग, म्हणजे तूं सदा सुखांत राहशील" असं जेव्हां ते म्हणाले तेव्हां दुःखातिरेकानं त्यांची अवस्था

मोठी केविलवाणी झाली. त्यांचा जीव रतनभोंवती घोटाळत होता, आणि मृत्यु आपणाला दूर ओढून नेत आहे हें तर त्यांना स्पष्ट कळत होतं. भोंवताली जमलेल्या लोकांकडे वघून ते म्हणाले, "इच्छेविरुद्ध मला जावं लागत आहे. माझा नाइलाज असावा याचं दुःख जन्मांत प्रथमच अनुभवतों आहे. हे दुःख सहन होत नाही मला!" म्हातारी माणसं म्हणाली, "देवाचं नांव घ्या." परंतु तुम्ही हें काय मला वेडयासारखं सांगता अशा अर्थानं ते हंसले व 'रतन,' 'रतन' अशी लाडकी हांक मारीतच त्यांनी प्राण सोडला. रतन अगदी पोरकी झाली. आईच्या बाजून जवळचं मायेचं माणूस तर तिला कोणी नव्हतंच अन् बापाच्या आप्तांचा गोतावळा खूप होता, पण त्याचा कांही एक उपयोग नव्हता. नाईक आडनांव लावणारी निदान दहावीस कुटुंबं पुणें शहराच्या दक्षिण टोकाकडील त्या मोहोल्यांत होती. बाबुरावांनी भलं जंगी घबाड मागं ठेवलं असतं म्हणजे हा सारा गोतावळा ऊर बडवून शोकाचं प्रदर्शन करीत रतनभोवती घिरट्या घालीत राहिला असता. परंतु बाबुरावांची इस्टेट खलास झाली होती. मग ते कशासाठी रत्नाविषयी माया दाखवितील? उलट बाबुरावांशी त्यांच्या जीवंतपणी जे वैर करण्याची त्यांची छाती झाली नव्हती तें साधायची वेळ आली असं त्याना वाटलं. बाबुरावांनी पुष्पाराणीला आणून घरांत ठेवलं तेव्हां त्यांच्या जातवाल्या लोकांनी विलक्षण काहूर माजविलं होतं. त्यांना जातीतून बाहेर काढण्यापर्यंत खटपटी केल्या होत्या. बाबुराव असल्या कोल्हेकुईला काय भीक घालणार? त्यांनी आपल्या या जातभाईचा सारा विरोध मरडून काढला होता, त्या सगळ्यांच्या नाकावर टिच्चून सुख भोगलं होतं, आणि अखेर अखेर तर आपल्या लाडक्या रतनविषयी बोलताना ते म्हणत, "आमच्या जातींतल्या मुलांची गोष्ट तर राहूंच द्या, पण अगदी अस्सल चित्पावन ब्राह्मण जातीतले फक्कड विद्वान् तरुण आमच्या रतनच्या पाया पडत येतील. त्यांतल्या एकाशी लावून देईन मी तिचं लग्न. मग बसतील हे सारे दोन्ही हातानी शंख करीत. आम्हाला जातीबाहेर काढताहेत लेकाचे!" परंतु बाबुरावांनीं जन्मभर केलेलं वैर परत फेडायची संधी आता त्यांच्या जातवाल्यांना

मिळाल्यासारखी झाली. म्हातारे दिवाणजी खंडूकाका हें एकच मायेचं असं माणूस रतनला राहिलं व बाबुरावांच्या इस्टेटींपैकी आतां फक्त एक वाडा उरला होता, त्याच्या भाड्याचे महिन्यांकाठीं येणारे ५०-६० रुपये एवढाच काय तो तिला आधार उरला.

मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर रत्ना कॉलेजांत गेली नाहीं. 'सेवा सदन'-मध्यें ती शिक्षकीण व विद्यार्थिनी अशा जोड नात्यानं राहिली. इंग्रजी, मराठी इत्यादि विषय शिकवावे, डॉइंग, शिवणकाम, भरतकाम इत्यादींचे वर्गीहि घ्यावे आणि नर्सिंग सूतिकाशास्त्र याच्या परीक्षेचा अभ्यास करावा, अशी दोन तीन वर्षं तिनं काढली. खंडूकाकांचा एकुलता एक मुलगा मिळविता झाला तेव्हां त्याला ते म्हणाले, "आतां तुझा संसार तूं संभाळ" आणि ते रत्नाकडे येऊन राहिले. तिच्या बापाचं इमान त्यांनी अजून राखलं होतं. ते तिच्यावर पोटच्या मुलीपलीकडे माया करीत. तीदेखील त्यांना आपल्या सख्ख्या काकाप्रमाणें मानी. वाडा भाड्यानं दिल्यावर प्रथम रत्ना 'सेवासदना'च्या वसति-गृहांत राहिली होती. पण पुढे खंडूकाकांनी पुरंदरे कॉलनींत एक छोटासा ब्लॉक पाहिला व त्यांत रत्नाचं बिऱ्हाड थाटून देऊन ते आपणहि त्यांत राहिले. मुंबईच्या एका प्रसिद्ध डॉक्टरांनी तळेगांवला एक छोटंसं हॉस्पिटल नुकतंच काढलं होतं. त्यांना एका चांगल्या हुषार नर्स-मिड्वाईफ्ची जरूर आहे असं कळतांच खंडूकाकांनी ताबडतोब जाऊन त्यांना भेटून खटपट केली व रत्नाला ती नोकरी मिळाली.

पुरंदरे कॉलनीतून सकाळीं ६-२० ला माझ्या गाडींत बसून ती निघत असे ती या नोकरीवर जाण्यासाठींच. शिवाजी नगरवर ती पूना मेलमध्यें बसत असे व रात्रीं पुन्हां पूना मेलनंच परत येऊन शिवाजीनगर स्टेशनावर उतरून ती माझ्या गाडींत चढत असे...

मला तिची माहिती जसजशी अधिकाधिक मिळत गेली तसतशी संपूर्ण अज्ञानामुळें माझ्या मनांत उत्पन्न झालेल्या जिज्ञासेची तीव्रता साहजिकच कमी कमी होत गेली. परंतु तिच्याविषयीं मला वाटणारं आकर्षण कमी झालं नाहीं.

तिच्या येण्याकडे मी आताही नजर लावून उभा रहात असे. ती गाडीत असली कीं मला एकप्रकारचा उत्साह वाटे. तिचं उतरायचं ठिकाण जवळ आलं की मनांत एक चमत्कारिक अप्रसन्नता उत्पन्न होई. 'ही कोण असावी बरं' असं मनाशीं म्हणत आतां मी तिच्याकडे पहात नसे. परंतु तिच्याकडे शक्य तितकं पहावं अशी ओढ माझ्या नजरेला आणि अंतःकरणाला लागलेली असेच. माझ्याशीं तिचा परिचय केवळ रोज दोन वेळां तिकिट घेण्यादेण्यापुरता व सकाळी "गुड मॉर्निंग" व रात्री "गुडनाईट" म्हणण्यापुरता होता. परंतु तिला नकळत मी तिला पुष्कळच ओळखूं लागलों होतो. मी तुम्हाला चांगलं ओळखतों असा भाव कदाचित माझे डोळे तिच्याकडे ज्या ज्या वेळीं वळत त्या त्या वेळीं माझ्या नजरेत व्यक्तहि होत असेल. तिच्या ध्यानांत तो येत असेल की नाहीं कोण जाणे. तिची माझी सरळ नजरानजर फारच क्वचित होई. ती इतर उतारूंशीं कधींहि बोलत नसे. गाडीत बसल्यापासून उतरेपर्यंत ती कसलं तरी पुस्तक वाचीत राही. तिनं सरळ वर पाहिलं की तिची मुद्रा खेळकर अन् डोळे मोठे हंसरे व भावपूर्ण असल्याचं पाहणाराच्या ताबडतोब लक्षांत येण्यासारखं होतं. परंतु तसं ती कुणाकडे कधीं पहात नसे. तिचा स्वभाव सात्विक आणि गंभीर असला पाहिजे याबद्दल माझी खात्री होऊन चुकली होती. भोंवतालच्या गोष्टींत अगर माणसांत उगीचच लक्ष घालणं, दुसऱ्यांची बोलणीं ऐकणं, अगर ज्यांची ओळख नाहीं त्यांच्याशीं बोलणं तिला स्वभावतः आवडत नसावं. जणूं जगांत आपण एकट्या आहोत, आणि एकट्या आहोंत तेंच बरं आहे, असं तिनं मनाशीं ठरविलं होतं. बसमधला वेळ ती ज्या तऱ्हेनं घालवी त्यावरून ही तिची मनोवृत्ति स्पष्ट दिसण्यासारखी होती. ती सदा एकटीच असे. तिच्याबरोबर कोणीहि माणूस मला त्या तीन चार महिन्यांत कधीं दिसलं नाही...

परंतु मग एके दिवशीं एक लहानसा चमत्कार झाला!

रात्रीं नित्याप्रमाणें शिवाजीनगर स्टेशनवर उभ्या असलेल्या माझ्या गाडींत रत्ना चढली. परंतु चढतां चढतां तिनं किंचित् वळून खालीं पायरीजवळ उभ्या असलेल्या एका तरुण पुरुषाकडे पाहिलं, इतकंच नव्हे तर कांहीसं पुटपुटून

ती हंसली असा मला संशय आला. मात्र तो संशय ज्याप्रमाणें माझ्या मनांत आला त्याप्रमाणे ' छे, उगीच कांहा तरी माझी कल्पना ' असंहि माझ्या मनांत लगेच आलं. पण मग पाहतो तों तो तरुण पुरुष तिच्या मागोमाग आंत चढला आणि ती ज्या ठिकाणी बसली तिथें तिच्या शेजारीं जागा नसल्याचं दिसतांच जरा खट्टू झाल्याप्रमाणें चेहरा करून तिच्या समोरच्या बांकावर तो बसला. त्याच्या हातांत बसमधून न्यायला जरा अवजड अशी कातडयाची सूट-केस होती ती बांकाखालीं सरकविण्याचा त्यानं यत्न केला, आणि तो साधेना तेव्हां त्यानं एखाद्या इंग्रज माणसासारखे खांदे हालविले, तोंड चंबूसारखे जुळवून कांहा विचित्रच अभिनय केला, व " ऑल राइट " असं म्हणून ती सूट-केस आपल्या पायांवर उभी टेकून धरली. रत्ना एकदम मोठ्यांदा हंसली. तिच्या हंसण्याचा आवाज मी प्रथमच ऐकत होतो. इतकं निर्व्याज आणि नादमधुर हंसणं मनुष्याच्या कंठांतून बाहेर पडूं शकतं अशी मला कल्पना करतां आली नसती.

बस् चालू झाली. मी उतारूंना तिकिटं देऊं लागलो. मी रत्नापुढें उभा राहिलो व ती मांडीवरची मनीबॅग आपल्या हातांत घेऊन तिचा चाप उघडूं लागली तेव्हां मागून कुणीसा माझा कोट ओढला, आणि " अं हं. मी घेतों " असे शब्द मला ऐकूं आले. मी वळलो. त्या तरुण पुरुषानं एव्हाना सिगरेट पेटविली होती, व ती ओठाशी धरून "दोन" असं म्हणतांना त्यानं एक रुपयाची नोट माझ्यापुढे धरली होती.

तो रत्नाबरोबर आला असला पाहिजे याबद्दल आतां माझी खात्रीच झाली. आणि कां कोण जाणे त्यानं तिच्याबरोबर असावं याबद्दल मला त्याचा राग आला. माझ्या मनांत एकदम आलेल्या त्या अस्पष्ट रागाच्या उर्मीचं माझं मलाच नवल वाटलं. स्वतःशी मी किंचित् हंसलों देखील. परंतु तो राग मला मनांतून काढतां येईना. तिकिटं देण्याच्या कामांतून मोकळा झाल्यावर मी दाराजवळच्या कोपऱ्यांत उभा राहिलों तो बराचसा नाराज होऊन. त्या तरुण पुरुषाकडे मी सारखी टक लावली होती. त्याचं व रत्नाचं कांही बोलणं होतं कीं काय याकडे मी लक्ष लावलं होतं. परंतु ती दोघं एकमेकांशी कांहीं एक

बोलली नाहींत. तो सिगरेट ओढीत होता. ती नेहमी प्रमाणें पुस्तक वाचीत नव्हती. परंतु ती त्याच्याकडे पहातहि नव्हती. मान फिरवून तिनं आपलं तोंड गाडीबाहेर काढलेलं होतं. वाऱ्यानं तिचे केस सारखे उडत होते ते नीट करण्यासाठी दोन्ही कानशीलांवरून तिचा डावा हात सारखा फिरत होता.

"अच्छा, गुड नाईट" असं म्हणून हातांत सूट–केस सांवरीत तो उठला तेव्हां मी भानावर आलों. हिराबागच्या चौकाचा टप्पा इतक्यांत कसा आला, मधले टप्पे मला कळले नाहीत कीं काय, असें मनाशीं म्हणत मी गाडीच्या बाहेर नजर टाकली पाहतों तों उजव्या हाताला "डेक्कन टॉकीज"चे दिवे लकाकत होते. डेक्कन जिमखान्याचा टप्पा आला होता. या ठिकाणी हा इसम उतरणार होता तर. तीहि त्याच्या बरोबर इथेंच उतरणार होती कीं काय? पण नाहीं. तिनं उलट तिच्याशेजारची दोन माणसं उठल्यामुळे ऐसपैस बसल्या-सारखी चळवळ केली. तिनं त्या गृहस्थाला "गुड् नाईट्" असं स्पष्ट म्हटलंहि नाहीं. फक्त स्वतःशीच पुटपुटून ती किंचित् हंसली तेवढंच.

नंतर ती हिराबागेच्या चौकांत उतरली तेव्हां मी नेहमीप्रमाणे म्हटलं, "गुड नाइट्". तीहि नेहमीप्रमाणे म्हणाली, "गुड नाइट्" आणि पुरंदरे कॉलनीकडे चालत गेली.

रात्री मग माझ्या मनांत त्या तरुण गृहस्थाचा विचार राहिला नाहीं.

परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी ती स्वारी मला पुन्हां दिसली!

६–२० ला रतना माझ्या गाडींत शिरून बसली आणि गाडी डेक्कन जिमखान्याच्या चौकांत येते तों ती स्वारी वाट पहात उभीच होती! गाडींत शिरता शिरतांच तिच्याकडे बघत तो हंसून म्हणाला "गुड मॉर्निंग्." ती हंसली. त्याच्याबरोबर सामान नव्हतं. तो फक्त शिवाजीनगर स्टेशनपर्यंत तिच्याबरोबर जाण्याच्या उद्देशानं आलेला दिसला. ती उतरली तेव्हां त्याच्या-कडे पाहून म्हणाली "जातें." तो उतरला नाहीं. तो पुढें पुण्याच्या स्टेशन-पर्यंत आला.

पुन्हां रात्री रत्ना शिवाजीनगर स्टेशनवर बसमध्यें चढण्यासाठी आली तेव्हां तो तरुण गृहस्थ तिच्याबरोबर होता. त्या वेळीहि त्याच्याजवळ सामान नव्हतं. केवळ तिला भेटायसाठीं तो आला होता हे उघड होतं. तो डेक्कन जिमखान्यावर उतरला.

आणि पुन्हा तिसऱ्या दिवशी सकाळी माझी गाडी डेक्कन जिमखान्याच्या टप्प्यावर येऊन उभी राहिली तेव्हां तो त्या ठिकाणी वाट पहात उभा असलेला मला दिसला. गाडींत चढतांना तो रत्नाकडे पाहून म्हणाला, " गुड मॉर्निंग. " ती हंसली व गाडी सुरूं झाल्यावर तिनं त्याला विचारलं, " मग, काल सिनेमाला गेलां होतात कीं नाहीं ? कसा होता चित्रपट ? "

ती त्याच्याशीं बोलूं लागली होती !

त्यांचं हे सकाळ संध्याकाळ मिळून जाणं येणं पांच सहा दिवस चालूं होतं. परंतु सोमवारीं सकाळीं तो डेक्कन जिमखान्याच्या चौकांत माझ्या गाडीची वाट पहात उभा नव्हता आणि रात्रीहि भांबुर्ड्याच्या स्टेशनावर रत्ना गाडीत शिरली ती एकटीच. नंतरच्या दोन दिवसातहि तो दिसला नाही. मी मनाशी विचार करूं लागलो की तो तात्पुरता कुठे परगावी गेला होता की कायमचाच निघून गेला होता ? या तीन दिवसांत रत्ना मला जरा निराळी दिसूं लागली होती. प्रथम तीन चार महिने ती बसमधल्या कुणाहि उतारूशीं कांहींहि बोलली नव्हती. त्या तरुण माणसाच्या सहवासात तिचं ते गांभीर्य आणि अबोलपणा गेला होता. त्याच्याशी ती हंसत खेळत बोलूं लागली होती, आणि कारंज्याच्या धारा ऐन भरानं उडूं लागल्या की कारंजाच्या पात्रांतच नव्हे तर भोवताली देखील इतस्ततः त्यांचं सिंचनं व्हावं त्याप्रमाणे त्या गृहस्थाशीं मिळून मिसळून रत्ना बोलूं लागल्यावर तिच्या हंसऱ्या बोलण्यांत मध्येच एखाद दुसरं वाक्य इतराच्याहि वाट्याला येऊं लागलं. परंतु तो तरुण गृहस्थ गेला त्याबरोबर रत्नाच्या वागण्यांत व बोलण्याचालण्यात पडूं लागलेला तो फरकहि नाहीसा झाला. ती आतां पुन्हां पूर्वीप्रमाणेंच भोवतालच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करूं लागली. मात्र आतां ती पुस्तक बिस्तक कांहीं वाचीत नसे. वाच-

ण्याऐवजी ती जागच्याजागीं अगदी स्वस्थ बसून राही, व तिची दृष्टि अंतराळांत कुठेतरीं खिळल्यासारखी लागलेली असे. अगदी प्रथम तीन चार महिने ती मला अबोल वाटली होती. आतां ती नुसतीच अबोल नव्हे तर खिन्न आणि उदास असल्यासारखी मला दिसूं लागली.

तिच्या त्या नव्या उदासपणाचा अर्थ उघड होता. आणि नक्की तोच माझ्या मनाला रुचत नव्हता. ज्याच्याशी तिची नव्यानंच आणि पांचसहा दिवसांचीच ओळख झाली होती अशा तरुण गृहस्थाच्या आठवणीनं तिनं अस्वस्थ व्हावं हें मला आवडेना. वास्तविक तिच्यावर माझा असा कोणत्या प्रकारचा हक्क होता कीं तिच्या वागण्याविषयी मीं मनांत पसंती अगर नापसंती धरावी ? तिचा माझा दृढ परिचय होता असं देखील म्हणतां येण्यासारखं नव्हतं ! आणि तरी देखील जणूं तो असल्याप्रमाणे माझ्या मनांत मत्सराचा प्रादुर्भाव झाला होता कीं काय कोण जाणे. मला त्या तरुण पुरुषाचा मत्सर वाटावा हे किती चमत्कारिक असं माझ्या मनात येई तेव्हां माझं मन वाद घाली, हा मत्सर नव्हे, तर ज्या एका रूपसंपन्न सद्‌गुणी आणि सुस्वभावी मुलीला मीं माझ्या मनानं स्त्रीत्वाचा आदर्श समजूं लागलो होतों तिला कोणत्याही संकटाचा स्पर्श होऊं नये म्हणून वाटणारी ही एक प्रकारची चिंता आहे. माझ्या मनानं केलेलं हें समर्थन मला पटत असे. परंतु त्या तरुण पुरुषाकडे रत्ना आकृष्ट झाली असल्यास त्यामुळें तिच्यावर संकट येण्याचा संभव आहे अशी मीं स्वतःची समजूत कां करून घ्यावी या प्रश्नाचं उत्तर मात्र मला सांपडत नसे. केवळ अंतःप्रेरणेनं आपण पुष्कळदां अमुक गोष्ट चांगली अगर वाईट ठरवितों, त्याप्रमाणें रत्नाच्या आयुष्यांत त्या देखण्या ऐटबाज तरुण पुरुषाचा प्रवेश झालेला मला रुचत नव्हता एवढाच याचा अर्थ होता. त्याच्या जाण्यामुळें रत्नाच्या वृत्तीत व वागण्यांत दिसूं लागलेली बावरलेली खिन्नता मला आवडत नव्हती असं जर मीं रत्नाला सांगितलं असतं तर मला वेड्यांत काढून ती खचित हंसली असती ! रत्नाच कशाला कुणीही हंसलं असतं. परंतु आपल्या मनाची स्थिति हास्यास्पद आहे हें कळत असूनहि माणसाला ती कधी कधी आवरतां

येत नाहीं. माझं तसंच झालं. तो तरुण पुरुष गेला म्हणून रत्ना आपल्या मनाला त्रास करून घेत होती, आणि ती उदास झालेली दिसली म्हणून मी आपल्या मनाला त्रास करून घेत होतों. तिच्या उदास हालचालींकडे आणि खिन्न मुद्रेकडे पाहून मी पुनः पुनः स्वतःशीं इतकंच म्हणे, महिना दोन महिने असेच गेले म्हणजे ही जाईल विसरून आपल्या मनाचं दुःख, आणि पूर्वीप्रमाणंच...

परंतु मी आशा करीत होतो एक, आणि प्रत्यक्ष घडलं अगदी निराळंच !

दोन आठवडे लोटल्यावर तो तरुण पुरुष परत आला ! एके दिवशीं रात्रीं शिवाजी नगरच्या स्टेशनावर सारे उतारू बसमध्यें शिरले अशी खात्री झाल्यावर मी 'हां जाऊं द्या' असं ड्रायव्हरला म्हणून बस सोडली. इतक्यांत स्टेशनाबाहेर दोन माणसं धांवत आलेली दिसली व बस थांबविण्यासाठी त्यांनी दिलेल्या आरोळ्या माझ्या कानीं आल्या. वेगांत येऊं लागलेली बस ड्रायव्हरनं थांबवून उभी केली. धांवत धांवत बसजवळ येऊन ठेपलेल्या त्या दोन माणसांकडे पाहिल्याबरोबर मी चमकलों. त्या दोघांपैकीं एक रत्ना होती ! आणि दुसरा तो तरुण पुरुष होता ! गार्डाजवळ येऊन पोचतांच त्यानं तिच्या खाद्याखालीं हात घालून तिला वर ढकलल्यासारखं केलं, आणि मग डाव्या हातांतील सूटकेस सावरीत तो स्वतः चढला. पुन्हां सुरू होतांना बसनं थोडासा झटका खाल्ला तेव्हां त्याचा चांगलाच तोल गेला व त्याचा कोट ओढून रत्ना ओरडली, "अहो, अहो !"

"It's all right" (कांहीं नाहीं, ठीक आहे.) असं उद्गारून त्यानं आधारासाठीं तिच्या दंडाला धरल्यासारखं केलं. एकदम मिळून हंसल्याप्रमाणं तीं दोघं हंसलीं. गाडींत उतारू अगदी एकमेकाला खेटून बसले होते. त्या दोघांना उभं राहण्याखेरीज गत्यंतरच नव्हतं. जणूं हा माझाच अपराध होता अशी चर्या करून मी रत्नाकडं पाह्यलं व हंसत म्हटलं "माफ करा हं." ती फक्त हंसली व हनुवटी वर उचलून तिनं त्या तरुणाकडे पाहिलं. तिकिटांचे पैसे देतां देतां तो मला म्हणाला, "असं उभं राहण्यांतहि मौज आहे की !"

'असं' या त्याच्या एकाच शब्दांत केवढा अर्थ भरला होता तें मी समजूं शकत होतों. मी कांहीं उत्तर केलं नाही. तिकिटं देऊन झाल्यावर मी आपल्या

जागी उभा राहिलों आणि रत्नाकडे टक लावून पाहूं लागलों. तिचा पदर आणि केस वाऱ्यानं सारखे उडत होते, आणि श्वास लागल्याप्रमाणें तिचं तोंड उघडं राहिलं होतं व वक्षभाग वर खाली हालतांना स्पष्ट दिसत होता. बस गांठण्या-साठीं ती धांवली होती हे तिच्या या स्थितीचं कारण थोड्या अंशानं असेल. परंतु तिचा श्वास तिला पुरत नव्हता याचं खरं कारण हे होतं, कीं मनांतल्या मनांत झालेला आनंद तिला धड आवरतां येत नव्हता !

त्या क्षणापुरती तरी माझ्या मनांतली असूयाबुद्धि अजीबात नाहींशी झाली. रत्नाच्या चेहऱ्यावर उघड उघड दिसणारा तो आनंद इतका अपूर्व आणि निर्मळ होता कीं तो पाहिल्याबरोबर ढगांनीं दीर्घकाल आच्छादिलेलं मनोहर चंद्रबिंब बाहेर आलेलं दिसताच व्हावा तसा आल्हाद मला झाला. तिनं आपलं अंतःकरण त्या पुरुषाच्या स्वाधीन सर्वस्वी केलं होतं यांत संशय नव्हता. संपूर्णत्वानं अनुरक्त झालेल्या स्त्रीचं मुखमण्डल म्हणजे या विश्वातलं एक अत्यंत मोहक अन् पवित्र असं सौंदर्य आहे. त्या सौंदर्याची शोभा अगदीं डोळे भरून पाहण्याचं सौख्य मला त्या क्षणीं लाभलं होतं, ते पाहतां पाहतां माझ्या मनांत दुसऱ्या विचाराना जागाच राहिली नाहीं. मी फक्त त्या तरुण पुरुषाला उद्देशून मनाशी म्हटलं, ' पूर्वजन्मींचं तुझं सुकृत मोठं म्हणून हे पुष्प तुझ्या हातीं पडत आहे, ते नीट संभाळ ! कुस्करूं नकोस ! '

नंतरच्या चारसहा दिवसांत मागच्या खेपेप्रमाणेच तीं दोघं पुन्हा एकत्र दिसूं लागलीं.

मग एके दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणे ६–२० ला माझी गाडी हिराबा-गेच्या चौकांत येऊन उभी राहिली, परंतु रत्ना त्या ठिकाणीं नव्हती ! मी दूरवर दृष्टि टाकली परंतु रस्त्यानं येणारी तिची आकृति मला कुठे दिसेना ! ड्रायव्हरला सांगून मी हॉर्नचा आवाज देवविला. दोन-चार मिनिटं गाडीची खोटीहि केली. परंतु रत्ना आली नाहीं ! डेक्कन जिमखान्याच्या चौकांत तो तरुण गृहस्थहि दिसला नाहीं. त्या सबंध दिवसभर माझ्या मनाला मोठी चुटपुट लागून राहिली. मी

स्वतःच्या मनाचं पुनःपुन्हां समाधान करीत होतों कीं आज कांहीं निमित्तानं ती घरीं राहिली असेल, उद्यां नेहमीप्रमाणें ती आपल्याला दिसेल.

परंतु दुसऱ्याहि दिवशीं सकाळीं हिराबागेच्या चौकांत मी गाडी पांच मिनिटं थांबवली तरी देखील रत्ना आली नाहीं !

तिसऱ्याहि दिवशीं माझी निराशाच झाली !

आणि त्यानंतर तो तरुण पुरुष आणि रत्ना यांची अपेक्षा करण्याचं माझ्या मनानं सोडूनच दिलं. त्यांचा विषय मात्र वरचेवर मनांत येई, वाटे त्यांचं पुढें झालं तरी काय ? कधीं कधीं रत्नाच्या आठवणीनं मन अगदीं अवस्थ होई. ज्याच्याकडून तिची हकीगत ऐकावयास मिळेल असा कोणी तरी मनुष्य अकस्मात् भेटावा अशी अंतःकरणाला ओढ लागलेली असे...

परंतु ही उत्कंठा आणि अस्वस्थता असे ती माझ्या मनांतल्या मनांत. बाहेरून दिसण्यासारखा कोणताहि फरक माझ्यांत झाला नव्हता. माझं काम मी व्यवस्थित आणि चोख करीत होतों. बारा नंबरची बस आपल्या फेऱ्या वक्तशीर करीत होती. तिच्यावरचा कंडक्टर आपली डयूटी मोठ्या तत्परतेनें करीत होता. कुणी नवा उतारू गाडींत चढून बसला कीं त्याच्यापुढें जाऊन तो म्हणे " कुठें जायचं ? " आणि त्याचं उत्तर ऐकतांच तो तिकीट पुढें करी आणि मिळालेले पैसे आपल्या कातड्याच्या पिशवींत टाकी!...

# २

हॉस्पिटलच्या बैठ्या इमारतीच्या डाव्या बाजूस असलेल्या त्या फरसबंद व्हरांड्यांतून रत्नाच्या दिवसाकाठीं किती तरी फेऱ्या होत असत. परंतु कामासाठीं इकडून तिकडे जात येत असतांना तिची नजर उजव्या किंवा डाव्या बाजूस कधी वळत नसे. मोठ्या डॉक्टरांचं बोलावणं आल्यास जनरल वार्डांतून निघून त्यांच्या ऑफिसकडे जायचं, काय बोलायचं असेल तें बोलल्यानंतर त्यांनीं "हां ठीक" असं म्हटलं कीं त्यांच्या खोलींतून बाहेर पडून सरळ वॉर्डांत परत यायचं, असा तिचा क्रम चालू असे. त्यामुळें त्या दिवशीं सकाळीं प्रत्येक फेरीच्या वेळेस तिचे डोळे दक्षिणेच्या बाजूस व्हरांड्याला समांतर बांधलेल्या छोट्याशा इमारतीकडे वळूं लागले तेव्हां तिचं तिलाच एखाद्या अपराध्यासारखं वाटलं. असं पाहणं तिला कधीं माहीत नव्हतं. तिच्या स्वभावाशीं तें सर्वस्वी विसंगत होतं. आणि तरीदेखील पुनः पुनः त्या खिडकीकडे वळणारी नजर तिला आवरतां येत नव्हती. कारण अजूनपर्यंत जिचा तिला कधींहि अनुभव आला नव्हता अशी कांहीं एक चमत्कारिक पण अतिशय सुखाची अशी चलबिचल तिच्या मनांत प्रथमच झाली होती. त्या खिडकींत एक अत्यंत देखणा तरुण पुरुष उभा असलेला तिला दिसला होता, आणि आपल्याकडे तो निरखून पहात असावा अशी तिला शंका आली होती !

लोकांनीं तिच्याकडे टक लावून पहात रहावं हा अनुभव तिला कांहीं नवीन नव्हता. कुठेंहि गेलं कीं पुरुषांच्या नजरा आपल्याकडे वळतात हें तिला माहीत झालं होतं. देखण्या स्त्रीच्या ठीकाणीं स्वतःच्या सौंदर्याची जाणीव प्रथम

विशेषेंकरून उत्पन्न होते ती असल्या अनुभवानंच. परंतु आजपर्यंत असं झालं होतं कीं एखादा पुरुष आपल्याकडे सारखा बघत आहे अशी शंका आल्याबरोबर त्या पुरुषाचाच नव्हे तर एकंदर पुरुष जातीचा तिला तिटकारा येई, आणि त्याच्या त्या बघण्याला आपल्याकडून यत्किंचित्‌हि उत्तेजन मिळणार नाही अशा प्रकारें ती वागे. आज मात्र असं झालं होतं कीं तिच्याकडे बघत खिडकींत उभ्या राहिलेल्या त्या पुरुषाचा तिला मुळींच राग आला नव्हता, आणि त्याची नजर अजूनहि आपल्याकडे आहे काय तें अजमाविण्यासाठीं तिचे स्वतःचे डोळे त्या दिशेला वळत होते. पहिल्याच दृष्टिक्षेपांत तो जितका सुंदर दिसला तितका तो खरोखरच देखणा आहे काय तें ठरविण्याची उत्सुकता तिला आवरतां येत नव्हती.

त्या खिडकींत तो अगदी प्रथम तिच्या दृष्टीस पडला तेव्हां त्याची मुद्रा एखाद्या अत्यंत विस्मयचकित माणसाप्रमाणे तिला दिसली होती. तो दाढी करण्यांत गुंतलेला असावा. कारण उजव्या गालावर साबणाचा पांढराशुभ्र फेस चढविलेला, हनुवटी किंचित् उचललेली, डाव्या पंजाची चार बोटं गळ्याच्या उजव्या बाजूवर टेकलेलीं, आणि उजव्या हातांतला वस्तरा तसाच अधांतरी धरलेला, अशा स्थितींत तो तिच्या दृष्टीस पडला होता. तिच्याकडे बघून तो हंसला नव्हता. स्वतःच्या दृष्टीवर मनुष्याचा विश्वास बसत नसला म्हणजे जशी चर्या होते तशी त्याची झाली होती. तो आपल्याकडे बघत आहे हें लक्षांत आल्याबरोबर एकदम मान फिरवून रत्ना मोठ्या डॉक्टरांच्या खोलीकडे घाईघाईनं पावलं टाकीत गेली होती.

डॉक्टरांच्या खोलींतून परत मोठ्या वॉर्डाकडे ती निघाली तेव्हां डाव्या हाताच्या त्या खिडकीकडे प्राण गेला तरी बघायचं नाहीं असा तिनं निश्चय केला होता. दहा वीस पावलं टाकीपर्यंत तिनं तो पाळलाहि. ती जवळ जवळ वार्डाच्या मोठ्या दारापर्यंत आली व तिच्या मनांत आलं ' सुटलों आपण '. परंतु तितक्यात तिला वाटलं आपल्याला मागून कोणीतरी हांक मारली. तिनं वळून पाहिलं तों कुणीच दिसलं नाहीं. आपल्याला असा कसा भास झाला या कल्पनेनं तिला हंसू

आलं; आणि तें हास्य तोंडावर असतानांच तिच्या ध्यानांत येण्याच्या आधींच तिच्या डोळ्यांनीं त्या खिडकीकडे धाव घेतली. तो तरुण देखणा पुरुष अजूनहि तसाच उभा होता ! तें पाहतांच ती इतकी भांबावून गेली कीं झटकन् पुढें होऊन दाराच्या आड झाल्यावर उजवीकडे जाण्याऐवजी डाव्या बाजूच्या भिंतीलाच ती जाऊन बिलगली !

नंतर ती आपल्या कामाला लागली परंतु आपल्याकडे सारखं पाहणारे त्या देखण्या पुरुषाचे सुंदर डोळे तिच्या दृष्टीआड होईनात. तिच्या मनांत त्याचेच विचार सारखे घोळत राहिले. तो पुरुष तिच्या दृष्टीस जरी आज पडला होता तरी तो कांहीं नव्यानंच तिथें आला नव्हता हें तिला माहीत होतं. हॉस्पिटलमधले मदतनीस डॉक्टर आणि परिचारिका यांच्या बोलण्यावरून त्याची थोडी थोडी तुटक माहिती तिला झाली होती, आणि त्याला त्या ठिकाणीं आल्याला जवळ जवळ पंधरा वीस दिवस झाले होते हे तिला आतां आठवूं लागलं. त्याचं पाहणं तिच्या लक्षांत आज प्रथम आलं होतं. परंतु यापूर्वी किती दिवस तो तिच्याकडे असाच पहात राहिला असेल कोण जाणे ! ही कल्पना मनांत येतांच रत्नाला भारी शरमल्यासारखं झालं.

तें हॉस्पिटल सुमारें दहा वर्षापूर्वी तळेगावांत प्रथम उघडण्यांत आलं तेव्हां त्याचं स्वरूप अगदीं छोटं होतं. लष्करी शिपायांच्या बराकी असतात त्या धर्तीची साध्या विटांच्या भिंतींची आणि बंगलोरी कौलांच्या छपराची ती एक छोटी इमारत होती. आणि त्या ठिकाणीं अवघ्या सहा कॉट्स् ठेवलेल्या होत्या. डॉक्टर देसाई म्हणजे त्या वेळचं मुंबईतलं एक बडं प्रस्थ होतं. महिन्याकाठीं पंधरावीस हजारांचं त्यांचं प्रॅक्टिस असल्याचं लोक बोलत. वर नागपूर उमरावती पासून आणि खालीं गदग हुबळीपासून दुखणाईत लोक त्यांच्याकडून औषधोपचार व्हावा म्हणून मुंबईपर्यंत धांव घेत. पुण्याहून आणि पुण्याच्या दक्षिणेकडील गांवांहून येणाऱ्या लोकांची सोय करण्याच्या दृष्टीनं तळेगांवला एक छोटंसं हॉस्पिटल काढावं असं डॉ. देसाई यांच्या मनांत आलं. आठवड्यांतून तीन दिवस आपण तळेगांवला जाऊन काम केल्यास चांगली हवा आणि जराशी

विश्रांतिही आपल्याला मिळेल असा विचार त्यांनीं केला. त्यांच्या या अपेक्षेप्रमाणें प्रथम थोडे दिवस गोष्टी चालल्या. परंतु पुढें लवकरच या हॉस्पिटलवरहि दुखणाईतांचा तोबा उडूं लागला. पहिली बराकबजा छोटी इमारत सहा महिने झाले नाहीत तोंच वाढवावी लागली, आणि सहा वर्षांनंतर तिच्या जागीं भव्य टोलेजंग दगडी इमारत उभी राहिली. मुंबईइतकीच तळेगांवलाही डॉ. देसाईची कामापायीं धांवपळ होऊं लागली. शेवटी त्यांनी हाताखालीं दोन तरुण मदतनीस डॉक्टर ठेवले व स्वतःला थोडीशी विश्रांति मिळावी अशी व्यवस्था केली.

डॉक्टर देसाई यांच्यासारख्या बुद्धिमान, उद्योगी, आणि महत्वाकांक्षी माणसांची विश्रांतीची कल्पना सामान्य माणसाच्या कल्पनेसारखी नसते. त्यांना विश्रांति हवी असते, ती आराम खुर्चीत स्वस्थ पडण्यासाठी नव्हे, तर कोणत्या तरी नव्या कल्पनेचा अगर विषयाचा पाठलाग करण्यासाठीं हवी असते. मानसोपचार–शास्त्राचा अभ्यास करण्याची डॉ. देसाई यांची फार दिवसांची इच्छा होती. तळेगांवच्या तीन दिवसांच्या मुक्कामांत त्यांना थोडी सवड मिळूं लागली तेव्हां त्यांनीं आपली ती इच्छा पुरी करण्यास प्रारंभ केला. अभ्यास पुरा झाल्यावर त्या शास्त्राप्रमाणें उपचार करण्यासही त्यांनीं सुरवात केली. न्यूरेस्थेनिया, हिस्टेरिया, अशा रोगांच्या बाबतींत ते. उपचार विशेष यशस्वीहि होऊं लागले, आणि चार पांच वर्षांच्या अनुभवानंतर त्यांना असं वाटूं लागलं कीं वेड्या माणसांना या उपचारांनीं बरं करण्याचा आपण प्रयत्न केला तर त्यांत आपणाला यश येईल. अगदीं छोट्या प्रमाणावर प्रारंभ करण्याचं त्यांनी ठरविलं. हॉस्पिटलच्या इमारतीच्या दक्षिणेच्या बाजूस त्यांनीं एक अगदीं छोटी बैठ्या बंगल्यासारखी इमारत बांधली. त्या इमारतीवर त्यांनीं पाटी बिटी लावली नाहीं. परंतु हॉस्पिटलमधल्या सगळ्या लोकांना ठाऊक होतं मोठ्या डॉक्टरांनीं ती छोटी बंगली कशासाठीं बांधली तें, आणि सारेजण त्या बंगलीचा उल्लेख एकमेकांत 'मेंटल होम' ( डोकं बिघडलेल्यांचं घर ) असा करीत. या 'घरां'त एक गुजराती आणि एक कानडी अशा तरण्याताठ्या बायका येऊन दोन दोन तीन तीन महिन्यांत चांगल्या बऱ्या होऊन परत गेल्या होत्या, आणि त्यानंतर आतां कांहीं

दिवसांपूर्वीपासून हा तरुण देखणा पुरुष येऊन राहिला होता.

तो खरोखरच वेडा होता कीं नाहीं कोण जाणे, परंतु त्याच्यावर वेडाचा आरोप करण्यांत आला होता. आणि तोही कोणाकडून तर सरकारकडून. या आरोपाची हकीगत मोठी चमत्कारिक आणि एखाद्या कादंबरींत शोभेल अशी होती. मोठ्या डॉक्टरांनीं ती कधीं कुणाला सांगितली नव्हती. परंतु अशा हकीगती कधीं गुप्त रहात नाहींत. लोकांना त्या कशा कोण जाणे पण समजतात, व त्या समजल्या म्हणजे जणूं तोंपर्यंतच्या त्यांच्या गुप्तपणावर सूड घेण्यासाठींच कीं काय लोक त्यांचा सपाटून फैलाव करतात. तो तरुण पुरुष कोण होता, कुठला होता व सरकारनं त्याच्यावर वेडाचा आरोप कां केला होता, याबद्दलची थोडी फार माहिती कुजबुजणाऱ्या स्वरांत केलेल्या कुटाळक्यांच्या चाळण्यांतून झिरपत झिरपत हॉस्पिटलच्या झाडूवालीपर्यंत देखील पोंचली होती. रत्नाच्या कानांवर तर पुष्कळच गोष्टी आल्या होत्या.

हॉस्पिटलच्या नोंदवहींत या तरुण गृहस्थाचं नांव श्रीधर गोविंद चाफेकर असं लिहिलं गेलं होतं, परंतु मोठे डॉक्टर नेहमी 'चाफेकरसाहेब' असा त्याचा उल्लेख करीत असत, व त्याच्याविषयीं आपल्या मनांत नुसती सहानुभूतिच नव्हे तर आदरही असल्याचं त्याच्याविषयीं इतरांशीं बोलतांना व त्याच्याशीं वागतांना ते दाखवीत. 'किती झालं तरी आय्. सी. एस्. च्या परीक्षेंत पहिला नंबर मिळविण्याचा अपूर्व पराक्रम करणारी व्यक्ति आहे ही–' हे त्यांचे नेहमींचे ठरलेले उद्गार असत; आणि या उद्गारांच्या स्पष्टीकरणार्थ कधीं कधीं ते म्हणत, "ज्यांची बुद्धि विलक्षण प्रखर व असामान्य असते अशा माणसांना जग वेडंच ठरवीत असतं. त्यांच्या बुद्धीचं तेज लोकांना सहन होण्यासारखं नसतं, आणि जें कळत नाहीं व सहन होत नाहीं त्याला वेड्याच्या सदरांत ढकलणं एवढाच एक सोपा मार्ग लोकांना मोकळा असतो. हा श्रीधर चाफेकर इंग्रजी सहाव्या इयत्तेंत होता तेव्हां भूमितीचा एक सिद्धांत सिद्ध करण्याची एक स्वतंत्र नवीन रीत त्यानं काढून मास्तरांना दाखविली व युक्लिडपेक्षां आपली रीत अधिक चांगली आहे म्हणून वाद घातला तेव्हां त्या मास्तरांनीं

त्याची पाट थोपटून जास्त मार्क देण्याऐवजीं ‘ या पोराचं डोकं फिरलं आहे ’ असा शेरा मारला होता. पुढें कॉलेजांत असतांना अर्थशास्त्राच्या प्रोफेसरांचे व त्याचे नेहमीं खटके उडावे, आणि त्याची बुद्धिमत्ता आणि दांडगा व्यासंग मान्य करण्याऐवजीं त्या इंग्रज प्रोफेसरानं नेहमी म्हणावं ‘ You are crazy my young man. Take care of yourself...”

पुढें आय्. सी. एस्. च्या परीक्षेसाठीं इंग्लंडमध्यें गेल्यावरही आपल्या स्वतंत्र बुद्धीनं आणि ज्या त्या विषयांतल्या नवीन विचारसरणीनं या श्रीधरनं मोठमोठ्या नामांकित पंडितांना असेच धक्के वारंवार दिले होते. केंब्रिज येथलि युनिव्हर्सिटीच्या वादविवाद सभेंत त्यानं एकदां असा सिद्धांत प्रतिपादिला होता कीं, कलकत्त्याच्या “ ब्लॅक होल ” प्रकरणाला सत्याचा आधार मुळींच नव्हता, लुच्चया इंग्रज इतिहासकारांनीं ती एक कपोलकल्पित हाकिगत हिंदुस्थानाच्या इतिहासांत खुशाल घुसडून दिली होती. ‘ That crazy fellow Chaphekar ’ असा त्याचा उल्लेख केंब्रिज मधील इंग्रज पोरं आण कांहीं प्रोफेसरदेखील करीत असत. मात्र त्याचे कित्येक विचार अगदीं नवीन आणि सहज न पटण्यासारखे असत म्हणून युनिव्हर्सिटींतील हिंदी विद्यार्थी ‘ चक्रम चाफेकर ’ असं जरी त्याला म्हणत असत, तरी त्याची अलौकिक बुद्धि आणि जहाल देशभक्ति त्यांच्या पूर्ण परिचयाची झाली असल्यामुळें त्या सर्वांना त्याच्याबद्दल मोठा आदर असे, आणि तो पुढें नांव काढील याविषयीं त्यांना खात्री वाटे.

श्रीधर आय. सी. एस्. परीक्षेंत पहिला आला. त्याची नेमणूक गुजराथेंतल्या एका जिल्ह्याच्या जागीं झाली. त्या हुद्यावर काम करतांना त्याची लोकहिताची कळकळ दिसून यायला आणि सामान्य लोकांत त्याची लोकप्रियता वाढायला वेळ लागला नाहीं. परंतु त्याची ही वाढती लोकप्रियता वरिष्ठ अधिकाऱ्यांना सहन होण्यासारखी नव्हती. त्यांतच अशा एका गोष्टीची भर पडली कीं त्यामुळें गोऱ्या अंमलदारांनीं त्याच्यावर भयंकर जळफळूं लागावं. एका मोठ्या गोऱ्या अधिकाऱ्याची बायको श्रीधरवर फिदा झाली, तिनं त्याचा पद्धतशीर

पाठलाग केला, आणि अखेर आपला हेतु साध्यहि केला. या चोरट्या प्रेमसंबंधाबद्दल लोकांत तर चर्चा व्हावयास लागलीच, परंतु युरोपियन क्लबावरच्या करून सवरून भागलेल्या म्हाताऱ्या गोऱ्या बायकांना एकमेकींत कुजबुजून खांदे उडवायला आणि भुंवया मोडायला हा एकच विषय होऊन बसला. श्रीधरविरुद्ध गोऱ्या लोकांचे कटच होऊं लागले. परंतु श्रीधरवर भाळलेली मिसेस एलिझाबेथ मार्टिन ही मोठी जहांबाज आणि सर्वांना पुरून उरेल अशी स्त्री होती. नवऱ्याला तर तिनं गुंडाळून ठेवलं होतंच, पण कमिशनरसारख्या बड्या धेंडांची देखील तिची इतराजी ओढवून घेण्याची छाती नव्हती. श्रीधरच्या सरकारी कामांतच कांहीं तरी उणं काढल्यावांचून त्याला उडविण्याची आपली इच्छा आपल्याला पुरी करून घेतां येणार नाही ही गोष्ट त्याचे गोरे शत्रू पूर्णपणें ओळखून होते.

दुर्दैव असं कीं त्यांना हवं असं निमित्त थोड्याच अवधींत त्यांच्या हातीं लागलं. दुष्काळ पडला. या वर्षीचा सारा अजीबात माफ करावा अशी श्रीधरनं शिफारस केली. वरिष्ठ ही शिफारस निमूटपणें मंजूर करतील हें शक्यच नव्हतं. परंतु पिकांची दुर्दशा व शेतकऱ्यांची दैना श्रीधरनं स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिली होती. तो आपलं म्हणणं सोडीना. त्यानं वरिष्ठांशी नेटानं त्या प्रकरणीं कागदोंपत्रीं वाद मांडला. सरकारच्या इंपीरिअल खात्यांतल्या कुणाहि हिंदी तज्ज्ञाकडून जिल्ह्यांतल्या पिकांची पाहणी करून घ्यावी, आणि मी केलेली शिफारस न्याय्य आहे कीं नाहीं याचा निर्णय लावून घ्यावा, असं सरळ आव्हान श्रीधरनं वरिष्ठांना दिलं !

सरकारी नोकरींत असलेल्या एका पोरसवदा तरुण हिंदी माणसानं असलीं आव्हानं देण्याचं धाष्टर्य करावं हा प्रकार नोकरशाहीच्या मिरासदारांना पचण्यासारखा नव्हता. त्यांनीं वर गव्हर्नरपर्यंत तक्रार केली, कीं ज्याअर्थी एखाद्या वृत्तपत्राच्या संपादकाला शोभेल अशा प्रकारची बेजबाबदार जहाल भाषा श्रीधर गोविंद चाफेकर हा सरकारी कागदपत्रांत करतो त्याअर्थी याचा मेंदूच मुळीं बिघडलेला असला पाहिजे, आणि अशा माणसाला एका जबाबदारीच्या हुद्यावर ठेवणं फार

धोक्याचं आहे. श्रीधरनं उलट आव्हान दिलं कीं सारावसुलीच्या बाबतींत सरकारी धोरण कशा प्रकारचं असावं तें सुचविण्याचा अधिकार त्याच्यासारख्या अंमलदाराला खचित आहे, आणि त्यानं वरीष्ठांशीं कागदोपत्रीं जो वाद केला त्यांत वेडेपणाचा भाग कुठें आहे तें अवश्य दाखवून द्यावं. श्रीधरच्या जागी दुसरा कोणी लेचापेचा इसम असता तर नोकरशाहीनं त्याला केव्हांच गिळून टाकून ढेकर दिली असती. परंतु श्रीधर म्हणजे सोपं काम नव्हतं. खाल्लं तर बाधतं, टाकलं तर श्रापतं अशी श्रीधरच्या बाबतींत नोकरशाहीची स्थिति झाली. सरकारनं खरोखरच एक गुप्त कमिशन नेमलं आणि श्रीधर गोविंद चाफेकर याला मोठ्या अधिकाराच्या जागेवर ठेवण्याइतकी त्याची प्रकृति निकोप आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा निकाल करण्याची कामगिरी तीन डॉक्टरांवर सोपविली. त्यांपैकीं एकानं त्याच्या ठिकाणीं वेडेपणाची चिन्हं असल्याचा शेरा दिला, एकानं त्याची शारीरिक व मानसिक प्रकृति अगदीं उत्कृष्ट असल्याबद्दल अभिप्राय नमूद केला, आणि एकानं निश्चित मत देतां येत नाहीं असं लिहिलं. कमिशनच्या सभासदांचं मतैक्य झालं असतं तर सरकारला हवं होतं, परंतु तें झालं नाहीं म्हणून सरकारी बेत कांही अडून राहीले नाहींत. ते थोडेसे बदलण्यांत आले एवढंच. श्रीधरला नालायक ठरवून नोकरींतून बडतर्फ करण्यांत यावं अशी त्याच्या हितशत्रूंची खटपट होती. परंतु तसं करणं आतां सोपं नव्हतं. म्हणून 'तुमची स्पेशल केस करून तुम्हाला अमुक इतकं पेन्शन आम्ही देतों, तुम्ही आपखुषीनं सेवानिवृत्त व्हा' असं त्याला सांगण्यांत आलं. गोऱ्या अधिकाऱ्यांच्या कारस्थानांचा श्रीधरला वीट आला होता. तो राजीनामा देऊन मोकळा झाला व स्वतंत्र उद्योग करण्यास मुंबईस आला. एलिझाबेथ मार्टिन खुशाल नवऱ्याला सोडून मुंबईस आली व कुलाब्याला एक फ्लॅट घेऊन राहिली. परंतु पुढें चार पांच महिन्यांतच तापाच्या विकारानं ती अकस्मात् मरण पावली. तिला आपल्या मावशीकडून इस्टेट मिळालेली होती त्यांतले एक हजार पौंड तिनं आपल्या मृत्युपत्रांत श्रीधरच्या नांवानं लिहून ठेवले होते.

नोकरशाहीशीं स्वाभिमानानं झगडा करून सेवानिवृत्त झालेला एक आय.

सी. एस. म्हणून सर्व देशी वृत्तपत्रांनीं श्रीधरच्या नांवाला मोठी प्रसिद्धी दिली होती. अर्थशास्त्रांतील एक तज्ञ म्हणून त्या विषयांतले जाणते लोक त्याला ओळखूं लागले होते. मुंबईच्या एका कोट्याधिश गुजराथी व्यापाऱ्यानं त्याला आपला सल्लागार म्हणून मोठ्या पगाराची नोकरी दिली. परंतु या नोकरींतहि त्याचं आणि त्या कोट्याधीशाचं नीट पटेना. दोघांचे वारंवार तीव्र मतभेद होऊं लागले, आणि पुन्हां श्रीधरवर वेडेपणाचा शिक्का बसूं लागला. श्रीधरनं ती नोकरी सोडून दिली. त्याच सुमारास त्याची डॉ. देसाई यांच्याशीं ओळख झाली. तो एकदां डॉक्टरांना म्हाणाला "माझी प्रकृति ढांसळत चालली आहे अशी माझी मलाच शंका येते. विचारांनीं डोकं भणाणतं. हातापायांत सदा एकप्रकारचा कंप असतो. झोप उडाल्यासारखी झाली आहे. मला तुम्हीं एकदां नीट तपासून बघा तरी. आणि मला बरं करा." डॉ. देसाई त्याला म्हणाले, "तुम्हीं सारे उद्योग सोडून संपूर्ण विश्रांति घ्यावयासाठीं माझ्या तळेगांवच्या हॉस्पिटलमध्यें येऊन निवांतपणें महिना दोन महिने रहा बरं. म्हणजे तुमच्या प्रकृतिचा मला पूर्ण अभ्यास करतां येईल, आणि कांहीं विकृति आढळली तर उपचार करतां येतील." श्रीधर सारे उद्योग सोडून तळेगांवला यायला कबूल होईना. डॉक्टरांनीं पुष्कळ आग्रह करून पाहिला परंतु तो कांहीं केल्या ऐकेना. शेवटीं एके दिवशीं डॉक्टरांनीं जबरदस्तीनं त्याला आपल्या मोटारींत घातलं होतं आणि ते त्याला सरळ तळेगांवला घेऊन आले होते. तेव्हांपासून आज पंधरा वीस दिवस श्रीधर हॉस्पिटलच्या आवारांत त्या छोट्या बंगलींत राहिला होता.

वॉर्डाच्या मोठ्या दारांतनं घाईघाईनं आंत गेलेली रत्ना वेड्यासारखी डाव्या बाजूकडेच गेली. आपण नेहमीं उजव्या हाताकडे जातों, दुखणाईतांच्या कॉट्स् त्या बाजूला आहेत, इत्यादि गोष्टींचं भानच तिला उरलं नव्हतं. ती मनांतल्या मनांत विलक्षण गोंधळून गेली होती. तो तरुण देखणा पुरुष आज कित्येक दिवस आपल्याकडे निरखून पहात असला पाहिजे या कल्पनेची तिला विलक्षण लज्जा वाटली. (एखाद्या पुरुषानं तिला कुठें तरी पकडून तिचं चुंबन घेतलं असतं तर ती कांहीं अधिक भांबवून गेली नसती.)

परंतु तो पुरुष आपल्याकडे नेहमीच पहात असला पाहिजे ही तिची कल्पना खरी नव्हती. उलट या ठिकाणीं ही रूपसंपन्न तरुण स्त्री आज प्रथमच आपल्या दृष्टीस कशी पडत आहे, आपण जवळ जवळ पंधरा दिवस इथें आहोंत पण यापूर्वी हिला आपण कसं पाहिलं नाहीं असाच विचार तिच्याकडे निरखून बघतां बघतां श्रीधर मनाशीं करीत होता. तिचा मोहक बांधा, आणि तिचं डौलदार चालणं यांकडे जेव्हां दाद करतां करतां त्याचं लक्ष सहज गेलं तेव्हां त्याचे डोळे तिच्या आकृतीवर एकदम खिळले, आणि नंतर व्हरांड्यांतून पावलं टाकीत ती जरा अलिकडे आली, तिचा चेहरा त्याला अधिक स्पष्ट दिसूं लागला, आणि तिनं अकारण मान वळविल्यामुळें तिची व त्याची नजरभेट झाली, त्याबरोबर विस्मयानं त्याची अवस्था एखाद्या पुतळ्या-सारखी झाली. स्त्रीसौंदर्याचा असा नमुना त्यानं पूर्वी कधीं पाहिला नव्हता. पुरुषाचं मन एखाद्या स्त्रीकडे एकदम आकृष्ट झाल्यावर त्याच्या मनाची जी अवस्था होते तिचा अनुभव त्याला नवीन नव्हता. परंतु जलविहार करण्यासाठीं समुद्राच्या पाण्यांत शिरूं पाहणाऱ्याला धक्का मारून तीरावर पार लोटून देणाऱ्या एखाद्या लाटेसारखं हें आकर्षण उद्भवतां उद्भवतांच उचं-बळूं शकतं याची त्याला कल्पना नव्हती. तिचे मोठाले टपोरे डोळे त्याला क्षण-मात्रच दिसले, परंतु तेवढ्यांत त्यांची मोहकता त्याच्या हृदयांत इतकी खोलवर गेली कीं ती मान वळवून मोठ्या डॉक्टरांच्या खोलीकडे झटकन् गेली तेव्हां त्याला वाटलं तिच्याबरोबर आपलं हृदयहि गेलं ! आणि तिच्या दृष्टीची तेज-स्विता जशी त्याला जाणवली त्याचप्रमाणें तिच्या मुद्रेवरचा सात्विक भावहि त्याला तेवढ्या क्षणार्धात कळला ! ती व्हरांड्यांत पुन्हा येईल व आपल्या दृष्टीस पुन्हां पडेल या आशेनं तो जागच्याजागींच उभा राहिला खरा, परंतु त्याच्या मनांत सारखं येत होतं ती फार साधी आणि सात्विक आहे, ती आपल्याकडे पुन्हां पाहणार नाहीं. परंतु काय आश्चर्य ? परत जातांना ती जरी जणूं तो खिडकींत उभा असल्याचं तिच्या गांवींहि नव्हतं अशा आविर्भावानं झपाझप पावलं टाकीत गेली तरी अखेर वॉर्डाच्या दाराजवळ जातांच तिनं एकदम त्याच्याकडे

दृष्टिक्षेप केला! आणि तो करतांना ती किंचित् हंसली देखील!

मात्र त्यानंतर तो तसाच खिडकीत किती वेळ तरी उभा राहिला परंतु ती त्याला पुन्हा दिसली नाहीं. दुसऱ्या दिवशींदेखील ती व्हरांड्यांत आलेली त्याला दिसली नाहीं. त्यानं मनाशी केलेल्या हिशोबाच्या अगदीं विरुद्ध ही गोष्ट होती. तिचा त्याला चटकन् उलगडा करतां येईना. हॉस्पिटलच्या इमारतीच्या उत्तरेच्या बाजूसहि असाच एक व्हरांडा होता हें श्रीधरला माहीत नव्हतं. त्यामुळें मोठ्या डॉक्टरांच्या खोलीकडे जाण्यायेण्यासाठीं रत्नानं त्या व्हरांड्याचा उपयोग करण्यास प्रारंभ केला असेल याची शंका त्याला येण्यासारखी नव्हती. तो फक्त मनाशी आश्चर्य करीत राहिला की केवळ एका दृष्टिक्षेपांत आपल्या चित्ताभोंवती मोहाचे जबरदस्त पाश टाकणारी ती स्त्री एकदम दिसेनाशी झाली याचा अर्थ काय? संगीत सौभद्र नाटकांत अर्जुनाच्या तोंडचं 'दिसली पुनरपि गुप्त जाहली प्रिया सुभद्रा घोर वनी' असं पद त्यानं केव्हां तरी ऐकलं होतं त्याची आठवण होऊन तो स्वतःशींच थोडा हंसला. परंतु तें हंसणं लगेच नाहींसं झालं. त्या स्त्रीच्या पोशाखावरून ती हॉस्पिटलमधील परिचारिका असली पाहिजे याविषयीं संशय रहाण्यासारखा नव्हता. मग ती पुन्हां मुळीं दिसेचना याचा अर्थ काय? तिला पुन्हां पाहण्यासाठीं त्याचं मन तर अत्यंत अधीर झालं होतं.

डॉ. देसाई आठवड्यांतून तीन वेळां तळेगांवला येत ते आपल्या स्वतःच्या मोटारींतून. ते येऊन दाखल झाले कीं प्रकृति दाखवावयासाठी आलेल्या रोग्यांची गर्दी त्यांच्यासाठीं खोळंबलेलीच असे. ती वाटेला लावली की ते वॉर्डमध्यें जात, आणि तिथलं काम आटपल्यावर 'जरा चाफेकर साहेबांच्याकडे जाऊन येतों' असं मदतनीस डॉक्टरांना सांगून ते हलके हलके पावलं टाकीत छोट्या बंगलीकडे निघत. लहर लागेल आणि सवड असेल त्याप्रमाणें ते श्रीधरशीं कमी अधिक वेळ गप्पा मारीत बसत. अशा प्रकारें गप्पा मारण्यांत डॉक्टरांचा असा गुप्त हेतु असे कीं त्याच्या बोलण्याचालण्याचं, वागण्याचं, कोणत्याहि विषयाच्या विचार करण्याच्या त्याच्या पद्धतींचं सूक्ष्म अवलोकन करायचं, आणि त्याला कळणारहि नाहीं अशा बेतानं त्याच्या ठिकाणीं खरोखरच कांहीं विकृति आहे कीं काय हें

ठरवायचं. अशा प्रकारें श्रीधरकडे त्यांनीं जों जों अधिक लक्ष दिलं तों तों त्यांची खात्री होत गेली कीं त्याच्याबद्दल आपण प्रथमच जो अदमास केला होता तोच बरोबर होता. त्यांची बुद्धि असामान्य होती हाच त्याचा दोष होता ! ज्या विषयांत तो लक्ष घाली त्याचा अगदी खोल विचार करण्याचा त्याच्या बुद्धीचा हट्ट असे, त्या विषयांतल्या रूढ लौकिक कल्पना आधी झाडून दूर करण्याची त्याची प्रवृत्ति असे, आणि मान्य झालेल्या सिद्धांतानां धक्का देण्यासारखी एखादी कल्पना त्याला सांपडली कीं त्याच्या संशोधक मतीला तिचा छंद लागून रहात असे. मनाच्या या ठेवणीमुळें दुराग्रह, एककल्लीपणा या गोष्टी त्याच्या स्वभावांत उत्पन्न होऊन वाढत गेल्या होत्या. लोकांना त्याच्या ठिकाणीं ज्या 'वेडा'ची शंका होती तिचं खरं स्वरूप एवढंच होतं. या 'वेडा'वर कांही उपाय करता येईल असं डॉक्टरांना वाटेना. बाकी निद्रानाश, हातापायांचा कंप, इत्यादि जी चिन्हं त्याच्या ठिकाणीं थोडी थोडी दिसूं लागली होती तीं तात्कालिक स्वरूपाची होतीं. नियमित राहणी, पौष्टिक अन्न, भरपूर विश्रांति, आणि ज्यांत मनाला किंचित्‌हि ताण पडणार नाहीं अशा स्वरूपाच्या गप्पा यांच्या योगानं तीं लक्षणं सहज दूर होण्यासारखी होतीं. तो इथें तळेगांवास येऊन राहिल्यापासून तीं दूर होऊं लागलीहि होतीं आणि त्याच्याशीं रोज नेमानं इकडच्या तिकडच्या साध्या गप्पा मारण्यांत डॉक्टरांचा उद्देश असाच असे कीं त्याच्या मनावरचा ताण कमी व्हावा. त्याच्या टेबलावर जाड जाड पुस्तकं आणि टिपणांच्या वह्या दिसल्या कीं डॉक्टरांनीं त्याला म्हणावं,

"चाफेकरसाहेब, तुम्हाला लवकर बरं व्हायचं असेल तर हें तुमचं वाचन अजिबात बंद करा पाहूं.'

श्रीधरनं म्हणावं "पण वाचन बंद केलं कीं माझी श्वसनक्रियाच बंद होईल ! पुस्तकांवाचून मी वेळ कसा घालवूं ?"

"पुस्तकं वाचा हो. पण हे असले जाड ग्रंथ नकोत. कादंबऱ्या, गोष्टी असलं कांहीं वाचा कीं. शिवाय इथें आजूबाजूस सृष्टिसौंदर्य भरपूर आहे. दोन तीन तास खुशाल फेरफटका करावा तुम्हीं. लोकांत मिसळावं, ओळखी करून

घ्याव्या, या जाड जाड ग्रंथांची फारशी आठवणच होणार नाहीं असं होण्यासाठीं कशांत तरी गोडी लावून घ्यावी, ज्यांत मन रमेल आणि ताजं प्रसन्न राहील—”

श्रीधर हंसून म्हणे, “ आलं, आलं लक्षांत डॉक्टर, परंतु मी लहानाचा मोठा झालों तोंच अशा प्रकारें कीं या जाड जाड ग्रंथाखेरीज माझ्या मनाला दुसऱ्या कशाचा चाळा लागतच नाही. ज्यांत मन रमावं असं कांहीं सुंदर मला दिसतच नाहीं—”

आणि आतां अकल्पितपणे रत्ना त्याच्या दृष्टीस पडली होती, पण नंतर दिसेनाशी झाली होती, आणि ती पुन्हा आपल्या दृष्टीस कशी पडेल या एकाच विचाराचा चाळा त्याच्या मनाला लागला होता !

त्या दिवशीं डॉक्टर नित्याप्रमाणे त्याच्याशीं गप्पा मारायला आले तेव्हां आपल्या दृष्टीस पडलेल्या त्या सुंदर स्त्रीविषयीं प्रश्न करावा असं त्याच्या मनांत राहून राहून येत होतं. परंतु आपल्या मनाची चलबिचल आणि उत्सुकता डॉक्टरांच्या ध्यानांत येणार नाहीं अशा बेतानं तो प्रश्न कसा करावा तें त्याला कळेना. नंतरच्या दोन खेपांतहि डॉक्टर नेहमीप्रमाणे येऊन त्याच्याशीं खूप गप्पा मारून गेले, परंतु त्यांच्याकडून हवी ती माहिती काढून घेण्याचा श्रीधरचा बेत तसाच राहिला. तो फक्त दिवसांतून शंभर वेळां व्हरांड्याकडल्या खिडकींत जाऊन दहा दहा वीस वीस मिनीटं रत्नाची प्रतिक्षा करीत उभा राही, आणि ती दृष्टीस पडली नाहीं कीं श्वास सोडून तो खिडकीतून दूर होई.

असे पांच दिवस गेल्यावर मात्र त्यानं मनाशीं ठरविलं कीं आपल्या मनांतली गोष्ट सरळ डॉक्टरांना विचारायची.

परंतु तशी गरजच उरली नाहीं. कारण अगदीं अनपेक्षितपणें रत्ना त्याच्या दृष्टीस पडली. आणि तीदेखील अगदीं जवळून. आणि तिच्याशीं त्याचं थोडं संभाषणहि झालं !

नित्याप्रमाणें डॉक्टरांची फेरी त्याच्याकडे झाली नाहीं. एखाद्या खेपेला कामाची फार गर्दी असली कीं त्यांच्या फेरीची ही वेळ टळत असे व मग ते

संध्याकाळीं केंव्हां तरी चक्कर टाकीत. डॉक्टरांची मोटार नेहमीच्या सावलीच्या ठिकाणीं त्याला दिसत होती तेंव्हां ते आले होते यांत शंकाच नव्हती. त्यांची बराच वेळ वाट पाहिल्यानंतर श्रीधरनं मनाशीं ठरविलं कीं ते आतां संध्याकाळी येतील. परंतु बारा वाजण्याच्या सुमारास त्यांचा निरोप आला कीं " दुपारीं दोन मोठीं ऑपरेशन्स मला करायचीं आहेत तीं आटपून मुंबईस परत जाण्याच्या घाईत तुमच्याकडे यायला मला वेळ व्हायचा नाहीं. आत्तां तुम्हीच इकडे माझ्या खोलीकडे येऊं शकतां काय ? मीच आलों असतों परंतु पांच सहा महत्वाचीं पत्रं टायपीस्टला सांगायची आहेत. "

श्रीधर डॉक्टरांच्याकडे गेला तेंव्हां ते एकटेच होते. त्यांचा टायपीस्ट यायचा होता. त्याला पाहतांच ते आपल्या नेहमींच्या तऱ्हेप्रमाणें अगदी पूर्ण हास्य करून म्हणाले " हं, चाफेकरसाहेब, काय म्हणते तब्येत ? उत्तम दिसते आहे. चर्या जास्त टवटवीत आहे नेहमीपेक्षां. अगदीं definitely. तुम्ही त्या जाड ग्रंथांची संगति सोडली आहे खास. "

श्रीधरनं गेल्या तीन चार दिवसांत आपल्या टेबलावरच्या ग्रंथांना हात लावला नव्हता हें खरंच होतं. परंतु त्या गोष्टीची साक्ष आपल्या चर्येवर उमटलेली असेल अशी त्याची कल्पना नव्हती. डॉक्टरांच्या त्या मनकवडेपणाच्या बोलण्याचं आश्चर्य वाटून तो कांहीसा गोंधळला आणि कांहीं उत्तर न करतां खुर्चीत बसला.

डॉक्टरांनीं आपल्या डाव्या हाताकडच्या टेबलावर ठेवलेली छोटी कातडी बॅग उचलून घेतली, व तिच्यांतून दोन कोरी पुस्तकं काढून त्याच्यापुढें करीत म्हटलं, "मी तुम्हांला म्हटलं ना चाफेकरसाहेब तुम्ही हलकं चुरचुरीत, गमतिदार, असं कांहीं वाचलं पाहिजे म्हणून ? हीं पुस्तकं घेऊन आलो आहे तुमच्यासाठीं. नुसतंच प्रिस्क्रिप्शन सांगून काय उपयोग ? त्याप्रमाणें औषध तयार करून देऊन हें घ्या असं म्हणायला नको ? "

पुस्तकं हातांत घेतां घेतां श्रीधर हंसून म्हणाला, " असं असं. औषध तयारच करून आणलंत होय ? मग तें मला घ्यायलाच हवं. पण डॉक्टर, तुम्ही

या ग्रंथांत असूनही तुम्हांला या असल्या खुसखुशीत, हलक्या वाङ्मयाची विशेष आवड कशी ? सहसा—"

डॉ. देसाईनीं आपल्या प्रशस्त फिरत्या खुर्चीत मागें रेलल्यासारखं केलं आणि डाव्या तळहातावर उजवा हात थोपटीत म्हटलं, "त्याचं असं झालं चाफेकर साहेब, मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत दाखल होण्यापूर्वी बी. ए. साठीं चार वर्षं काढलीं आम्ही पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत. तिथें दोन गोष्टींचा षोक केला. एक नाव वल्हविण्याचा, आणि दुसरा सपाटून कादंबऱ्या वाचण्याचा. अहो दिवसाकांठीं आठ आठ दहा दहा तास नाव वल्हवीत आम्ही नदीवर काढायचे ! आणि रेनॉल्डसची एखादी कादंबरी खोलींत वाचीत असतांना तिकडे कॉलेजांत घंटा झाली तरी आम्ही तासाला खुशाल दांडी मारायचे !..."

आपल्या विद्यार्थिदशेंतल्या आठवणी सांगण्याची डॉक्टरांना लहर आली होती, व ते तसेच पुष्कळ बोलत राहिले असते. परंतु तितक्यांत त्यांचा टायपिस्ट आला व टेबलासमोर उभा राहिला. त्याला पाहतांच डॉक्टर श्रीधरला म्हणाले, "बसता ना जरा चाफेकरसाहेब ? बसा कीं, एवढी ही पत्रं आटोपल्यावर मला दुसरं कांहीं काम नाहीं."

डॉक्टरांनीं टायपिस्टला मजकूर सांगावयास प्रारंभ केला, आणि त्यांनीं दिलेल्या कादंबऱ्यांपैकीं जिचं नांव त्याला सगळ्यांत अधिक चमत्कृतिपूर्ण वाटलं ती उघडून तो सहज चाळून पाहूं लागला.

"चाफेकरसाहेब, आतां हें शेवटचं पत्र हं" असं जेव्हां डॉक्टर त्याला म्हणाले तेव्हां त्यानं थोडसं चमकूनच वर पाहिलं आणि तो म्हणाला "माझ्यासाठीं घाई करूं नका डॉक्टर. मी अगदीं मजेंत बसलों आहे." डॉक्टर इंग्रजींत म्हणाले, "माझं औषध तुम्ही इतक्या हौसेनं घ्यायला लागलात याबद्दल मला मोठा आनंद होत आहे."

त्यांचं तें वाक्य टायपिस्ट उतरून घेऊं लागला तेव्हां ते त्याला म्हणाले "वा महाराज, हे त्या पत्रांतलं नव्हतं वाक्य" आणि ते मोठमोठ्यांनं हंसूं लागले. काय गंमत झाली तें लक्षांत येतांच श्रीधरहि हंसत सुटला.

तो आपलं हंसणं आवरून पुन्हा हातांतल्या पुस्तकाकडे वळणार तोंच "मला बोलावलं काय ?" असे शब्द त्याच्या कानीं आले, आणि त्यानं नजर वर करून दाराकडे वळविली तीं त्या ठिकाणींच खिळून राहिली.

कारण जी आतां आपल्या दृष्टीस पुन्हां केव्हां पडेल म्हणून त्याच्या मनाला तीव्र उत्कंठा लागून राहिलेली होती, आणि जी नजरेस पडण्यासाठीं कोणती युक्ति करून पहावी याबद्दल विचार करण्यांत त्यानं सहा दिवस घालविले होते, ती तरुण सुंदर स्त्रीच दारांतून आंत येऊन उभी असलेली तो पहात होता ! ज्याचा दीर्घ काल शोध केला तें दिसल्याबरोबर त्यावर अधीरतेनं झडप घालून डोळे स्थिरावतात तसे श्रीधरचे डोळे अगदी खिळून राहिले !

डॉक्टरांना प्रश्न विचारून ती दारांत उभी राहिली ती त्यांच्याकडे पहातच. डॉक्टर तिला म्हणाले, " होय बाईसाहेब ! परंतु जरा इथं खुर्चीत बसून थांबाल तर मेहरबानी होईल. कारण मी एवढं पत्र लिहून पुरं करणार आहे आणि मग आपल्याशीं बोलणार आहे. "

तिच्या वेषावरून ती हॉस्पिटलमध्यें परिचारिकेच्या कामावर होती हें अगदीं उघड होतं. आणि डॉक्टरांनीं ज्या स्वरांत आणि ज्या तऱ्हेनं तिला थांबायला सांगितलं ती तऱ्हा एखाद्या नोकराशीं बोलण्याची नव्हती हेंहि उघड होतं. त्यामुळें श्रीधरनं साहजिकच तर्क केला कीं ती जरी नोकरीवर असली तरी डॉक्टर तिच्याशीं विशेष आपलेपणानं वागत असावेत.

कामाव्यतिरिक्त कांहीं बोलायचं झालं कीं डॉक्टर नेहमींच विनोदानं कांहीं तरी बोलतात ही रत्नाच्या नित्यांतल्या अनुभवांतली गोष्ट झाली होती. ते कांहीं गंमतीदार बोलले कीं तिला एकदम हंसू येई व तें आवरणं तिला कठीण जात असे. पदराचं टोक ओढून तोंडावर धरून तिनं आपलं हंसणं लपविलं, व खुर्चीत बसण्यासाठीं ती पाऊलभर पुढें झाली. तसं करताना मान वळविल्यामुळें श्रीधर तिच्या एकदम दृष्टीस पडला ! तो तिच्याकडे टक लावून पहात होता !

खुर्चीत बसण्यासाठीं किंचित् पुढें झालेली रत्ना एकदम मागं सरकली. क्षणार्धपर्यंत तिची नजर श्रीधरच्या नजरेला भिडून राहिली. आश्चर्यानं की काय

कोण जाणे, तिनं डावा हात झटकन वर केला आणि तिचं नाजुक बोट हनुवटीवर टेकलेलं त्याला दिसलं. त्याच्या हास्याच्या संसर्गामुळें तिच्याहि ओठावर हास्य हलकेच फुटूं लागलं—

आणि दुसऱ्याच क्षणी एकदम तोंड फिरवून ती जी वळली ती दाराबाहेर पळाली. " अहो पळतां कुठें ? झालंच माझं " असं डॉक्टर म्हणाले परंतु तेवढ्यांत ती नाहींशी झाली होती.

डॉक्टरांची आणि श्रीधरची दृष्टादृष्ट झाली तेव्हां ते उद्गारले, " काय विचित्र पोरगी आहे पहा ", स्वतःशीच किंचित् हंसले व टायपिस्टला त्यांनीं पत्रांतील पुढचा मजकूर सांगण्यास प्रारंभ केला, " या कारणासाठीं माझा आपणांस असा सल्ला आहे कीं... "

श्रीधर आपल्या हातांतलं पुस्तक पुन्हां वाचूं लागला असेल अशी त्यांची कल्पना होती. परंतु श्रीधरच्या डोळ्यांना पुस्तकांतली छापील अक्षरं दिसत होती कुठें ?

पत्रांचं काम आटपल्यावर टायपिस्ट टेबलावरचे कागद आवरून उठून जाऊं लागला तेव्हां डॉक्टर त्याला म्हणाले, " हें पहा, तिकडे वार्डमध्यें रत्नाबाई असल्या तर त्यांना म्हणावं मी आतां मोकळा झालों आहे, तुमच्या हातांत कांहीं काम नसेल तर या. " श्रीधर पुन्हां पुस्तकांतून मान वर करून त्यांच्याकडे पाहूं लागला होता त्याला ते म्हणाले, " ही रत्ना मुलगी मोठी गमतीदार आहे बरं कां. माझ्या धाकट्या मुलीची आणि हिची जरा विशेष ओळख झाली आहे अलिकडे. कारण ती अधुन मधुन माझ्याबरोबर गंमतीनं इथें तळेगांवला येते. तिनं हिच्यासाठीं एक छोटसं पार्सल दिलं आहे माझ्याजवळ आज, ते द्यायचं आहे तिला. हिची हकीगत मोठी मनोरंजक वाटेल तुम्हांला सांगितली तर. हिचा बाप म्हणजे पुण्यांतली एक बडी आसामी—"

डॉक्टर बोलत राहिले परंतु त्यांच्या बोलण्याकडे श्रीधरचं लक्ष नव्हतं. त्या क्षणाला एकच गोष्ट त्याला समजत होती. रत्ना त्याला दुरून सुंदर वाटली होती, जवळून ती त्याला विलक्षण मोहक वाटली होती.

डॉक्टर आपलं बोलणं संपवून म्हणत होते, "आतां ती आली कीं तुमची ओळख करून देतों."

श्रीधर तळेगांवच्या स्टेशनावर पोंचला तेव्हां आपली गाडी आज चुकणार याची त्याला खात्री होती. पुण्यास जाण्याचा बेत त्यानं एकाएकी ठरविला होता आणि तयारी करता करतां त्याची धांदल उडाली होती. स्टेशनपर्यंत त्याची सामानाची बॅग डोक्यावर नेण्यास त्याला त्या घाईत हमाल मिळाला तो म्हातारा आणि लंगडा. श्रीधर त्याला पुनः पुन्हा एखादं घोडं हाकल्यासारखं म्हणे "अरे जरा लौकर चल कीं," आणि थकलेल्या मानेवर बॅगचं ओझं कसं बसं सांवरीत तो म्हातारा विचारी "दादा कसा उचलूं पाय ? म्हातारा माणूस आहे, घ्या संभाळून."

श्रीधर हंसून म्हणाला, " अरे मी पुष्कळ संभाळून घेईन. पण तूं म्हातारा आणि लंगडा म्हणून गाडी कांहीं सावकाश येणार नाहीं माझी", आणि मनाशीं त्यानं खूणगांठ बांधली कीं आपली गाडी आज खचित चुकणार.

स्टेशनच्या आंत तो शिरला तेव्हां गाडी उभी नसलेली पाहून त्याला वाटलं ती निघून गेली असली पाहिजे. पण नंतर त्याला कळलं की मुंबईकडून गाडी अजून यावयाची होती. तो हमालाकडे वळून म्हणाला, " म्हाताऱ्या, आलों बाबा वेळेवर. गाडी लेट आहे आज. ठेव ती बॅग खालीं". म्हातारा म्हणाला, "मी लंगडा असलों तरी माझा पायगुण चांगला आहे रावसाहेब. आज दहा वर्षं हमाली करतों आहे पण कुणाची गाडी नाही चुकली कधी."

म्हाताऱ्याच्या डोक्यावरच्या बॅगला हात लावण्यासाठीं श्रीधर वळला—

परंतु बॅग पकडण्याऐवजीं तो तसाच उभा राहिला !

दूर अंतरावर रत्ना उभी असलेली त्याला दिसली होती !

तो तिच्याजवळ गेला व म्हणाला, " कुणाची वाट पाहतां ? "

ती हंसली व हलकेच म्हणाली, " गाडीची. रोज या गाडीनं मी पुण्यास जातें ना."

त्यांचं बोलणं एकदम थांबलं. तीं दोघंहि मनांतल्या मनांत गोंधळून

जाऊन एकमेकांची नजर चुकवून उभी राहिलीं. ' काडी बिडी सिगरेट मॅचीस ?' असा हेल काढणारं एक पोरगं श्रीधरजवळ येऊन उभं राहिलं. मान हालवून त्याला वाटेला लावल्यावर श्रीधर रत्नाला एकदम म्हणाला " मी सुद्धां याच गाडीनं निघालों आहे पुण्याला. "

" परत केव्हां येणार ? उद्यां ? "

" अं हं. आतां नाहीं परत येणार. "

तिची चर्या एकदम बदलली व तिनं घाईनं विचारलं " म्हणजे ? "

" हॉस्पिटल सोडून जायला डॉक्टरांनीं आज मला परवानगी दिली. तुम्हाला कदाचित माहीत असेल मी इथें कां येऊन राहिलों होतों तें. "

" थोडंसं. वॉर्डांतली डॉक्टरमंडळी कधींकधी तुम्हाला वेडाचा विकार असल्याचं बोलत असत त्यावरून. मग तें वेड झालं कां बरं ?

तिच्याकडे निरखून पहात व किंचित् हंसत तो म्हणाला, " हो, तें सरकारी वेड बरं झालं. पण आता दुसरं लागणार असं दिसतंय ! "

त्याची थट्टा तिच्या नीटशी लक्षांत आली नाहीं. किंबहुना त्या क्षणाला तिची चर्या जरा गंभीरच झालेली दिसली आणि निराशेच्या स्वरांत तिनं विचारलं, " पण म्हणजे आतां तुम्ही कधीच इकडे येणार नाहीं ? "

" अं हं. "

" कुठें जाणार ? पुण्यालाच राहणार होय ? "

" नाहीं. तिथें फक्त पांच सहा दिवस राहणार. तिथें माझा मामेभाऊ आहे. त्याला किती दिवसांत तरी मी भेटलों नाहीं म्हणून—पण आता बोलूंच आपण गाडीमध्यें ". पण तितक्यांत त्याच्या मनांत एक शंका आली व त्यानं विचारलं, " तुम्ही बायकांच्या डब्यांत नाहीं ना बसणार ? "

" तर कुठें ? माझा थर्डक्लासचा पास आहे, आणखी मी रोज बायकांच्याच डब्यांत बसून येतें जातें. एकटीच असतें तेव्हां—"

" पण आज तुम्ही एकटया नाहीं. तुम्ही माझ्याबरोबर सेकंड क्लासांतून

आलं पाहिजे. थांबा, मी तुमचं तिकीट काढून आणतों हं झटकन्" एवढं म्हणून तो झपाझप पावलं टाकीत तिकीट ऑफीसकडे गेला.

तळेगांवपासून पुण्यापर्यंतच्या प्रवासाच्या अवधींत तो सारखं बोलत होता. ती बहुतेक सारा वेळ स्तब्धच होती. त्यानं मध्येंच एखादा प्रश्न विचारला म्हणजे त्याचं उत्तर देतांना वर मान करून ती त्याच्याकडे बघे. तिची नजर त्याच्या चेहऱ्यावर रेंगाळत राहिल्यासारखं करी. परंतु मग लगेच तिची मान खालीं होई व त्याचं बोलणं ती ऐकत राही. त्याच्या बोलण्यांतल्या विषयापेक्षां त्याचा शब्द व त्याची बोलण्याची तऱ्हा याकडेच तिचं अधिक लक्ष असे. मध्येंच तो असं कांहीं बोलणं काढी की त्यांत तिला कांहींच गम्य नसे. तळेगांवाबद्दल बोलण्याच्या ओघांत त्या स्थळाचं ऐतिहासिक महत्व सांगतां सांगतां मराठ्यांच्या व इंग्रजांच्या लढायांचा इतिहास अजून नीट लिहिला गेला नाहीं व या बाबतींत एकदां चांगलं संशोधन करण्यांत वर्ष दोन वर्षं घालविण्याची आपली फार दिवसांची इच्छा आहे हें तो सांगूं लागला तेव्हां आपली नजर खालींच ठेवून ती नुसती मान हालवींत राहिली. एकदम कुठल्या तरी विषयाबद्दल भलताच जिव्हाळा दाखवून आवेशानं बोलण्याच्या त्याच्या असल्या लहरी तऱ्हेलाच लोक वेड म्हणत असावेत असं तिच्या मनांत दोनचारदां आलं. मात्र त्याचा तो आवेश तिला फार गंमतीचा वाटला व त्यानं तसंच आणखी बोलत रहावं असं तिला वाटलं. गंभीर विषयाबद्दल बोलतां बोलतां तो एकदम सोडून देऊन अगदींच सामान्य अशा कांहीं तरी गोष्टीबद्दल मध्येंच प्रश्न करण्याची त्याची लकब तिच्या हलके हलके ध्यानांत आली व तो अकस्मात् काय विचारील याचा नेम नसल्यामुळें त्याच्या बोलण्याकडे सारखं लक्ष ठेवलं पाहिजे हें तिला समजलं.

"शिवाजीनगर स्टेशनवर बस तयारच असते काय?" हा प्रश्न त्यानं असाच एकदम केला.

ती म्हणाली, "हो, या गाडीनं मुंबईकडून येणाऱ्या उतारूंच्या सोईसाठीं ती उभीच असते."

"मी डेक्कन जिमखान्याच्या चौकांत उतरणार."

"मला त्याच्यापुढें बरंचसं जायचं आहे."

"हं. मग उद्यां तुमची आमची भेट होणार की नाहीं ?" त्यानं एकदम प्रश्न केला.

अगदीं तिच्या मनांतलीच गोष्ट त्यानं विचारली होती. किंचित् खिन्नतेनं मान हालवून ती म्हणाली, "कशी होणार ? तुम्ही पुण्यांत राहणार आणखी मी तळेगांवला जाणार. मग—"

"पण समजा तुम्ही गेला नाहींत, रजा घेतलीत—"

"छे छे, उगीच रजा घेतलेली मोठ्या डॉक्टरांना अगदीं आवडत नाहीं."

"परंतु उगीच घ्या असं कुठें मी म्हणतों आहे ? तुम्ही एक दिवस रजा काढून पुण्यात रहावं असं मला वाटतं. हें कारण नाही कां रजेला ?"

ती हंसली. "पण ते पटायचं नाहीं मोठ्या डॉक्टरना, ते माझ्याशीं फार आपलेपणानें वागतात. पण तसे ते फार स्ट्रिक्ट आहेत हं."

"पण म्हणजे मी पुण्यांत पांच सहा दिवस आहे तेवढ्यांत सवडीनं तुमची माझी भेटच होणार नाही ?"

मान हालवीत ती म्हणाली, "मला रोज नोकरीवर जायलाच पाहिजे."

विचारांत गढल्याप्रमाणें तो कांहीं वेळ स्तब्ध राहिला व म्हणाला "ठीक आहे. मग तुमची थोडी कां होईना पण रोज भेट व्हावी म्हणून आम्हीच एक युक्ति करूं तर. तुम्हाला रोज सकाळीं शिवाजीनगर स्टेशनपर्यंत पोंचवायला अन् रात्रीं परत आणायला मी हजर राहिलों तर तुमची कांहीं हरकत नाहीं ना ?"

"अय्या !" असं म्हणून तिनं आपला डावा पंजा तोंडावर ठेवला. त्यानं असलं कांहीं मनांत आणावं याचं तिला आश्चर्य अधिक वाटलं कीं त्याचा बेत ऐकून तिला आनंद अधिक झाला तें ओळखणं श्रीधरला कठीण वाटलं. परंतु तिचा तो विस्मयाचा अभिनय आणि तिच्या चर्येवरचा भाव फार मोहक होता एवढं खास.

शिवाजीनगरच्या प्लॅटफॉर्मवर उतरता उतरतां तो म्हणाला, "इथली मला कांहींच माहिती नाहीं हं. तुमच्या मागं येणार मी."

" असं होय ? " एवढाच उद्गार काढून ती हंसली व चालूं लागली.

बसपाशीं गेल्यावर ती प्रथम वर चढली व त्याच्याकडे मान वळवून म्हणाली, " पुण्याची बस कशी असते बघा. "

तो हंसला व हातांतली मोठी बॅग कशीबशी सांवरीत वर चढला. तिच्या शेजारी रिकामी जागा नव्हती त्यामुळें त्याला समोरच्या बाकावर बसावं लागलं तेव्हां तो बराचसा नाराज झाल्यासारखा तिला दिसला. त्यानं बॅग बाकाखालीं सरकविण्याची खटपट केली, परंतु तें साधेना तेव्हां त्यानं एखाद्या इंग्रज माणसासारखे खांदे हालविले, तोंड चंबुसारखं जुळवून कांहीं विचित्र अभिनय केला, व ' ऑल राइट ' असं म्हणून ती सूट केस आपल्या पायावर उभी टेकून धरली. तें सारं पाहून रत्नाला एकदम मोठ्यांदा हंसूं आलं. हंसतां हंसतां तिच्या मनांत आलं आज आपण अशा काय वरचेवर क्षुल्लक कारणावरून हंसत सुटत आहोंत. हे चाफेकरसाहेब आपल्याला काय म्हणतील ? तिनं हळूच त्याच्याकडे पाहिलं तों श्रीधर हंसत हंसत खिशांतून सिगारेटची पेटी काढीत होता. कंडक्टर तिच्यापुढें येऊन उभा राहिला व ती आपल्या मांडीवरची मनीबॅग उचलून तिचा चाप उघडूं लागली तेव्हां श्रीधरनं " अं हं, मी घेतों " असं तिला सांगून त्याचा कोट ओढला, व सिगरेट सांवरणाऱ्या ओठांवाटे बोबड्या शब्दांत ' दोन ' असं म्हणून त्यानं रुपयाची नोट त्याच्यापुढें धरली.

तिचं व श्रीधरचं बोलणं मग बंद पडलं. संभाषणाची विशेष इच्छाहि तिला नव्हती. या क्षणाला न बोलतांच केवळ गेल्या दोन चार घटकांत जें घडलं त्याचा आनंद मनाशीं आठवण्यांतच विलक्षण सुख होतं. किती वेळ तरी मान फिरवून आपलं तोंड गाडीबाहेर काढून ती त्या सुखाचा आस्वाद घेत स्तब्ध राहिली. तिचे केस वाऱ्यानं उडत होते ते नीट करण्यासाठीं दोन्ही कानशीलांवरून तिचा डावा हात सारखा फिरत होता. परंतु तिची ती हालचाल सर्वस्वी अहेतुक होती. तिचं चित्त अगदी नवीनच अशा कल्पनांशी चाळा करण्यांत गुंतलेलं होतं !

# ३

स्टेशनांत शिरणाऱ्या आगगाडीचा वेग कमी झालेला असतो खरा परंतु तरी देखील प्लॅटफॉर्मवर फार पुढें होऊन उभ्या राहिलेल्या माणसाला एखादं भयंकर धूड वेगानं आपल्या अंगावरून गेल्यासारखं वाटतंच. आज त्यांतल्या त्यांत गाडी रोजच्यापेक्षां अधिक वेगानं तळगांवच्या आवारांत शिरली कीं काय कोण जाणे परंतु धड्क् धड्क् असे आवाज करीत रत्नाच्या दृष्टीपुढून माणसांनीं गच्च भरलेले डबे जाऊं लागतांच एखाद्या लहान मुलानं घाबरून मागं सरकावं त्याप्रमाणें ती दोन पावलं मागं झाली. गाडी अजून पुरती थांबली नव्हती. खिडक्या-खिडक्यांतले शेंकडो चेहरे तिच्यापुढून अजूनहि तरंगल्यासारखे उजवी-कडे जात होते. परंतु गाडीचं तें प्रचंड वजन वेगानं अंगावरून गेल्यामुळें तिच्या मनांतील विचारांची सांखळी मात्र तुटली. ती भानावर आली, व सुस्कारा टाकून मनाशीं म्हणाली, "हं, जाऊं दे. काय व्हायचं असेल तें होईल. ज्यावरचा उपाय आपल्या हातांतच नाहीं त्यावर विचार करीत राहण्यांत काय फायदा ? ही गाडी सुटण्याच्या आधीं हिच्यांत चढून बसणं हें पहिलं कर्तव्य आहे...अशा छोटया छोटया परंतु उघड प्राप्त अशा कर्तव्यापुढेंच मनांतली मोठाली दुःखं माणूस विसरतं-निदान सहन करूं शकतं..."

"ज्यावर आपला उपाय नाहीं" हे उद्गार आतांशा कितीदां तरी ती मनाशीं काढी. त्या उद्गारांतच ज्यांचा शेवट व्हावा असे विचार तिच्या मनांत वरचेवर येत रहात, आणि त्या विचारांचा मनाला फार त्रास होतो हें माहीत

असूनहि तिला ते टाळतां येत नसत. अंतःकरण दुखावलं कीं 'अशी कां बरं दुखापत व्हावी?' असा प्रश्न मनाला वरचेवर केल्याशिवाय माणसाला रहावत नाही. रत्नाचं अंतःकरण आजपर्यंत तिला ज्याचा कधीच अनुभव नव्हता अशा दु:खानं जड झालं होतं. ती पुनः पुन्हा स्वतःला विचारीत होती ' असं कसं झालं ?..."

पांच सहा दिवस पुण्यांत राहून श्रीधर गेला तेव्हां तिला माहीत होतं की त्याला परत येतां येण्यासारखं नव्हतं. कुणालासा भेटण्यासाठीं तो दिल्लीस जात होता आणि जातां येतां वाटेंत तो दोन चार गांवीं मुक्काम करणार होता. तो कशासाठीं इतक्या दूरच्या प्रवासाला जाणार होता त्याची तिला कल्पना नव्हती. किंबहुना त्याचा सध्याचा व्यवसाय काय, तो कायमचा कुठें राहतो, त्याच्या घरीं कोण कोण माणसं आहेत इत्यादि कोणत्याच गोष्टींची तिला स्पष्ट कल्पना नव्हती. याबद्दल तो तिच्याशीं कधीं बोलला नव्हता असं नव्हे. परंतु त्याच्या उद्योगाबद्दल त्यानं बोलणं काढलं की तिला वाटे हा विषय आपल्या कळण्याच्या पलीकडचा आहे. आणि मग त्याच्या बोलण्यापेक्षां त्याच्याकडेच तिचं लक्ष अधिक लागून राही. मोठ्या डॉक्टरांच्या व इतरांच्या बोलण्यांतल्या उल्लेखांवरून तिला एवढं माहीत झालं होतं कीं तो विलायतेला जाऊन आला होता, तिकडे कसली तरी एक मोठी परीक्षा पास झाला होता, अन् इकडे मोठ्या पगाराच्या नोकरीवर असतांना त्याचं सरकारशीं पटेनासं होऊन त्यानं नोकरी सोडून दिली होती. ज्यानं त्यानं म्हटलेलं तिच्या कानावर आलं होतं की तो विलक्षण बुद्धिमान आहे. आणि त्याचं असामान्य सौंदर्य तर तिनं प्रत्यक्षच पाहिलं होतं. तो ज्या क्षणीं तिच्या दृष्टीस पडला त्या क्षणींच तिचं मन त्याच्यावर जडलं होतं, आणि तो फार बुद्धिमान पुरुष आहे असं जों जों तिनं ऐकलं तों तों ती त्याच्यावर अधिक लुब्ध होत गेली होती. त्याच्याविषयीं तिला जें आकर्षण वाटे तें खळाळून वाहणाऱ्या एखाद्या जलप्रवाहाच्या ओढीसारखं होतं. परंतु एकीकडे त्या आकर्षणानं ती त्याच्याकडे जोरानं खेंचली जात असतांना दुसरीकडे तिला त्याच्याबद्दल जवळजवळ भीतीच्या स्वरुपाचा आदर वाटत होता. तिला वाटे कीं

त्याचं शिक्षण, त्याची बुद्धिमता, त्याच्या विचाराची झेप किती मोठी आणि उंच, अन् त्याच्या मानानं आपण किती लहान. आपण आपले हात कितीहि उंच केले तरी त्याच्यापर्यंत ते कसे पोचणार ? लक्षणार्थानं तो उचलून आपल्याला जवळ घेईल तितकंच त्याच्याजवळ आपण जाऊं शकूं. अलौकिक बुद्धिमान पुरुषावर लुब्ध होणाऱ्या स्त्रियांचे दोन प्रकार असतात. एका प्रकारच्या स्त्रिया असतात त्या अशा की पुरुष बुद्धीनं केवढाहि मोठा असला तरी त्याचा तो मोठेपणा त्या मुळी मोजीतच नाहीत, आणि ज्या अर्थी आपण आपलं सर्वस्व त्याला देतों त्या अर्थी आपल्यात व त्याच्यात कांही अंतरच उरलेलं नाही अशा समजुतीनं त्याच्यावर प्रेमाचा अधिकार त्या गाजवूं पाहतात. दुसऱ्या प्रकारच्या स्त्रिया असतात त्या अशा की पुरुषाच्या बौद्धिक मोठेपणाचा त्याना दरारा वाटतो आणि मनातलं प्रेम कितीहि उत्कट असलं तरी आदर, नम्रता व किंचित् भय ठेवूनच त्या प्रेम करतात. रत्ना या दुसऱ्या वर्गातली होती. श्रीधर आपल्यावर अनुरक्त झाला आहे हे तिला कळलं होतं. त्या जाणीवेचं तिला फार सुखहि होत होतं. ती स्वत: तर त्याच्यावर विलक्षणच लुब्ध झाली होती. परंतु इतकं असूनहि त्याच्याशी बरोबरीच्या नात्यानं, सारा संकोच सोडून, अगदी खेळकर वृत्तीनं वागण्याचा धीर तिला होत नव्हता. प्रीतीच्या अगदी पहिल्या दिवसांत देखील स्त्रिया पुरुषाजवळ हरप्रकारचे गोड हट्ट करतात आणि आणाभाका मागतात. पण श्रीधर पुण्यात पाच सहा दिवस राहून [illegible]ला निघाला तेव्हां ‘ तुम्हीं माझ्यासाठी लौकर परत यायला पाहिजे ’ किंवा ‘ तुम्ही मला रोज पत्र लिहिलं पाहिजे ’ असला कोणताच आग्रह तिनं त्याला केला नव्हता, अथवा त्याच्याकडून कसलं वचनहि घेतलं नव्हतं. फक्त मनांतल्या मनात ती म्हणत होती कीं यांचं मन माझ्यावर जडलं असेल तर मी न बजावताहि ते माझ्याकडे धांव घेतीलच, मला पत्र धाडतीलच...

पण तिचा हा विश्वास चुकीचा ठरला होता. जवळ जवळ पंधरा दिवस होत आले तरी तो परत आला नव्हता. त्याच्याकडून पत्रही आलं नव्हतं. तो कोणत्या कामासाठीं गेला होता त्याची तिला कल्पना नव्हती त्यामुळें त्याचं

काम अमुक अवधींत आटपेल अन् मग तो आपल्याकडे येईल असा कांहीं हिशोबहि तिला करतां येत नव्हता. फक्त आज नाहीं तर उद्यां तो येईल एवढ्या आशेवर ती स्वतःला धीर देत राहिली होती. जस जसा एक एक दिवस अधिक लोटत होता तस तसा तिचा हा धीर तुटत चालला होता. समजा तो पुन्हा परत आला नाहीं तर ?—त्याला आपला पूर्ण विसर पडला तर ?—या शंकेच्या व्यथेनं तिचं अंतकरण फार जड होऊं लागलं होतं आणि ती जरा कुठें बसली अगर उभी राहिली की, 'असं कसं झालं ?' हा प्रश्न तिच्या मनांत येऊन तिला दुःखी करून टाकीत होता...

गाडी अंगावरून गेली तेव्हां या दुःखांतूनच ती जागी झाली.

चाकांचे आवाज झाले, डबे स्थिर झाले, खिडक्यांतल्या माणसांचे चेहरे जरा स्पष्ट दिसूं लागले, आजूबाजूंच्या लोकांची गार्डीत शिरण्यासाठी धांवपळ झाली, तेव्हां ती पुरती भानावर आली व स्वतःशी म्हणाली "बायकांचा डबा पुढें गेला की मागं आहे ?" तितक्यांत डाव्या हाताला दूर अंतरावर डब्यांतून वांकलेल्या बायका तिला दिसल्या. तिकडे जावयासाठी ती झपाझप पावलं टाकूं लागली. ती दोन चार पावलं गेली असल तोंच "रत्ना" अशी हांक तिला ऐकूं आली. तिनं पाहिलं तों श्रीधर तिच्यापुढे उभा होता !

आश्चर्यचकित झाल्यामुळें ती जागच्याजागीच उभी राहणार होती. परंतु त्यानं तिला सवडच दिली नाहीं. तिच्या कमरेभोंवतीं त्यानं हात टाकला नाहीं. परंतु तिला तसं वाटावं इतक्या जवळ खेटून तो घाईनं पण हंसत हंसत म्हणाला,

"माझी खात्रीच होती की तूं स्टेशनवर भेटशील. माझा डबा बराच मागं आहे. चल, लौकर पाय उचल."

त्याच्या बोलण्याची तऱ्हा अशी होती की जणूं तो आपल्याला ओढून नेत आहे असा रत्नाला भास झाला. "पण माझं तिकिट थर्डचं आहे" असं कांहींसं ती पुटपुटली.

"तें मला माहीत आहे. मुंबईपासूनच्या तिकिटाचे दुप्पट पैसे आणि दंड भरीन मी वेळ आली तर—" असं म्हणून तो हंसला. त्याच्या मागोमाग झपा-

झप पावलं टाकीत ती गेली. डब्याच्या दारापाशीं तीं दोघं पोंचलीं तोंच गाडी शिटी देऊन किंचित् हालली देखील. ती घाबरून म्हणाली "अग बाई." त्यानं झटकन् तिच्या पाठीकडून खांद्याखाली दोन्ही हात घालून तिला उंच केली, व तिच्या मागोमाग तोहि चढला.

नंतर त्याचं जें बोलणं सुरू झालं तें ऐकतां ऐकतां रत्ना सारखं मनाशी म्हणत होती, जिचा माझ्या मनाला विलक्षण मोह पडतो तीच ही बोलण्याची तऱ्हा, तोच हा आवेश, सुंदर चेहऱ्यावरच्या त्याच या तरळत्या भावछटा !...आपण परत तिच्या भेटीला यायला उशीर केला याबद्दल अगर पंधरा दिवसांत एकहि पत्र पाठवलं नाहीं याबद्दल खेदाचा एक शब्दही त्यानं काढला नाहीं. तूं रागावलीस काय असं एका अक्षरानंहि तिला विचारलं नाहीं. जणूं असं वागण्यांत आपला कांहीं अपराध झाला अशी त्याची समजूतच नव्हती. आणि तरी देखील त्याचं बोलणं सुरू झालं तेव्हां तो पंधरा दिवस आपल्यापासून हजारों मैल दूर होता या तक्रारीची आठवणच रत्नाला उरली नाहीं. तो आपल्याला विसरून तर गेला नसेल अशी जी शंका तिच्या मनांत अलिकडे येऊं लागली होती तिचा तिला एकदम विसरच पडला. त्याच्या सान्निध्यांत आणि संभाषणांत काय मोहिनी होती ! दिल्लीस व इतर गांवीं आपण कुणाकुणाला भेटलों तें तो तिला सांगत होता. त्याच्या बोलण्यांत गंभीर विषय येत होते. बड्या बड्या लोकांची नांवं येत होतीं. रत्नाला त्यातलं कांहींच गम्य नव्हतं. पण तो तिच्याशीं अतिशय उत्साहानं बोलत होता एवढंच तिला समजत होतं व त्याचं तिला मोठं सुख होत होतं. त्याच्या स्वभावानुसार गंभीर विषया-वरचं बोलणं मध्येंच एकदम तसंच सोडून देऊन तो एकदम कांहीं तरी साधा प्रश्न करी त्यामुळें तिला जरा सावधच असावं लागे. या सावधपणाची तिला आतां थोडीशी संवय झाली होती. परंतु क्वचित् असं होई कीं जें साधं विधान अगर साधा प्रश्न तो मध्येंच करी त्याच्या मागं त्याच्या मनांतल्या विचारांची कोणती हालचाल आहे तें ओळखणं तिला कठीण जाई. मग ती 'अं अं' असं चाचपडल्यासारखं करी, तिच्या चेहऱ्यावर उमटलेला संभ्रम त्याला अतिशय मोहक वाटे, आणि तो मोठ्यांदा हंसे. मग एखादा मुग्ध बालकाप्रमाणें ती त्याला

म्हणे, " हंसूं नका हो. काय विचारलंत तें पुन्हां विचारा. सांगा ना. काय म्हटलंत ? "

एकदां असं म्हणून तिनं त्याच्या कोटाची बाही ओढली तेव्हां तो म्हणाला, " मी असं विचारीत होतों तळेगांवच्या या नोकरीचा तुला कंटाळा केव्हा येणार आहे ? "

तिचं हंसणं मावळलं. किंचित् गंभीर होऊन ती कांहीं वेळ स्तब्ध राहिली व म्हणाली, " कंटाळा येऊन कसं चालेल ? मोठे डॉक्टर फार चांगले आहेत. इतकी सुखाची दुसरी नोकरी मिळणं सोपं नाहीं. "

" पण नोकरी केलीच पाहिजे असं कुणी सांगितलं आहे ? "

कुंकू लावतांना बायका कपाळावर बोट टेकतात त्याप्रमाणें बोट टेकीत ती म्हणाली " प्राक्तनानं " तिनं हास्य केलं, पण त्यामुळें तिची उलट करुणा वाटण्यासारखी होती. ती हलकेच म्हणाली, " माझे वडील कोण होते तुम्हाला माहीत आहे ? त्यांची श्रीमंती आणि पुण्यांतला दरारा असा होता... " ती बराच वेळ बोलत राहिली.

आपलं बोलणं संपवून " म्हणून म्हटलं नोकरी केलीच पाहिजे असं प्राक्तनानं सांगितलं आहे " असा उद्गार तिनं काढला, आणि मग निश्वास टाकून ती खिडकीबाहेर बघूं लागली.

ती एकदम आपल्यापासून फार फार दूर गेली असा श्रीधरला भास झाला. हें उपयोगाचं नव्हतं. ती सदा आपल्याजवळ असावी अशी तर त्याची इच्छा होती. ती इच्छा पुरी करण्यासाठीं त्यानं आपल्या मनाशीं कांहीं एक योजना केली होती. आणि ती योजना तिला सांगण्याची प्रस्तावना म्हणूनच त्यानं हॉस्पिटलमधल्या नोकरीबद्दल प्रश्न केला होता. तो हलकेच म्हणाला, " हें बघ, तुला कांहीं एक गोष्ट सांगायची आहे मला. "

तिनं मान फिरविली. तिच्या चेहऱ्यावर खिन्नतेची छाया होती. " खरंच " असं तो हंसत म्हणाला तेव्हां मात्र तिचे ओठ विलग झाले आणि नजरेंत हास्य चमकलं. तिनं हळुच विचारलं " कसली गोष्ट ? कुणाबद्दल ? "

" तुझ्यामाझ्याबद्दल. "

तिनं मान हालविली. जणूं छे तुमच्या माझ्याबद्दल कांहीं गोष्ट असूं शकते काय असं ती म्हणणार होती. पण मग तिनं एकदम चेहरा हंसरा केला व म्हटलं " सांगा. "

श्रीधर म्हणाला, " तुझ्यासारख्या मुलीनं हॉस्पिटलमधली ही असली नोकरी करावी हें मला अगदीं आवडत नाहीं—"

( " तुम्ही कोण हो आवडत नाहीं म्हणणारे ! नर्सची नोकरी काय थोड्या बायका करताहेत ? त्याना नाहीं तुम्ही कुठें सांगत ? माझ्यावर प्रेम बसलंय तुमचं असं सरळ सांगा की. पण तें जाऊं दे. बोला—" )

" तूं ही नोकरी सोडून दिली पाहिजेस. तूं म्हणशील नोकरी सोडून करूं काय ? तेंच मी सांगणार आहे. आज पंधरा दिवस मी या गोष्टीचा विचार केला आहे—"

( " काय बोलणं ! बोटभर पत्र देखील पाठवलं नाहीं अन् म्हणे पंधरा दिवस या गोष्टीचा—") 

" विचार करून मी एक गोष्ट मनाशीं ठरविली आहे आणि ती तूं ऐकली पाहिजेस. "

( " अरे वा. इतका तुमचा अधिकार आहे वाटतं माझ्यावर ! " )

" काय ? ऐकणार ना ? "

ती हंसली. " अहो पण काय ठरवलं आहांत तें सांगा तर खरं. ? "

" मी तुला मुंबईस घेऊन जाणार आहे. "

ते शब्द ऐकतांच तिच्या अंगावर आनंदाचे शहारे एकदम उभे राहिले. ती त्याच्याकडे पहात राहिली. तिला म्हणावंसं वाटत होतं, पुन्हा, पुन्हा बोला हेच शब्द. परंतु ती उघड कांहींच बोलली नाहीं.

त्यानं विचारलं " पहातेस काय अशी ? ऐकलंस ना मी काय म्हटलं तें ? मी तुला मुंबईस घेऊन जाणार. "

“ येईन मी ” एवढाच उद्‌गार अगदी हलक्या आवाजांत तिच्या तोंडून बाहेर पडला, आणि तिच्या थरथरत्या नाजुक बोटांची त्याच्या मनगटावर हालचाल झाली. ‘ मला तुम्ही घेऊन जाणार म्हणजे काय करणार ? ’ असं त्याला विचारण्याचं तिच्या मनांत देखील आलं नाही. तो तिला मुंबईस घेऊन जाणार होता ! इतकी ती त्याला हवी होती ! या जाणीवेत केवढं सौख्य होतं ! केवढा आनंद होता ! तिला जे समजायला हवं होतं ते एवढंच होतं. त्याला अधिक कांही देखील विचारण्याची तिची इच्छा नव्हती.

परंतु मग त्यानंच आपला बेत खुलासेवार सांगण्यास प्रारंभ केला...

डब्यांत एकदम दिवे लागले, झगझगीत प्रकाश झाला तेव्हां रत्नाच्या लक्षांत आलं की बाहेर अंधार पडला होता. वास्तविक खिडकींतून बाहेर लागलेल्या तिच्या दृष्टीपुढून सरकणाऱ्या झाडाझुडपाच्या, गुराढोरांच्या, आणि माणसांच्या आकृतीचा रेखीवपणा केव्हांच नाहीसा झाला होता. लांब अंतरावर डोंगराची उभी काळी संदिग्ध आकृति, अथवा लांबच लांब पसरलेल्या जमिनीचा वांकडा तिकडा काळा भव्य पट्टा, आणि त्या पार्श्वभूमीवर झाडाझुडपांचे, जनावरांचे आणि माणसाचे काळे काळे रेखाशून्य वांकडे तिकडे हालते ठिपके—असंच दृश्य तिच्या नजरेपुढून केव्हांपासून तरी वेगानं जात होतं. परंतु सृष्टीवरचा प्रकाश केव्हां उडून गेला आणि वस्तुमात्रावर त्यांचे आकार नाहीसे करणारा अंधार अधिकाधिक दाट कसा झपाट्यानें झाला, त्याकडे तिचं मुळीच लक्ष नव्हतं. कोणतं स्टेशन ओलांडून कोणत्या प्रदेशांतून गाडी वेगानं धांवतं होती, आणि पुण्याच्या स्टेशनवर गाडी पोंचायला अजून किती आवकाश होता, ते तिला सांगता आलं नसतं. गाडीचा वेग, खिडकींतून आंत येणाऱ्या वाऱ्याचा झोत, आणि इतर सारे आवाज बुडवून टाकणारा गाडीच्या चाकांचा खडखडाट, या गोष्टींची जाणीव तिच्या मनांत खोल कुठेतरी फक्त अस्पष्टपणानं होती; आणि तिला स्पष्ट संवेदना होत होती ती फक्त श्रीधरच्या शब्दाची आणि अंशतः सहज आणि अंशतः हेतुपूर्वक वरचेवर तिच्या अंगाला होणाऱ्या त्याच्या स्पर्शाची...

दिवे लागून डब्यांत एकदम प्रकाशच प्रकाश झाला तेव्हां ती थोडीशी चमकली. आतापर्यंत भोंवतालच्या साऱ्या गोष्टी ती विसरली होती. आजूबाजूस मागं पुढं माणसं बसलीं आहेत हें तिच्या ध्यानांतून अजिबात गेलं होतं. दोन पांखरांप्रमाणें श्रीधर व आपण दोघं एकटींच साऱ्या जगापासून दूर होऊन अंतराळांत कुठेंतरी तरंगत आहोंत अशा भासाच्या नाजुक सुखांत ती होती.दिवे लागतांच तिच्या त्या सुखाला एकदम धक्का लागला, आजूबाजूच्या लोकांचं अस्तित्व एकदम तिच्या ध्यानांत आलं. इकडे तिकडे बावरल्याप्रमाणें दृष्टि टाकीत ती स्वतःशीं म्हाणाली ही सारी माणसं इतका वेळ अशीच या ठिकाणीं होतीं ? त्यांचा तिला थोडासा राग आला...परंतु डब्यांत विजेचा प्रकाश अगदी काठोकाठ भरून सांडत होता, चांदणं खचल्यासारखं वाटत होतं, उतारूंच्या बॅगांच्या चापासारख्या आणि कुलुपासारख्या साध्या वस्तूदेखील त्या प्रकाशानं उजळून निघून चमचमत होत्या, तें पाहून मात्र तिच्या हृदयांतल्या प्रसन्नतेला साजेशी साद मिळाल्यासारखं तिला वाटलं. कुणाला कुणास ठाऊक तिनं मनाशीं म्हटलं " थॅंक्स " तिची नजर पुन्हा खिडकीबाहेर गेली तो डब्यांच्या खिडक्यांखिडक्यांतून बाहेर पोंचलेले प्रकाशाचे सारखे चौकोनी पट्टे काळ्या जमिनीवर आळसानं तरंगत राहिल्या-सारखे तिला दिसले...तिला एकदम मोठी जांभई आली. ती तिला दाबतां येईना. तिनं आपला डावा पंजा उघड्या तोंडावर टेकल्यासारखं केलं.

श्रीधरनं विचारलं " कंटाळलीस होय ? "

तिनं मान हालविली, मागच्या गादीवर डोकं रोवल्यासारखं करून आपल्या नाजूक शरिराची किंचित् कमान केली, आणि तितक्यांत श्रीधरची नजर आपल्या पदरापाशीं आहे हें लक्षांत येतांच तिनं दोन्ही हात अंगाभोंवतीं लपेटल्यासारखं केलं —आणि मग तिला एकदम मोठ्यांदा हंसूं आलं.

श्रीधर म्हणाला " आतां खडकी, आणि त्यानंतर शिवाजी नगरच !' '

जें त्याच्या ओठावर आलं होतं तें तो मुळीच बोलला नव्हता हें तिनं ओळखल्याचं त्याच्या लक्षांत आलं तेव्हां तोहि मोठ्यांदा हंसला.

## बस नंबर बारा

शिवाजीनगर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरून बाहेर यायला त्या दोघांना थोडा उशीर झाला. रत्नाच्या डाव्या पायातल्या सॅंडलची उंच टाच मध्येंच निखळली, अन् ती अंधारांत कुठें पडली ती सांपडेना. मग ती तशीच चालत निघाली, अन् एक पाऊल उंच एक सखल अशीं पावलं टाकतांना तिला हंसूं येऊं लागलं. तीं दोघं स्टेशनाच्या बाहेर आलीं तों बस् हाललेली त्यांना दिसली. त्यांनीं हात उंच केले, आरोळ्या ठोकल्या आणि तीं धावत सुटलीं. रत्नाला धड चालतांही येत नव्हतं, पण श्रीधरनं तिला ओढीतच नेलं. गाडी थांबली होती. तिच्याजवळ पोंचतांच त्यानं तिच्या खांद्याखालीं हात घालून तिला वर ढकललं, आणि मग डाव्या हातांतली सूट केस सावरीत तो स्वतः चढला. गाडींत बसायला अगदीं जागा नव्हती. तीं दोघं एकमेकांला खेटून उभीं राहिलीं. पुन्हा सुरूं होतांना बसनं थोडासा झटका खाल्ला तेव्हां त्याचा चांगलाच तोल गेला व त्याचा कोट ओढून रत्ना ओरडली " अहो अहो ! " " It's all right " ( कांहीं नाही, ठीक आहे ) असं उद्गारून त्यानं आधारासाठीं तिच्या दंडाला धरल्यासारखं केलं. एकदम मिळून हंसल्याप्रमाणें तीं दोघं हंसलीं. कंडक्टर तिच्याजवळ आला, आणि तिला उभं रहावं लागलं हा जणूं त्याचाच अपराध होता अशी चर्या करून तिच्याकडे पहात तो हंसत म्हणाला " माफ करा हं. " रत्नाच्या एकदम लक्षांत आलं कीं आज किती तरी दिवस या कंडाक्टरला आपण रोज दोन वेळां बघत आहोंत. सकाळीं " गुड् मॉर्निंग " अन् रात्रीं " गुड नाईट " म्हणण्यापलीकडे ती त्याच्याशीं कधीं बोलली नव्हती. तिला एकदम वाटलं आपण बोलायला हवं होतं. कारण तो फार चांगला होता. तिच्याशीं तो किती चांगला वागत असे...ती श्रीधरबरोबर मुंबईस गेली कीं तो तिला पुन्हा कधी दिसणार नव्हता...आतां केव्हां तरी बोलतां बोलतां श्रीधरला या कंडक्टरबद्दल सांगितलं पाहिजे असं तिनं मनाशीं ठरविलं. तिनं वर मान करून श्रीधरकडे पाहिलं. तिला हंसूं आलं. आज तिला वरचेवर हंसूं येत होतं !...

# ४

तिला फ्रेंच शिकविण्यासाठीं रोज संध्याकाळीं येणारी बाई घड्याळांत सहाचे ठोके पडल्यानंतर लगेच पुस्तक मिटून व आपली मनीबॅग उचलून उठली तर रत्ना मनांतल्या मनांत म्हणे "देव तुझं भलं करो"; परंतु ती जर "उद्यां अमुक धड्यांतला अमुक भाग पाठ करून ठेव" अगर "अमक्या धड्याचं भाषांतर लिहून ठेव" इत्यादी गोष्टी पुनः पुन्हां सांगत रेंगाळूं लागली तर तिला त्या जाडजूड लठ्ठ, प्रशस्त उघड्या वक्षभागावर पुनः पुन्हा निथळूं लागणारा घाम पुसणाऱ्या, चष्मेवाल्या बाईचा मोठा राग येऊं लागे. तिनं केव्हां तरी एका पुस्तकांत वाचलं होतं कीं केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर दुसऱ्या माणसाला आपल्याकडे मान वळवून बघायला लावतां येतं, किंवा उलट आपल्याला नको असलेल्या मनुष्याला उठून जायला लावतां येतं, आपली इच्छा मात्र तितकी जोराची पाहिजे. त्या बाईला उद्देशून ती मनांतल्या मनांत जोरजोरानं म्हणे "ऊठ! ऊठ! जा!" त्या बाईला भायखळ्याच्या ब्रिज क्लबावर जायची घाई असे याची रत्नाला कल्पना नव्हती. तिला वाटे मनांतल्या मनांत जोरानं इच्छा करण्याची आपली युक्तिच यशस्वी होते. त्या युक्तीचा प्रयोग आणखी कोणावर तरी करून पाहिला पाहिजे असं ती मग मनाशीं ठरवी.

फ्रेंच शिकविणारी मास्तरीण जायला उशीर करूं लागली कीं रत्नाला तिचा राग येत असे याचं कारण असं होतं कीं श्रीधरनं तिला जें वेळापत्रक घालून दिलं होतं त्यांतला तो फ्रेंचचा तास अखेरचा होता. तो संपला कीं

तिला सुटी होत असे. ती होते केव्हां आणि दिवाणखान्यांतल्या टेबलावरच्या टेलिफोनपाशीं जाऊन श्रीधरच्या ऑफिसच्या नंबराचे आंकडे डायलवर घाई-घाईनं फिरवून दिवसभर कानावर न पडलेला त्याचा आवाज आपण ऐकतों केव्हां असं तिला झालेलं असे. रिसीव्हर कानाला लावल्यापासून उलट जबाब येईपर्यंतच्या अवधींत कधीं कधीं तिच्या कानावर जे आवाज येत त्यांचा तिला प्रथम प्रथम चमत्कार वाटला होता. टाईपरायटरची खटखट, कुणीतरी पट्टे-वाल्याला मारलेली हांक, क्वचित् एखादे वेळीं रस्त्यावरच्या मोटारीचं हॉर्न देखील तिला ऐकूं येई; व ती मनाशीं आश्चर्य करी कीं ज्या ठिकाणीं श्रीधर दिवसभर असतो तें असलं कसलं चमत्कारिक ठिकाण आहे ? मग तिला हळूं हळूं समजलं होतं कीं मेडोज स्ट्रीट का अशाच कोणत्या तरी नांवाच्या मोठ्या रस्त्यावर श्रीधरचं स्वतःचं ऑफिस आहे, कित्येक मोठमोठ्या व्यापारी कंप-न्यांच्या सल्लागाराचं काम तो करतो, आणि 'स्पेक्युलेशन'चा धंदाहि तो करतो. म्हणजे तो काय करतो याचा तिच्या मनाला बोध होण्यासारखा नव्हता. तिला कळलं तें एवढंच कीं त्याच्या उद्योगाचा पसारा मोठा आहे आणि तो पैसेही पुष्कळ मिळवितो. फोर्ट विभागांत त्याचं स्वतःचं ऑफिस आहे याचा एवढाच अर्थ तिला समजण्यासारखा होता आणि तो तिला पुरेसा होता. एखादे वेळीं डायलवरचे आकडे फिरवून झाल्याबरोबर उलट बाजूला रिसीव्हर उचलला गेल्याचा खटक्दिशीं आवाज होई व स्त्रीचं इंग्रजी बोलणं ऐकूं येई "हॅलो ! कोण बोलत आहे कळेल काय ?"

"मी रत्ना."

"हं ?"

"आहेत कां ?"

"कोण ?"

"श्री—" तितक्यांत तिच्या लक्षांत येई कीं श्रीधरच्या कुटुंबांतलीं माणसं त्याला 'काका' असं म्हणत, आणि तें नांव घेण्याच्या बेतांत ती असे.

पण तितक्यांत ऑफिसमधली ती बाई इंग्रजींत म्हणे, " O, I see. I am sorry he is out."

" केव्हां येतील ?"

" Sorry again, I cannot say,"

रिसीव्हर परत ठेवल्याचा आवाज ऐकूं येई.

पुढें पुढें असं होऊं लागलं कीं तिकडून त्या बाईचा ' हॅलो ' असा आवाज ऐकल्याबरोबरच रत्ना मनांतल्या मनांत समजे कीं श्रीधर कचेरींत नाहीं. शिवाय " मी रत्ना " असं सांगितल्याबरोबर ती बाई " हं ?" असा जो एक विचित्र उद्गार काढी त्यांत ' मला वाटलंच ' असा किंचित् अवहेलनेचा आणि चेष्टेचा अर्थ भरल्यासारखा रत्नाला वाटे, आणि त्यामुळें त्या बाईला तिनं जरी कधी अजून डोळ्यांनी पाहिलं नव्हतं तरी तिच्याविषयी रत्नाला एक प्रकारचं शत्रुत्व वाटूं लागलं होतं.

कधीं कधी मात्र तिनं डायलवरचे आंकडे फिरवून रिसीव्हर कानाशीं टेकून एखाद दुसरा क्षण होतो न होतो तोंच श्रीधरचा ' हॅलो ' असा शब्द तिला ऐकूं येई. ऐकणाऱ्याला एकदम संतोष व्हावा असा त्याच्या आवाजाचा धर्म होता. रत्नाला तर त्याचा तो उद्गार ऐकतांच त्यानं आपल्याला कुरवाळल्यासारखं वाटे. त्या शब्दाच्या सुखाच्या लहरी तिला अनावर होत. डाव्या हातानं कानाशीं धरलेला छोटा रिसीव्हर तिच्या नाजुक थरथरत्या बोटांना जड वाटूं लागे, आणि " मी...रत्ना..." एवढं सांगतांना तिला श्वास अपुरा पडे.

" काय रत्ना ? फ्रेंच मास्तरीण गेली काय ?"

" हो आत्तांच गेली " ती म्हणे, " तुम्ही आज येणार कीं नाहीं ?"

" मी होय ? अं..."

" या ना. आज तीन दिवसांत तुम्ही मला भेटला नाहीं."

" I am Sorry."

" हं, सॉरी म्हटलं कीं संपलं. मी रागावूं काय तुमच्यावर ?"

तो हंसून म्हणे " तें तुला साधायचं नाहीं रत्ना."

" पण प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे ? "

" नकोच तें. मी येतों. "

" या ना. वैनींना सांगूं काय कांहीं तरी चांगलं करा म्हणून ? बाकी तुमचं जेवणाकडे लक्ष असतं कधीं म्हणा ? मला अगदीं आवडत नाहीं तुमची जेवणाची रीत ! "

" तें जाऊं दे. मी केव्हां येऊं तें सांग. "

" हो हो. जसं कांहीं मी म्हणेन तेव्हां येणार आहांत. "

" येईन. "

" मग आत्ता लगेच या तर. मला फिरायला न्या ना. "

" Dear little baby " असं म्हणून श्रीधरनं हंसावं आणि म्हणावं " अं...बरं येतों. "

तें ऐकतांच तिच्या अंतःकरणांत आनंद कांठोकांठ भरून सांडू लागे. आतां आपलं स्नान, पोषाख सगळं श्रीधर येण्याच्या आंत कसं आटपणार अशा विचारानं तिची अगदीं तारांबळ उडून जाई. स्नानगृहांत सुगंधी साबणाचा फेस अंगावर चोळतां चोळतां, आणि नंतर आरशापुढें उभं राहून वस्त्र नेसतां नेसतां ती स्वतःशीं पुनः पुन्हा म्हणे " आतां या सगळ्या गोष्टींना अर्थ आला. "

तिच्या या स्वगत उद्गाराला कारण होतं. तिला पुष्कळदां वाटे पुणं सोडून खुशाल मी मुंबईस आलें खरी, पण इथें आल्यापासून जें हें एकंदर चाललं आहे त्याला कांहीं अर्थ आहे कीं नाहीं ?

श्रीधरबरोबर ती मुंबईस आली ती कसलाहि विचार न करतां. ती आपल्या मनाशीं इतकंच म्हणाली होती, माझं यांच्यावर प्रेम जडलं आहे, हें मला हवेत, हे नेतील तिकडे जाण्यांतच मला सुख होईल. खंडूकाकांनीं तिच्या जाण्याला एकदम संमति दिली नव्हती, परंतु विरोधहि केला नव्हता. श्रीधर चाफेकर म्हणजे किती मोठा माणूस होता तें तिच्यापेक्षांहि त्यांना जास्त कळत होतं. अशी मोठीं माणसं मुलींना फसवितात कीं काय ? शिवाय श्रीधर उच्च जातींतला होता. " माझ्या लाडक्या रतनच्या पायावर चित्पावन ब्राह्मण

लोटांगण घालत येतील " या बाबुरावांच्या दर्पोक्तीची आठवण होऊन ते म्हणाले होते " तुझ्या मानी बापाचे शब्द खरे होणार असं दिसतं. त्यांच्या आत्म्याला खात्रीनं संतोष होईल ". रत्ना पुणं सोडून श्रीधरबरोबर मुंबईस आली होती. त्याच्यावर तिचा पूर्ण विश्वास होता. त्याचं आपल्यावर पूर्ण प्रेम आहे याबद्दल तिची खात्री होती. आपण मुंबईला गेल्यावर श्रीधरशीं आपलं लग्न लौकरच होईल याविषयीं तिला शंका वाटण्याचं कांहींच कारण नव्हतं.

परंतु ती मुंबईस आल्याला महिना झाला. दोन महिने होऊन गेले, तीन महिने लोटले, आणि तरी देखील श्रीधरच्या तोंडून लग्नाचा विषय निघेना तेव्हां तिचं मन बिचकूं लागलं. त्याचं मन तिच्यावर अतिशय जडलं होतं, त्याची प्रीति अगदीं अंत:करणापासूनची होती, ही गोष्ट तिला स्पष्ट दिसत होती. पण लग्नाचा विचार त्याच्या मनात आहे कीं नाहीं त्याचा तिला आदमास लागेना. तिच्या व त्याच्या लग्नाला कसलीच अडचण नव्हती. तो स्वतंत्र होता, खूप पैसे मिळवीत होता, त्याच्या कुटुंबांतील माणसांच्या रुकारावर तो अवलंबून तर नव्हताच, परंतु शिवाय तीं सारीं आधुनिक पुढारलेल्या मतांचीं होतीं. आणि इतकी सारी अनुकूलता असून तीन महिने होऊन गेले तरी श्रीधरनं तिच्यापाशीं लग्नाची गोष्ट एकदाहि काढली नव्हती. तिचं मन बिचकूं लागलं. ज्याचा आपल्याला अर्थ कळत नाहीं असं कांही तरी होत आहे अशा विचारानं तिला भांबावल्यासारखं झालं...

तसं म्हटलं तर तिचे दिवस अगदीं मजेंत जावे अशी व्यवस्था श्रीधरनं केली होती. बापाच्या मृत्युनंतर जिनं साधारण गरीबींतच दिवस काढले अशा रत्नाला श्रीधरनं जवळ जवळ ऐषआरामांत आणून ठेवलं होतं. श्रीधरचे वडील 'दादा' आता म्हातारे झाले होते. त्यांना एकंदर तीन मुलगे. त्यांपैकीं श्रीधर सर्वांत धाकटा. तिघेही विलक्षण हुषार म्हणून नावाजले होते, परंतु तिघाच्याही ठिकाणीं विक्षिप्तपणाचा थोडा फार अंश होता. सगळ्यांत थोरला मुलगा धर्मवेडा निघाला होता. त्यानं लग्न केलंच नव्हतं, आणि वयाच्या पस्तीसाव्या वर्षी बुद्धधर्माची दीक्षा घेऊन तो जो एके दिवशीं घरांतून अकस्मात् नाहींसा झाला

त्याचा अजून पत्ताच नव्हता. तो तिबेटांतल्या एका मठांत आहे असं लोक म्हणत. मधल्या मुलाला यंत्राचं भयंकर वेड होतं, आणि कसला तरी प्रयोग करून पहात असतांना वीजेच्या धक्यानं तो मरण पावला होता. त्याच्या मागं त्याची बायको मुक्ता आणि कुमार नांवाचा मुलगा राहिला होता. म्हातारे दादा, मुक्तावहिनी, आणि कुमार हीं तीन माणसं म्हणजेच श्रीधरचं कुटुंब होतं, आणि या कुटुंबांतच श्रीधरनं रत्नाला आणून ठेवलं होतं. तो स्वतः या घरांत रहात नसे. दुसरीकडे कुठेसा एकटाच रहात असे. आणि फोर्टमध्यें त्याचं ऑफिस होतं. अधुन मधून तो घरीं जेवायसाठीं येई. सुटी असली तर एखादे वेळेस तो सबंध दिवसही घरांत राही. तें सारं त्याच्या लहरीवर अवलंबून असे.

लहरीपणा, विक्षिप्तपणा, हटवाद इत्यादी गोष्टींचं निसर्गानं जणू कांही त्याच्या स्वभावांत असामान्य बुद्धिमत्तेबरोबर समप्रमाणांत मिश्रण केलेलं होतं. मुक्तावहिनी केव्हां केव्हां बोलण्याच्या ओघांत आपल्या नवऱ्याच्या आठवणी काढी, आणि त्याच्या विलक्षण हेकेखोरपणाच्या गोष्टी सांगतां सांगतां अखेर म्हणे, "या चाफेकरांच्या घरांतलीं सारींच माणसं अशी बघा. यांची डोकी तुमच्या आमच्यासारखीं व्यवस्थित ठिकाणावर नाहींत. तिघांहि भावांची एकच तऱ्हा. अन् हा वेडाचा गुण त्यांनीं कांहीं कुठून बाहेरून आणला नाहीं. बापापासूनच घेतला आहे. दादांनीसुद्धां वेडे वेडे थेर कांहीं कमी केले नाहींत. एल. एल. बी. ची परीक्षा पास झाले अन् वकीली करण्याऐवजीं ग्वाल्हेर सरकारच्या सैन्यांत नोकरी धरली. ब्राम्हण–मराठा, हिंदु–मुसलमान असल्या पंक्तिप्रपंचांचा तिथें बुजबुजाट आहे हें पाहिल्यावर वरीष्ठांशीं भांडले, अखेर प्रत्यक्ष महाराजानांच म्हणे फटकळपणें कांहीं तरी बोलले, अन् रातोरात ग्वाल्हेर सोडून मुंबईला आले. वर्तमानपत्र काढलं. तें चालेना. वकीली सुरूं केली. बऱ्यापैकीं जमहि बसला. पण वकीलीचा धंदा घाणेरडा असं जें त्यांच्या मनानं एकदम घेतलं तें घेतलं. डॉक्टर होण्याची लहर आली यांना. चांगले पस्तीशींतल्या सुमारांतले हे वकीलसाहेब हातीं येत चाललेला धंदा खुशाल सोडून विशीच्या

आंतल्या पोरांपोरींबरोबर मेडिकल कॉलेजांत जायला लागले तेव्हां यांना जवळच्या मित्रांनीं देखील वेड्यांत काढलं. पण यांनीं जे एकदां मनाशीं ठरविलं तें सोडलं नाहीं. डॉक्टरीची परीक्षा नुसती पास झाले नाहींत, पहिले आले, बक्षीसं पदकं मिळविलीं. नशीबही असं चांगलं कीं दवाखान्याची पाटी लावल्यापासून पैसा मिळूं लागला. पंधरा वर्षांत लाख दोन लाखांची इस्टेट केली. पण मग यांना झाली एकदम उपरति. शास्त्रावरची श्रद्धा उडाली, धंदा करणं पाप वाटायला लागलं, माणसाचा रोग म्हणजे विकृति दूर करण्याची निसर्गाची धडपड आहे तेव्हां रोग दडपण्याऐवजीं निसर्गालाच काय करायचं तें करूं द्यावं हें तत्वज्ञान डोक्यांत भरलं, आणि एके दिवशी ' धंदा सोडला ' म्हणून हे घरीं बसले ते कायमचे. सारांश काय, तिघांहि भावांत बुद्धिमत्ता आणखी हटवाद हे गुण वडलांकडूनच आले ! चमत्कारिक डोकीं आहेत यांची. कुठल्या कल्पनेच्या आहारी जाऊन कशी भरकटतील त्याचा नेम नाहीं..."

परंतु असले उद्गार मुक्तावहिनी एखादे वेळीच काढीत असे. एरव्ही तिची आपल्या धाकट्या दीरावर फार माया अन् भक्ति असल्याप्रमाणें तिचं वागणं असे. छोट्या कुमाराला तर श्रीधरचा फारच लळा होता. श्रीधर केव्हांहि आला कीं "काका, काका" म्हणत तो सारखा त्याला बिलगलेला असे, आणि श्रीधर आल्यावांचून दोन दिवस गेले तर "काका केव्हां येणार ग ?" असं आईला विचारून तो भंडावून सोडी, आणि नको म्हटलं तरी खुशाल टेलिफोनवर जाऊन विचारी "काका आहेत कां तिथें !...नाहींत ? कुठें गेले आहेत ?...ते आल्याबरोबर त्यांना सांगा कीं कुमारनं तुम्हांला ताबडतोब बोलावलं आहे...तुम्ही आल्यावांचून तो जेवणार नाहीं..."

कुमारच्या गडबडीनं भरलेल्या त्या घरांत अगदीं पहिल्या दिवशीं देखील रत्नाला परक्यासारखं अगर चुकल्यासारखं वाटलं नव्हतं. मुक्तावहिनींचा स्वभाव प्रेमळ आणि सरळ होता. आपला नवरा अपघातांत मरून आपलं संसारसौख्य अकस्मात् कायमचं संपलं हा आपल्यावर मोठा अन्याय झालेला आहे असं तिला अंतर्यामी वाटत असलं पाहिजे. मनुष्याला राग तर यावा परंतु तो कुणावर

काढावा हें मात्र त्याला कळूं नये असं झालं म्हणजे त्याच्या ठिकाणीं एक प्रकारचा जो सूक्ष्म चिडकेपणा येतो तो मुक्तावहिनीच्या ठिकाणीं आलेला होता व तिच्या वागण्यांत आणि बोलण्यांत तो मधूनच एखादेवेळीं प्रगट होत असे. पण एवढी गोष्ट सोडली तर ती स्वभावानं निष्कपट आणि निर्मळ होती. रत्नाला मुंबईस आणून ठेवण्याचा आपला बेत श्रीधरनं आधीं तिलाच सांगितला होता व तिनं त्या गोष्टीस संमति दिल्यावरच त्यानं दादांची संमति विचारली होती. एखाद्या धाकट्या बहीणीचं स्वागत करावं तसं मुक्तावहिनींनं रत्नाचं स्वागत केलं होतं, आणि आपल्याच घरांत कित्येक वर्षांपासून वाढलेल्या मुलीशीं वागावं त्याप्रमाणें दादाहि तिच्याशीं पहिल्या दिवसापासूनच वागूं लागले होते. आणि या सगळयाच्या भरीला कुमारचा लाडिकपणा होता. रत्ना या घरांत येऊन राहिली त्याच्या तिसऱ्या दिवशीं सकाळीं श्रीधर मुद्दाम तिच्या चौकशीसाठीं आला होता आणि तिच्या खोलींत जाऊन तो पाहतो तो कुमारची स्वारी तिच्या मांडीवर चढून बसली होती आणि तिच्याशीं त्याच्या गप्पा चालल्या होत्या.

त्याला पाहतांच तो आनंदानें म्हणाला होता,

" हे काका आले, विचार त्यांना. "

रत्ना म्हणाली " शीः, त्यांना काय विचारायचं त्यांत ? "

त्या दोघांचा कशाबद्दल तरी वाद चाललेला असला पाहिजे.

श्रीधर जवळ येऊन बसतां बसतां म्हणाला, " काय कुमार, कसलं भांडण चाललंय ? काय विचारयचं आहे मला ? "

कुमारच्या आधीं रत्नाच घाईनं म्हणाली, " कांहीं नाहीं. तुमच्यापर्यंत आणण्यासारखं कांहीं नाहीं हं. "

परंतु कुमारनं प्रारंभ केला, " ही म्हणते—"

तो किंचित् थांबला तेव्हां श्रीधरनं हंसून विचारलं " हं, काय म्हणते ? "

"—कीं मला तूं अशी हांक मारीत जाऊं नकोस. मला ताई म्हण, बाई म्हण, वाटेल तें म्हण, परंतु काकू अशी हांक मारीत जाऊं नकोस. "

श्रीधर हंसला.

कुमार पुढें सांगूं लागला "तुम्ही हिला घेऊन येणार म्हणून आईनं मला सांगितलं तेव्हांच मी तिला विचारलं होतं मी तिला काय म्हणूं ? आई म्हणाली काकू म्हण. पण आतां ही माझ्यावर रागावते अन् मला म्हणते अशी हांक मारलीस तर मी तुला मांडीवर बसूं देणार नाही, मी कांहीं तुझी काकू अजून झालें नाहीं—"

"अजून झालें नाहीं एवढीच तक्रार आहे ना हिची ? मग कांहीं हरकत नाही" असं म्हणून श्रीधर मोठ्यांदा हंसला होता.

कुमार तिच्या मांडीवर होता म्हणून नाहीं तर तेथून एकदम उठून पळून जावंसंच रत्नाला वाटलं होतं. मग तिनं फक्त नापसंतीचा चेहरा करून मुरका मारला होता.

श्रीधरच्या बोलण्यांतली खोच, त्याचं हंसणं, आणि रत्नाचं तें मान हाल विणं यांपैकीं कशाचाच उलगडा कुमारच्या मनाला न झाल्यामुळें तो फक्त त्या दोघांकडे आळीपाळीनं टकमका पहात राहिला होता.

हें सगळं ठीक होतं, सुखाचं होतं...

परंतु इंग्रजी, फरेंच, इतिहास इत्यादि विषयांचं रोज नेमानं चार तास शिक्षण घेण्याचा जो लकडा श्रीधरनं तिच्या मागं लावून दिला होता त्याचा तिला वरचेवर कंटाळा येई. अशा प्रकारें शिस्तीनं शिक्षण घेण्याची हौस तिला आतां राहिलेली नव्हती. गाणं आणि कशिदा या गोष्टी तिनं शिकाव्या म्हणून श्रीधरनं जी व्यवस्था केली होती ती तिला पसंत होती. त्या गोष्टींची तिला आवड होती, व त्या शिकण्यांत तिच्या मनाला आनंद होत असे. परंतु इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, इत्यादि विषयांची शिकवणी घेतांना तिच्या कपाळाला आंठ्या पडत. तिला वाटे हें सारं ज्ञान संपादन करण्यावांचून माझं काय अडलेलं आहे ? श्रीधरची ही खटपट कशासाठीं चाललेली आहे ? त्याच्यांत व माझ्यांत बुद्धिमत्तेचं आणि ज्ञानाचं जें महदंतर आहे तें तोडण्याचा हा प्रयत्न कशासाठीं ? आणखी मी कितीही शिकलें तरी त्याच्या पातळीवर मी कधीं येऊं शकेन काय ? कां त्याच्या ज्ञानाचा मोठेपणा जिला कळेल, त्याच्या बुद्धि-

मत्तेचं आकलन जिला करतां येईल अशी स्त्री श्रीधरला हवी आहे ? आणि तशी मी नाही म्हणून मला शिकवून शिकवून तशी करण्याचं त्यानं ठरविलं आहे की काय ? तसं असेल तर श्रीधरचा वेडेपणा नव्हे काय ? कारण एक तर वाघ्याचा पाग्या केला तरी त्याचा येळकोट कां कधी जाणार आहे ? आणि शिवाय मी शिकलीसवरलेली नसले म्हणून बिघडलं कुठे ?

तिला वाटे, माझी प्रीति मी यांना अर्पण केला असतांना यांना आणखी काय पाहिजे ? माझ्या रूपानं मी यांना आकर्षित केलं, माझं प्रेम यांच्या स्वाधीन केलं, एवढ्यानं हे माझे होऊं शकत नाहीत काय ? यांच्या मोठेपणाचा तपशील मला समजण्यासारखा नसला तरी ते फार मोठे आहेत याची जाणीव मला आहे, अन् त्यांच्या मोठेपणाचं कौतुक माझ्या अंत·करणांत ओतप्रोत भरलेलं आहे. एवढी गोष्ट यांना पुरेशी वाटत नाही काय ? यांच्यासारख्या पुरुषाला बुद्धिमत्तेच्या आणि ज्ञानाच्या समानतेखेरीज स्त्री पूर्ण समाधान देऊं शकत नाही कीं काय ?...

या विचारांचीं चक्रं उलट सुलट फिरूं लागली की रत्ना भांबावून जात असे. तिनं जग फारसं पाहिलेलं नव्हतं. तिचा अनुभव मर्यादित होता. पुरुषाच्या प्रीतीचा अनुभव तर ती प्रथमच घेत होती. ती एक अतिशय देखणी आणि अंतःकरणानं तितकीच साधी भोळी अननुभवी मुलगी होती. श्रीधरचं मन आपल्यावर जडलं, आपलं प्रेम त्याला आपण सांगितलं, त्याच्याबरोबर मुंबईस येऊन राहतांना आपण कसला प्रश्न केला नाहीं, कसली अट घातली नाहीं, कसलं वचन मागितलं नाही. मग आपल्या वैवाहिक सुखाला प्रारंभ कां होऊं नये ?...

त्याच्या सतत सहवासासाठीं ती आतुर झालेली होती आणि तसा सहवास न मिळतांच दिवसामागून दिवस जातां जातां तीन महिने होऊन गेले तेव्हां तिचं मन बिचकूं लागलं, साशंक होऊं लागलं, पहिल्या उत्साहाची शक्ति खचल्यासारखी होऊं लागली. राहून राहून तिच्या मनांत येई हें जें सारं चाललं आहे त्याला कांहीं अर्थ आहे कीं नाहीं ?...

परंतु मग एखादे दिवशीं ती टेलोफोनवरून लाडकेपणानं त्याला म्हणे "पुरे झालीं तुमचीं कामं. असाल तसे इकडे या. आपण फिरायला जाऊं." तो 'अं...अं...' असा रेंगाळणारा आवाज काढी, (ती नर्सिंगचा कोर्स घेत होती त्या वेळेस पुण्याच्या ससून हॉस्पिटलमधील एक इंग्रज सर्जन असाच आवाज काढी त्याची तिला आठवण होई) आणि मग तो म्हणे "बरं येतों, आपण लांब फिरायला जाऊं." आणि त्यानं तसं म्हटलं कीं तिच्या मुग्ध मनांतल्या साऱ्या शंका एकदम नाहींशा होत. तो येण्याच्या आंत सारं आटपलं पाहिजे. म्हणून घाईघाईनं स्नान आणि कपडे करतांना ती मनाशीं म्हणत राही "आतां साऱ्या गोष्टींना अर्थ आला!"

कधीं कधीं तो जेवण्यासाठीं म्हणून आला कीं दोघां तिघां मित्रांना बरोबर घेऊन येत असे, आणि मग तो, त्याचे ते मित्र आणि दादा यांच्यांत नाहीं नाहीं त्या गंभीर विषयांवर वादविवाद निघून जेवण एका बाजूसच रहात असे. हिंदु-मुसलमानांची एकी कधीं होणं शक्य आहे कीं नाहीं, रशियाप्रमाणें समाजसत्तावाद हिंदुस्थानांत यशस्वी होण्याचा कितपत संभव आहे, महात्मा गांधी अंतर्यामीं हिंदी मिरासदार आणि भांडवलदार यांचेच कैवारी आहेत कीं काय, ब्रिटिश सत्तेखालीं हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति झाली असं समजणं बरोबर कीं चूक, हुंडणावळीची कोणती पद्धत हिंदुस्थानाला हितकारक होऊं शकेल—इत्यादि विषय त्यांच्यांत एकदां सुरू झाले म्हणजे ते अशा कांहीं अवसानानं बोलूं लागत कीं जणूं त्या त्या प्रश्नांचा एकदाचा निकाल लावल्याखेरीज जेवणाच्या टेबलावरून उठण्याची त्यांची इच्छा नसावी. खरकटया हातांनीं हातवारे करून तावातावानं बोलणाऱ्या त्या पुरुषांचा रत्नाला चमत्कार वाटे. तिच्या मनांत येई ही पुरुष जात किती हास्यास्पद म्हणावी? आपल्या विद्येचा आणि ज्ञानाचा अहंकार यांना जेवणाच्या वेळीं देखील बाजूला ठेवतां येत नाहीं! इतरांच्या मतांवर हल्ला करण्यासाठीं श्रीधर बोलूं लागला कीं बुद्धिमत्तेचं तेज त्याच्या चेहऱ्यावर विशेष खुलून दिसे तें तिला अर्थातच मोहक वाटे. परंतु तिचं मन म्हणे जेवणाच्या वेळीं हा समरप्रसंग कशासाठीं?...ते विषय तिच्या आकलनशक्तीपलीकडचे

असत. ती कांहीं वेळ लक्ष देऊन पाही आणि मग तो प्रयत्न ती सोडून देई. तिच्या उजव्या हाताशीं बसलेल्या कुमारशीं कांहीं तरी घरगुती विषय काढून बोलण्याचा ती प्रयत्न करी. उंच उंच आवाजांत शिरा ताणून बोलणाऱ्या पाहुण्यांकडे कुमार अगदीं टक लावून बघत असलेला तिला दिसला कीं तिला प्रथम प्रथम आश्चर्य वाटत असे, पण मग तिला आढळून आलं होतं कीं कुमारचं लक्ष त्या मंडळींच्या बोलण्याकडे नसे, तर निराळयाच गोष्टीकडे असे. तो हळूच दोन्ही हातांनीं तिचं तोंड धरून आपल्याजवळ आणून तिच्या कानांत म्हणे "तें पाहिलंस काय ?" तिनं हंसंत विचारावं "काय ?" त्यानं म्हणावं "त्या पाहुण्यांचं टक्कल दिव्याच्या उजेडांत कसं तकाकतं आहे तें ? त्या दिवशीं आपण सिनेमांत त्या बाईचा बाप पाहिला तो अगदीं हुबेहुब—" तिनं डोळे मोठाले करून उजवं बोट नाकावर ठेवून असं कांहीं न बोलण्याची त्याला खूण करावी, पण त्या पाहुण्याकडे पाहिलं कीं तिलाही हंसूं यावं. कुमारच्या खोडकरपणांत ती मग न कळत सामील होई. अमका पाहुणा बोलतांना तोंडांतली दातांची खोटी कवळी संभाळण्यासाठीं कांहीं तरी चोखल्यासारखी गालांची हालचाल कशी करतो, अगर दुसऱ्या कुणाच्या झुबकेदार मिशा त्यानं कढीचा भुरका मारला कीं ओल्या अन् पिवळ्या कशा होतात व तावातावानं तो बोलूं लागला कीं त्या कशा थरथरतात इत्यादि प्रकारांकडे ती कुमारचं लक्ष वेधी. दोघांचा तो गुप्त हास्य विनोद सुरूं असतांना कुमार लहान कीं रत्ना लहान तें सांगणं पाहणाऱ्याला कठीण वाटलं असतं इतकी ती त्या बालिश खोडकरपणांत रंगून जाई. आतां आपलं हंसूं मोठ्यांदा फुटणार अशी भीति वाटली म्हणजे मात्र रत्ना एकदम चमकून भानावर येई. तिला वाटे श्रीधरचं आपल्याकडे लक्ष असलं तर तो आपल्याला काय म्हणेल ? शरमल्यासारखी चर्या करून ती हळुच श्रीधरकडे पाही. पण तो वादविवादांत सर्वस्वी गुंग झालेला असे. तिच्याकडे त्याचं यत्किंचित् देखील लक्ष नसे. जणूं ती आपल्या समोरच बसलेली आहे हें त्याच्या गावीं देखील नसे. तें पाहिलं कीं रत्नाला दुःख होई, आणि आश्चर्य वाटे. ज्यावर आपण प्रेम करतों त्या पुरुषाचं लक्ष सतत आपल्याकडे असतं अशा जाणीवेचं समाधान स्त्रीला

हवं असतं. श्रीधरचे आवडते गंभीर विषय निघाले कीं तो आपल्याला सर्वस्वी विसरून जातो तरी कसा याचं रत्नाला मनस्वी आश्चर्य वाटे. ज्या त्याच्या विद्वत्तेमुळें तो आपल्याला व आपल्या प्रेमाला असं सफाई विसरूं शकतो त्याबद्दलचा सूक्ष्म द्वेष तिच्या मनांत तिला नकळत हलके हलके उद्भवूं लागला. आपण शिकावं सवरावं, पुष्कळ शहाणं व्हावं, आपल्याला गंभीर विषयांत गोडी वाटावी, चर्चेत भाग घेतां यावा या हेतूनं श्रीधरनं आपलं शिक्षण चालविलेलं आहे हें तिला एकीकडे कळूं लागलं होतं, पण दुसरीकडे त्याच्या स्वभावांत बौद्धिक समाधानाचा जो असामान्य हव्यास तिला दिसूं लागला त्याबद्दल एक प्रकारचं शत्रुत्व तिला वाटूं लागलं. तें इतकं कीं जेवायला येण्याचं टेलिफोनवर कबूल करतांना " अन् हे बघ, वैनीला म्हणावं मी एकटा येणार नाहीं हं. माझे दोघे तिघे—" असं तो सांगूं लागला की तिच्या मस्तकांत एकदम तिडिक उठे." माहीत आहे " म्हणून ती एकदम टेलिफोन बंदच करून टाकी.

तो एकटा आला म्हणजे मात्र तिला फार बरं वाटे, आणि तो आणि ती दोघंच मिळून सिनेमाला किंवा फिरायला गेलीं म्हणजे तर त्याच्या सहवासांत तिला विलक्षण सुख होई. कांहीं एका विवक्षित परिस्थितींत रत्ना लहानाची मोठी झाली होती. तिचा स्वभावहि तिच्या वयाच्या तरुण स्त्रियांपेक्षां निराळा, अधिक गंभीर होता. त्यामुळें तिला समवयस्क मैत्रिणी अशा कोणीच नव्हत्या. अशा मैत्रिणी एकमेकीला आपापल्या प्रेमसंबंधांच्या हकीगती सांगून एकमेकीचा शहाणपणा बराच वाढवीत असतात. समवयस्क मैत्रिणीच नसल्यामुळें प्रेमविषयक ज्ञान संपादन करण्याचा हा राजमार्ग रत्नाला बंद झाल्यासारखा होता. परंतु नव-तारुण्यांत स्त्रीच्या मनांत ज्या विचारांचे खेळ निसर्गतः सुरूं होतातच ते रत्नाच्याहि मनांत योग्य कालापासून वावरूं लागले होते. शिवाय तिच्या वाचनांत जी पुस्तकं येत त्यांत प्रेमाची वर्णनं असत. पुरुष प्रियाराधन करूं लागला कीं तो आपला अनुराग कोणत्या तऱ्हेनं प्रगट करतो व त्याला आणखी गुंतविण्यासाठीं स्त्री कोणकोणत्या लाघवांचा उपयोग करते याबद्दलच्या अनेक कल्पना तिच्या मनांत कमी अधिक स्पष्टपणें होत्या. श्रीधरच्या एकांतांतल्या गाठीभेटींत आणि

संभाषणांत एकीकडे त्याच्या सहवासाचा आनंद घेताना दुसरीकडे या कल्पना कितपत खऱ्या ठरतात तें पहात राहण्याचा चाळा तिचं मन करी. तो करतांना तिच्या वांट्याला निराशा कधीं येत नसे. केवळ त्याच्या प्रेमाविषयींची तिच्या मनाची शंका तिला वेडेपणाची वाटूं लागे असं नव्हे, तर त्याच्या स्वभावांत रसिकपणा, काव्य, अगदी साध्या गोष्टीतही आनंद निर्माण करण्याची चतुराई आणि हौस असल्याचं तिला आढळून येई.

घरांतून बाहेर पडतांच त्यानं तिला विचारावं " कुठें जाऊं या ? " तुमच्या सहवासासाठी मी भुकेलेली आहें, कुठेंही चला असं म्हणायसाठीं तिच्या ओठांची हालचाल होई परंतु " कुठेंही–" एवढाच उद्गार तिच्या तोंडून निघे, आणि जणूं त्याचंच तिला हंसूं येई. ती त्याच्याकडे हळुच चोरून बघे तेव्हां तिच्या लक्षांत येई कीं आपण जरी तेवढाच उद्गार काढला तरी आपल्या मनांतलं सारं कांहीं श्रीधरनं ओळखलं.

तो विचारी " सिनेमाला जाऊं या ? "—परंतु लगेच म्हणे " नको पण, आपण लांब कुठेंतरी निवांत जागीं जाऊन बसूं. " रस्त्यांतल्या गर्दीचा तिला उपसर्ग होऊं नये म्हणून त्यानं तिचा हात आधीच धरलेला असे. मोठा चौक ओलांडून जातांना एखाद्या लहान मुलाला संभाळून नेल्याप्रमाणें तो तिला नेई. स्टँडवरच्या मोटर-ड्रायव्हरला तो बोट उचलून खुणवल्यासारखं करी, आणि तीं दोघं आंत बसून गाडी चालूं झाली कीं तिचा हात ओढून घेऊन तिच्याकडे पहात तो म्हणे " किती सुंदर दिसते आहेस तूं. तुझ्याबरोबर मला पाहून लोक खचित म्हणत असतील मोठा भाग्यवान आहे बेटा. "

ती म्हणे " मला हिणविण्यासाठीं असं बोलतां होय? मीच तुम्हाला शोभत नाहीं हें माहीत आहे मला. "

" तूं किती सुंदर दिसतेस त्याची तुला कल्पना नाही म्हणून असं बोलतेस."

त्याचा हात आपल्या हातीं घेऊन ती म्हणे " पुरे पुरे, आतां दुसरं कांहीं तरी बोला. "

"तूं अशी जवळ असतांना तुझ्याखेरीज दुसरे विषय मला कसे सुचतील ?"

"म्हणूनच मला शक्य तितकी दूर ठेवतां वाटतं ?"

समुद्रतीरावर खूप आंत जाऊन ओसरलेल्या लाटांनीं ओल्या केलेल्या वाळूवर ती दोघं जाऊन बसलीं कीं कित्येक वेळां श्रीधर आपला व्यवसाय, आपल्या आवडीचे विषय, आपल्याला आवडलेले ग्रंथ, अनेक प्रश्नांचीं इतरांहून भिन्न अशी आपली मतं, याबद्दल बोलत राही. अशा वेळचं त्याचं तें बोलणं तिला कंटाळवाणं मुळींच वाटत नसे. मात्र त्यानं धरून ठेवलेला आपला हात त्याच्या हातीं तसाच राहूं देऊन त्याचं बोलणं ऐकत असतांना तिचं खरं लक्ष बोलण्याच्या विषयापेक्षां त्याच्याकडेच अधिक असे. त्याचं कपाळ किती भव्य आहे, नाकपुड्यांच्या रेखीवपणांत व जिव्हणीच्या रेषेंत त्याची बुद्धिमत्ता आणि करारीपणा किती स्पष्ट दिसत आहे, याचा विचार ती करीत राही. वाऱ्यानं त्याचे केस फारच उडूं लागले कीं त्यावरून प्रेमानं हात फिरविण्याची तिला अनावर इच्छा होई. त्याच्या साध्या कपड्यांकडे बघून ती मनांतल्या मनांत म्हणे, तुम्हाला चांगले कपडे कसे शिवून घ्यावे कांहीं कळत नाहीं. आपण एकत्र राहूं लागलों कीं मी तुम्हाला अशा गबाळेपणानं राहूं देणार नाही. मी तुमच्यासाठीं नेहमी चांगली चांगली उंची कापडं खरेदी करणार, आणखी अगदीं उत्तमांतल्या उत्तम शिंप्याकडून तुमच्यासाठीं कपडे शिवून घेणार. मग तेच तुम्ही नेहमीं घातले पाहिजेत. तुम्ही मोठे आहांत तर मोठ्या माणसासारखं नको कां वागायला ? काय ही कॉलर, काय हा नेकटाय, खरोखर तुम्हाला कांहीं कळत नाहीं...

श्रीधर मध्येंच थांबून तिला विचारी "काय, आलं कां लक्षांत ?"

"आलं" असं म्हणून ती मोठमोठ्यांदा हंसूं लागे.

एखादे वेळीं तिच्या लहानपणच्या हकीगती तो तिला विचारी. तिच्या बापासंबंधीं बऱ्याच आख्यायिका त्यानं इतराकडून ऐकल्या होत्या, परंतु रत्नाच्या तोंडून त्यांच्याबद्दलच्या गोष्टी ऐकण्यांत त्याला विशेष मौज वाटे. तिचं आपल्या

बापावर पराकाष्ठेचं प्रेम असल्यामुळें त्या हकीगती ती सांगू लागली कीं त्यांत ती अगदीं रंगून जाई, व बोलतां बोलतां तिच्या डोळ्यांत चटकन् आसवं येत तीं वडील वारले याबद्दलच्या दुःखाचीं कीं त्यांच्याबद्दलची बोलणीं आपल्या प्रियकराजवळ आपल्याला अगदीं मनःपूत करायला मिळत आहेत याबद्दलच्या आनंदाचीं असत तें तिचं तिलाच कळण्यासारखं नसे. आपल्या वडिलांच्या वागण्याचा एखादा नमुना सांगून रत्ना म्हणे " असे होते ते. "

दोन्ही ओंजळींनीं वाळूचा उंचवटा करतां करतां श्रीधर म्हणे " ते आज असायला हवे होते. "

एकदां रत्नाला चेष्टेची लहर आली. ती म्हणाली, " ते कशाला ? ते नाहींत याबद्दलच आभार माना बरं कां महाराज. माझे वडील असते तर तुमची अशी डाळ शिजली असती होय ? मी फीमेल ' हायस्कुलां'त जात असे तेव्हां विश्रामबागेपासच्या एका घरांतला माणूस माझ्याकडे पाहून हंसायचा आणि वाईट साईट खुणा करायचा. ही गोष्ट मी वडिलांच्या कानावर घातली तेव्हां त्यानीं काय केलं माहीत आहे ? मल्हारी नांवाचा एक म्हातारा शिपाई होता आमच्या घरीं. त्याच्या हातांत एक बेताचा लांबलडक फोक देऊन त्याला ते म्हणाले हिच्या बरोबर आज तूं शाळेंत जा, पण अशा बेतानं जायचं कीं तूं बरोबर आहेस असं कुणाला वाटतां कामा नये. विश्रामबागेपाशीं कोण जो पांचट माणूस आहे म्हणून ही रतन सांगते तो कोणत्या घरांतून तिच्याकडे पाहतो अन् माकडचेष्टा करतो तें बघायचं, अन् बघितल्यावर सरळ घरांत जायचं, कांहीं एक न बोलतां सरळ या फोकाचे त्याच्या अंगावर चार ओढायचे आणखी परततांना इतकंच सांगायचं ' ही कोणाची मुलगी आहे माहीत आहे ? बाबुराव नाईकांची. तिच्याकडे वांकडा डोळा करून पाहणं सोपं नाहीं. माझ्याकडे टक लावून बघत खिडकींत तासन् तास आपण उभे रहात होतां आठवतंय काय ? माझे वडील असते तर असला चावटपणा चालला नसता. त्यांच्यावाचून एकटीच राहिलेली मी तुम्हाला सांपडलें म्हणून तुम्हांला हें सारं साधलं बरं का. "

हें म्हणतांना मोठाले डोळे करून मान हालविण्याचा तिनं अभिनय केला तो मोठा गंमतीचा होता.

श्रीधर म्हणाला " एवढी ऐट मारूं नका बरं कां बाईसाहेब. तुझे वडील असते तरी त्यांनीं कांहीं मला खाल्लं नसतं. जरा निराळ्या मार्गानें मला मोहीम करावी लागली असती इतकंच. "

" निराळ्या म्हणजे जरा सभ्य मार्गानं "

" हं जरा सभ्य मार्गानं. तुझ्या वडिलांच्यापुढें सरळ येऊन उभा राहिलों असतों आणि त्यांना सांगितलं असतं—"

" काय ? "

" कीं तुमच्या कन्येनं माझं चित्त हरण केलेलं आहे. तिच्यावांचून मला अन्नपाणी गोड लागत नाहीं, कामधंदा सुचत नाहीं. झोंप कशी ती येत नाहीं–"

" अरेरे, राजपुत्र अगदी झुरणीस लागला म्हणायचा " असं म्हणून मोठा सुस्कारा सोडण्याचा अभिनय तिनं इतका कांहीं बेमालूम केला कीं तो पाहून श्रीधरला मोठंच हंसूं कोसळलं. हंसता हंसता त्यानं एकदम दोन्ही हात तिच्याभोंवतीं टाकले आणि तिला घट्ट जवळ धरून तिचीं सारखीं चुंबनं घेतलीं.

त्यानं तिला जराशी उसंत दिल्यावर ती म्हणाली " माझ्या मनांत कधीं कधीं एक गोष्ट येते ती सांगूं कां तुम्हाला ?

" सांग. "

" माझे वडील आज असते तर कदाचित् त्यांचं तुमचं भलतंच जमलं असतं. कां म्हणून नाहीं विचारलंत ?' "

" कां ? "

" कारण ते महाविक्षिप्त आणखी आपली स्वारी देखील—"

त्यानं तिला मारण्याचा आविर्भाव केला त्याबरोबर अगदीं लाडक्या आवाजांत लहानशी किंकाळी फोडून ती दूर सरकूं लागली. परंतु दुसऱ्याच क्षणीं त्यानं आपल्या बाहुपाशांत तिला घट्ट धरलं. त्याच्या गळ्यापाशीं तोंड लावून ती म्हणत होती " आतां कसं चिडलं एक माणूस ! "

त्या क्षणीं तिच्या सुखाला खरोखर मर्यादा नव्हती. कारण श्रीधर बुद्धिमत्तेनं आणि ज्ञानानं कितीहि मोठा असला तरी लटक्या रागाचे खेळ तो खेळूं शकतो, आणि आपला सारा मोठेपणा विसरून केवळ लुब्ध प्रेमिकाच्या नात्यानं आपल्या सहवासांत लहानाहून लहान होतो याचा प्रत्यय तिला हवा तितका त्या क्षणीं येत होता.

त्याच्यापासून किंचित् विलग होऊन तिनं सभोंवार दृष्टि टाकली तों दिशा अगदींच अस्पष्ट झाल्या होत्या, किनाऱ्यावरची नारळींची उंच झाडं कृष्णछायां-प्रमाणें दिसूं लागलीं होतीं, दूर अंतरावरची क्षितिजरेषा पुसली गेली होती, समुद्रपाण्याच्या फुगोटीवर चार सहा ठिकाणीं लुकलुकणारे दिवे हेलकावत होते ते बहुधा छोट्या छोट्या पडावांतले असावेत, आहोटीबरोबर समुद्राच्या लाटा आणखी दूर गेल्या होत्या व त्यांचा आवाज अस्पष्ट झाला होता, आणि उजव्या हाताला किनाऱ्याच्या फरसबंद वाटेजवळ माणसांची व वाहनांची जी रहदारी चालली होती ती तर मनुष्याच्या शरीरांतील हृदयाची धडधड कानोसा घेतला तरच ऐकूं यावी तद्वत् कानांवर येत होती ! अर्धवट अंधारांतलं सृष्टीचं तें दृश्य रत्नाच्या मनाला अतिशय मनोहर वाटलं. तेथून तिचा पाय निघेना. फारच उशीर होऊं लागला तेव्हां ती श्रीधरबरोबर परत फिरली व एका हातानं साडीचा सोगा उचलून व दुसऱ्या हातानं त्याला बिलगल्याप्रमाणें धरून ती पावलं टाकूं लागली.

गाडींत बसल्यावर ती श्रीधरला म्हणाली, " आज ज्या ठिकाणीं आपण जाऊन बसलों होतों तें अतिशयच सुंदर ठिकाण आहे. उद्यां आपण इकडेच फिरायला जायचं हं. "

" कबूल " असं तो म्हणाला परंतु लगेच कांहीं आठवल्याप्रमाणें त्यानं म्हटलं, " पण रतन, उद्यां तूं मला माफ केलं पाहिजेस. उद्यां मला वेळ होणार नाहीं. "

" बरं राहिलं, परवां. "

" अं हं, आतां तीनचार दिवस मला फार काम असणार. आपलं फिरणं बंदच—"

रत्नाची मोठी निराशा झाली. अगदी विरस झाल्याप्रमाणे तिला वाटलं. पण तिनं ते बोलून दाखविलं नाही. ती आपल्या मनाची समजूत घालीत होती जातील तीन दिवस या सुखावांचून, पण नंतर तर—

ती घरी परत आली तेव्हा कुमारनं विचारलं " माझ्यासाठी शंख शिपले आणलेस की नाही ? "

" आणले आहेत तर " असं म्हणून त्याला जवळ ओढून घेऊन तिनं त्याचा मुका घेतला आणि शेजारीच उभ्या राहिलेल्या श्रीधरच्या खिशात हात घालून ओल्या रेतीनं माखलेले शंख आणि शिंपले मूठ भरून तिनं बाहेर काढले.

ते घेता घेतां कुमार तिला म्हणाला " काका आपले खिसे तुला खुशाल घाण करूं देतात ? " त्यानं श्रीधरच्या खिशात आपला चिमुकला हात खुपसून अस्तर ओढून बाहेर काढलं त्याबरोबर चांगली मूठभर रेती बाहेर पडली. ती दाखवून कुमार म्हणाला, " शी, शी, काका काय हो हे ? हिला तुम्ही अगदी कसं रागं भरत नाहीं !

ते ऐकून सगळीचजणं मोठमोठ्यांदा हंसली. रत्ना आपल्या मनाची निराशा विसरून गेली.

पण नंतरच्या तीन दिवसांत श्रीधर फिरायला जायसाठी तर आला नाहीच, पण त्यानं घरी तोंड देखील दाखवलं नाही. चवथ्या दिवशी दुपारी एक वाजतां त्यानं फक्त तिला टेलिफोनवरून सांगितलं " रतन मला मद्रासला जावं लागत आहे " आणि तिची भेट न घेतांच तो परस्पर स्टेशनवर गेला. तो गेल्याला सहा दिवस झाले तरी त्याच्याकडून दोन ओळींचं देखील पत्र तिला आलं नाही. कुमार तिला विचारी " काका केव्हां ग परत येणार आहेत ? " ती म्हणे " मला माहीत नाही. " तो आश्चर्यानं म्हणे " हं काय सांगतेस, तुला सांगून गेले नाहीत ? " " खरंच नाही " असं म्हणून ती मान हालवी आणि त्याच क्षणी तिला एकदम रडूं येई.

तिला वाटे अशी काय ही या श्रीधरची तऱ्हा. तो प्रेम करतो तेव्हां इतर सारं विसरून जातो, पण आपल्या उद्योगानिमित्त दूर झाला कीं मलाही अगदीं साफ विसरतो ! हें कसं काय ? याच्या जीवनांत प्रेमाला असं चमत्कारिकच स्थान मिळायचं काय ? याचं सारं जीवित मी व्यापावं, याला पदोपदीं माझी आठवण व्हावी, नेहमी माझ्यावांचून याला चुकल्या चुकल्यासारखं वाटावं, ही माझी इच्छा याच्याकडून कधीं पूर्ण होणं शक्यच नाहीं काय ? असामान्य बुद्धीचा तऱ्हेवाइकपणा आणि लहरीपणा त्याच्या व्यवसायांत आणखीं विचारसरणींत दिसतो तोच माझ्याहि बाबतींत त्यांच्याकडून होणार काय ? आपल्या प्रीतींतल्या स्त्रीविषयींचा हव्यास पुरुषाच्या मनांत अष्टौप्रहर ओसंडून वाहूंच शकत नाहीं काय ? स्त्री आणि पुरुष यांच्यांत या बाबतींत निसर्गानंच फरक ठेवला आहे ? कीं श्रीधरच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा हा परिणाम आहे ? त्याला मी खरोखर किती हवीशी वाटते कुणास ठाऊक ? माझ्यावाचून त्याचं जीवित अडून बसल्यासारखं त्याला वाटावं इतका तो माझ्या ठिकाणीं मनानं गुंतणं शक्य आहे कीं नाहीं ? कां त्याच्या बुद्धीच्या अनेक लहरी आहेत त्यांतलीच माझ्यवारचं प्रेम हींसुद्धा एक लहर म्हणायची ?...

त्याच्या वागण्याचा आपल्या मनाशीं उलगडा करणं तिला खरोखरच अशक्य होई. ती इकडे मुंबईस येऊन राहिली त्याला आतां जवळ जवळ सहा महिने झाले होते. श्रीधरनं सुरूं केलेल्या साऱ्या शिकवण्या यथाक्रम चालल्या होत्या. दादा, मुक्तावहिनी, आणि कुमार यांच्या प्रेमळ सहवासांत आणि ख्यालीखुशालींत ती रहात होती. परंतु या प्रकारांत सुखापेक्षां दुःखच तिला आतां अधिक वाटूं लागे. खंडूकाका तिच्या समाचाराला वरचेवर येत. ते आले कीं दरवेळेस तिला म्हणत " तूं आणि श्रीधर आतां वाट कशाची पहात आहांत ? "

ती वरकरणी हास्य करी. परंतु तिला कांहींच उत्तर सुचत नसे. आणि खंडूकाका गेले म्हणजे एकटीच बसून स्वतःशीं ती प्रश्न करी खरंच श्रीधर कसली वाट पहात आहे ? माझ्यावर हा कसला चमत्कारिक प्रयोग करून पहात आहे हा ? मला बहुश्रुत आणि ज्ञानसंपन्न करण्याचा याचा हा अट्टाहास कोणत्या मुलु-

खाचा म्हणायचा ? माझं रूप आणि माझी प्रीति, एवढ्यानं याच्या मनाचं समाधान होण्यासारखं नाहीं काय ? हा माझा प्रियकर आहे कीं संशोधक आहे ? मी याची प्रेयसी आहे कीं यानं मनाशीं योजिलेल्या एका विचित्र लहरी प्रयोगाची वस्तू आहे ?"

रत्नाचं मन या विचारांनी अगदी गोंधळून जाई. ज्याचं स्वरूप समजत नाहीं अशा कसल्या तरी प्रयोगांत सांपडल्यासारखं तिला वाटे. श्रीधरची बुद्धि जगावेगळी नसती, तो चार सामान्य पुरुषांसारखा असतां तर अधिक बरं झालं असतं असं राहून राहून तिच्या मनांत येई. आपला धीर सुटत चालला अशी तिला भीति वाटे. मग मनाचा धीर कायम ठेवण्यासाठीं ती स्वतःशीच मोठ्यांदा म्हणे " कांहीं झालं तरी माझं त्याच्यावर फार प्रेम आहे. मला तो हवा ! मला तो हवा ! " त्या स्वगत उद्गारांनीं तिचं मन ताळ्यावर येई, आणि मग स्वतःशीच हसणं तिला शक्य होत असे.

# ५

बाहेरच्या दिवाणखान्यांतल्या घड्यांळांत अकराचे ठोके पडलेले मुक्ता-वहिनीनं ऐकले तेव्हां हातांतलं शिवणकाम दूर ठेवून ती आपल्या खोलींतून ओरडली "कुमार! ए कुमार". बाहेरून उत्तर आलं नाहीं म्हणून आवाज अधिक उंच चढवून तिनं पुन्हा हांका मारल्या. पण तरी तिला उत्तर मिळालं नाहीं. कुमारचा आवाज तर तिला मधून मधून स्वच्छ ऐकूं येत होता. रत्नाचं आणि त्याचं एवढं काय बोलणं चाललं होतं कोण जाणे. मग तिनं पुन्हा एकदां मोठ्यांदा हाक मारली, आणि कुमारनं ओ दिली नाहीं म्हणून आपल्या जागे-वरून उठून ती दारापाशीं गेली व "कुमार! अरे गृहस्था अकरा वाजले. तुला निजायला यायचं आहे कीं नाहीं?" असं म्हणत तिनं डोकावून पाहिलं.

कुमार गालिच्यावर पालथा पडला होता. त्यानं आपल्या तंगड्या मागं उचलून जुळवून उभ्या धरल्या होत्या. त्याच्यापुढें कागद पसरले होते त्यापैकीं एकावर रेघा काढण्यांत तो गुंतला होता व मधूनच वर मान करून पेन्सिलीचं टोक जिभेनं भिजवीत रत्नाशीं बोलत होता.

"ए कुमार" मुक्तावहिनी ओरडली.

आतां मात्र कुमारानं ओ दिली. परंतु "अं" एवढाच उद्गार काढून तो रत्नाशींच बोलत राहिला.

"अरे अकरा वाजले."

"वाजूं देत."

" तुला निजायचं नाहीं काय ? "

" मला झोंप नाहीं आली. "

" पण मला आली ना. "

" मग तूं नीज की. मी हलकेच खोलींत येईन अन् काठीनं बटन वर करून तुझ्या कुशींत निजेन. "

" एवढ्या कसल्या कामांत गुंतला आहेस ? "

" आमची अन् काकूंची गंमत आहे ती. तुला सांगायची नाहीं. "

" इश्श " असं म्हणून ती खोलींत परतण्याच्या विचारांत होती. पण मग परतण्याऐवजी " एवढं काय चाललंय पाहूं तरी " असं म्हणत तिनं पुढें पावलं टाकलीं.

ड्रॉइंगच्या जाड कागदाचे तीन चार तुकडे त्यांवर मनसोक्त वांकड्या तिकड्या रेघोट्या काढून बाजूला ठेवलेले तिला दिसले. आणखी एका कागदावर रेघोट्यांचा असाच प्रयोग चालू होता. मुक्तावहिनी कागद उचलण्यासाठीं खालीं वांकली तेव्हां कुमार त्यावर एकदम डावा हात ठेवून म्हणाला,

" हे ग काय आई ? आमची परवानगी घेतल्याशिवाय आमची चित्रं पहायची नाहींत. "

" अग बाई, चित्रं आहेत होय हीं ? " कागदाकडे पहातां पहातां एकदम हंसून मुक्तावहिनी उद्गारली, " हीं कशाची चित्रं आहेत तें आम्हांला समजून सांगा तरी. "

आपल्या आईच्या बोलण्यांत चेष्टेचा हेतु असेल अशी यत्किंचित्ही शंका न घेतां कुमार म्हणाला, " खालीं बैस म्हणजे सांगतों. "

मुक्तावहिनी बसली तेव्हां एकेक कागद तिच्यापुढें धरून तो सांगूं लागला " हा राजपुत्र घोड्यावर बसून निघाला आहे. तो या किल्ल्याचं दार फोडून आंत घुसणार आहे किल्ल्याच्या आंत एक सुंदर राजकन्या आहे. तिला एका राक्षसानं पळवून नेलेली आहे. राजपुत्र येऊन आपली केव्हां सुटका करील म्हणून ती वाट पहात आहे, आणि सारखी रडत आहे—"

मुक्तावहिनी हंसत म्हणाली, "असं असं, हा घोडा वाटतं! अन् त्याच्यावरच्या या रेघा म्हणजे राजपुत्र काय? छान. रेघोटयांची ही गिचमीड म्हणजे किल्याची तटबंदी अन् दार! शाबास! पण कायरे कुमार, तो राक्षस अन् ती रडणारी राजकन्या तर आम्हांला दिसतच नाहीत."

दुसऱ्याला मूर्ख ठरवितांना "हुंः" असा उद्गार मनुष्य काढतो तसा काढून कुमार म्हणाला, "अग तीं कशी दिसतील? ती आंतच आहेत मुळी."

मुक्तावहिनी मोठमोठयांदा हंसूं लागली. तिनं इतर दोन चित्रांचाही अर्थ ऐकून घेतला व नंतर विचारलं, "बरं आतां हें तयार होत आहे हें चित्र कसलं?"

कुमार म्हणाला "काकांना बंगला बांधायचा असला तर त्यासाठीं नमुना तयार करतों आहे मी."

"अरे बापरे! या नमुन्याचा कां बंगला तयार व्हायचा आहे काकांचा? छान, छान. त्यांत माझ्यासाठीं एखादी खोली आठवणीनं ठेव हं. तरी म्हटलं आज काकूबरोबर बाहेर जाऊन जंगी खरेदी करून स्वारी घरीं आली ती कशाची. आपण चित्रकार आहांत असा आपला समज झाला आहे वाटतं?"

"होयच मुळीं. काकू म्हणते मी मोठा चित्रकार होणार आहे. अन् मला लागेल तेवढं ड्रॉईंगचं सामान आणून द्यायचं काकूनं कबूल केलं आहे. नाहीं कां ग काकू?"

"तूं एक वेडा अन् काकू सात वेडी. चाफेकरांच्या घराची वेडाची परंपरा तूं चालवणार म्हणायचा. बरं चल आतां निजायला. चित्रकार व्हायची गोष्ट पडूं दे लांबणीवर उद्यांपर्यंत."

"मी नाहीं येत जा." असं त्यानं उत्तर दिलं तें कांहीशा उद्धट स्वरांतच, अन् तें देताना त्यानं कपाळाला आठीदेखील घातली. त्याच्या आईच्या बोलण्यांतल्या बारीक खोंचा त्याला कळल्या नव्हत्या तरी आपल्या आवडीच्या या उद्योगाची तिनं हेटाळणी केली एवढं त्याला कळलं. तिचा त्याला एकदम

मनस्वी राग आला व तो म्हणाला, " पाहिलीस कशाला आमची चित्रं ? आम्ही तुला दाखवायला आलों होतों होय ? "

" बरं पण आतां फार रात्र झाली. निजायला चल. उठ " असं म्हणून तिनं त्याच्या केसांच्या झुलपांवरून मोठ्या प्रेमानं हात फिरवला.

पण तो एकदम झटकून टाकून कुमार घुश्शांतच म्हणाला " मी येत नाहीं जा. आज मी मुळी तुझ्याजवळ निजणारच नाही. "

" ओहोहो, काय पण राग. माझ्याजवळ निजणारच नाहीं ? बघ हं. "

" बघितलं, बघितलं " कुमार चिडून म्हणाला. ज्या आईला आपल्या मुलाच्या चित्रकलेचं रसग्रहण करतां येत नाहीं त्या आईच्या कुशींत काय निजायचं असा विलक्षण कडवटपणा त्याच्या मनांत त्या क्षणीं उद्भवला होता. लहान मुलं अगदीं प्रेमांतल्या माणसावर देखील बिघडलीं की त्या क्षणापुरती त्याच्या प्रेमाची त्यांना कांहीं किंमत वाटेनाशी होते.

" अरे पण तुझ्याशिवाय मला कशी झोंप येणार ? " असं म्हणून मुक्तावहिनी त्याला जवळ घेऊं लागली.

पण कुमार पुरताच बिघडला होता. आपल्या चित्रकलेचा आईनं उपमर्द करावा म्हणजे काय ? तिच्या हातापासून आपलं अंग दूर करीत कपाळाला घातलेल्या आठ्या तशाच ठेवून कुमार म्हणाला " कां ग तूं ? आईटली !— "

रत्ना एकदम त्याच्या हनुवटीला हात लावून म्हणाली " अं हं, कुमार ! "

" मग ती आमची चेष्टा कां करते " ?

मुक्तावहिनी म्हणाली, " बरं बाबा नाहीं चेष्टा करीत. आमचा कुमार अगदीं मोठा चित्रकार होणार हो. "

" आतां कशाला म्हणतोस ? "

" बरं आता चल. ऊठ. "

मान जोरजोरानं हालवून कुमार आपल्यापुढच्या कागदावरचा बंगला पुरा करण्याच्या कामाला लागला.

" येणार की नाही तूं ? "

" नाहीं. "

" मी एकटीच निजूं ? "

" हूं. "

" बघ हो. पुन्हा मग कधी घेणार नाही जवळ. "

" न घेईनास ? "

रत्ना किंचित् हंसत मुक्तावहिनीला म्हणाली " तुम्ही जा. जरा वेळानं मी आणून पोचवतें त्याला. "

मुक्तावहिनी उठून गेली.

आणि मग थोड्या वेळांत बंगल्याचा नमुना पुरा झाल्यावर " आतां बागेंतलं कारंज तेवढं राहिलं " असं म्हणून कुमारनं पेन्सिल जीभेनं भिजवून तयार केली तेव्हां " पण आतां पुरे. कारंज उद्यां काढूं आपण " असं रत्नानं सांगतांच सारं साहित्य आवरून तर तो उठलाच, परंतु रत्नानं त्याला त्याच्या आईकडे पोंचविला तेव्हां देखील त्यानं कांहीएक तक्रार केली नाही.

त्याचं आणि रत्नाचं विलक्षण जमलं होतं. तो शक्य तितका तिच्या जवळ जवळ असे. त्यानं कांही हट्ट घेतला आणि रत्नानं त्याची समजूत काढली कीं तो ताबडतोब हट्ट सोडून देई. तिचा त्याच्यावर विलक्षण जीव जडला होता. इतर कुणाशीच नव्हे इतक्या आपल्या मनांतल्या गोष्टी तो तिच्याजवळ बोलून दाखवी. त्याच्या चिमुकल्या मनांतले मोठमोठाले बेत ऐकण्यांत रत्नालाहि मोठा आनंद होत असे.

मोठेपणीं आपण कोण व्हायचं त्याबद्दल कुमारच्या मनाचा एकच ठाम निश्चय झालेला नसावा. कारण वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे निश्चय तो बोलून दाखवी. कधीं गवई, कधी कलेक्टर, कधी चित्रकार, अशीं निरनिराळी ध्येयं त्या त्या घटकेच्या आणि परिस्थितींतल्या लहरीप्रमाणें त्याच्या मनांत असत. मात्र आपण कोणीहि झालों तरी मोठे होणार एवढ्याबद्दल त्याचा निश्चय अगदीं पक्का होता. पुष्कळदां मोटार हांकणारा किंवा वीजेची आगगाडी हांकणारा ड्रायव्हर व्हायचं तो ठरवी. पण तें सांगतांना तो म्हणे " मी मोठा ड्रायव्हर होणार"—एकदां तर

पोस्टमन होण्याचा विचार त्याच्या मनाला पटला. परंतु तो देखील रत्नाला सांगतांना त्यानं मारे अभिनय करून रत्नाला सांगितलं "मी मोठा पोस्टमन होणार."

त्याला प्रेमानं जवळ ओढून घेत आणि हंसत रत्ना म्हणाली "होय? फारच छान. आमच्या घरचाच पोस्टमन झाल्यावर मग आम्हाला रोज खूप खूप पत्रं मिळतील नाही कां?

आपल्या आवडत्या माणसासाठी खूप पत्रं घेऊन येणं पोस्टमनला शक्य असतं असं कुमाराला खरोखरच मनापासून वाटत होतं. तो म्हणाला "तूं अगदी काळजी करूं नकोस. रोज तुला इतकाली पत्रं आणून देईन. अन् काका गांवाला गेले कीं तूं वाट पहात बसतेस ना, त्यांच्या पत्राची अशी वाट पहावी लागणार नाही मग तुला."

"असं काय?" असं म्हणून रत्नानं त्याचा एक मुका घेतला आणि विचारलं "पण तूं मोठा पोस्टमन होणार म्हणजे काय?

पोस्टमनच्या मोठेपणाबद्दल कुमारनं आपल्या मनाशी कांही निश्चित कल्पना केलेल्या होत्या असं तिला आढळून आलं. कारण तिचा प्रश्न ऐकून तो घोंटाळला नाही. त्यानं एकदम उत्तर दिलं "मोठा म्हणजे एकच पिशवी गळ्यांत अडकवून पायांनीं चालत येणारा पोस्टमन होणार नाही मी."

"मग?—"

"दहा बारा पिशव्या भरून आणणार मी. आणि चालत येणार नाही कांहीं. मोटारीनं येणार. आणखी जिने चढून दारादारांत डोकावून मी नाहीं कांहीं वाटणार पत्रं. खालीं मोटारींत बसून राहून ओरडणार, काकू यांचीं पत्रं आहेत, त्यांनीं तीं घेऊन जावीं! ती. आई हिचं एक पत्र आहे—".

तें ऐकून रत्नाला फार हंसूं आलं. ती म्हणाली "समजलं, समजलं. म्हणजे पोस्टमन आमच्याकडे येणार नाही. आम्ही पोस्टमनकडे धावत गेलं पाहिजे. मग बरीक तूं फार मोठा पोस्टमन ठरशील खरा."

सारांश, मोठं कोण व्हायचं याच्या तपशीलाबद्दल जरी कुमारचे निश्चय वेळोवेळीं बदलत होते तरी मोठं होण्याचा त्याचा निश्चय केव्हांही बदलत नसे, तो अगदीं पक्का ठरलेला होता. आणि या निश्चयाप्रमाणेंच आणखी एक निश्चय तो रत्नाजवळ वरचेवर बोलून दाखवी. तो म्हणजे इंग्लंडला जाण्याचा. मोठं होण्यासाठीं इंग्लंडला जायलाच पाहिजे असं त्याच्या मनानं घेतलेलं होतं, आणि या बाबतींत श्रीधरचं उदाहरण त्याच्या डोळ्यासमोर सारखं होतं हें रत्नाला उघडच दिसत होतं. कारण तो नेहमीं म्हणे "काका नव्हते कां मोठं व्हायसाठीं विलायतेला गेले ? तसा मी जाणार."

एकदां त्यानं रत्नाला विचारलं, "काका विलायतेला होते तेव्हां ते तुला चित्रांचीं कार्ड धाडीत असत कां ?"

ती म्हणाली "अरे मला कशीं धाडतील ? त्यांची माझी ओळख नव्हती त्या वेळेस."

जणूं तिचं एक मोठंच वैगुण्य आपल्याला कळलं अशा आविर्भावानं आपल्या उजव्या हाताचीं बोटं आधीं जुळवून आणि मग तीं तिच्या अंगावर झाडल्यासारखीं करून तो म्हणाला "हात्तिच्या !"

त्याचा गर्व थोडा कमी करण्यासाठीं रत्नानं विचारलं "तुला येत होतीं होय त्यांचीं पत्रं ?"

"मला नाहीं, मी फार लहान होतों. पण आईला येत असत. आणखी त्यांत जेवढीं चित्रांचीं कार्ड होतीं तीं सगळीं आईनं माझ्याजवळ ठेवायला दिलीं आहेत. कुणालाही तीं मी दाखवित नाहीं. पण तुला पाह्यचीं असलीं तर दाखवीन."

"वा ! पाह्यचीं असलीं तर म्हणजे ? पाह्यचींच आहेत."

"दाखवतों हं" असं म्हणून त्यानं आपल्या पेटींतल्या वस्तू भरारा उपसून बाहेर काढायला प्रारंभ केला. काकांचीं तीं पत्रं फार महत्वाचीं आणि सहसा कुणाला दाखवायचीं नाहींत म्हणून त्यानं अगदीं तळाशीं ठेवलीं होतीं; व आतां तीं रत्नाला दाखवण्याची त्याला घाई झाल्यामुळें पेटींत भरलेल्या

बाकीच्या वस्तू उपसून इकडे तिकडे पसरण्यांत आपण कांही अव्यवस्थितपणा करीत आहोंत याचं त्याला भानच उरलं नाहीं.

चांगली दोन डझनांहून अधिक कार्ड होतीं तीं. एक सबंध बाजू चित्रानें भरलेली, आणि उलट बाजूच्या अर्ध्या भागावर पत्ता अन् अर्ध्या भागावर मजकूर अशींच तीं पत्रं असल्याचं रत्नाला दिसून आलं. तिनं एकेक कार्ड पुढें धरलं कीं 'हा समुद्र आहे बरं का तिकडला' 'हा बाजार–रस्ता आहे' असं कुमार तिला समजावून सांगे. ती चित्राकडे थोडंसं पाही. उलट बाजूवरचा श्रीधरच्या हस्ताक्षरांतला मजकूरच वाचण्याची तिला अधिक उत्सुकता वाटे. परंतु तिनं दुसरं कार्ड उचलून त्याच्यावरचं चित्र पहावं म्हणून कुमार तिला घाई करी त्यामुळें झटकन् जेवढा मजकूर वाचून टाकतां येईल तेवढ्यावरच उत्सुकता भागवणं तिला भाग पडे.

चार पाच कार्ड अशा प्रकारें चाळल्यानंतर बाकींचीं न पाहतांच रत्ना तीं सारीं कुमारच्या हातांत परत देणार होती, परंतु तितक्यांत तिनं उलटलेल्या कार्डावर तिची नजर जातांच तिनं चमकल्यासारखं केलं व ती पहातच राहिली! त्या कार्डावर एक फोटो होता तो तिला चमत्कारिक वाटला. श्रीधर आणि एक तरुण इंग्रज मुलगी एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून व एकमेकाला बिलगून हंसत त्या फोटोंत उभीं होतीं! रत्नानं कपाळाला आठी घालून त्या फोटोकडे पाहिलं. त्या मुलीचा पोशाख साधाच होता, आणि तिचं रूपहि सामान्यांतलंच होतं. तिच्या दोन डोळ्यांत अंतर अगदी कमी होतं, आधींच बारीक असलेले डोळे उन्हाच्या तिरपेमुळें आणखी बारीक केलेले दिसते होते, कपाळ अगदीच अरुंद होतं, आणि हंसण्यामुळें उघडे पडलेले दांत वांकडे तिकडे होते. परंतु तिचं नाक मात्र तरतरीत होतं, एकंदर चेहऱ्यावर बुद्धिमत्तेची छटा स्पष्ट दिसत होती, पिंग्या केसांची ओघळती झुलपं मोहक वाटण्यासारखीं होतीं, आणि उघड्या हातापायांवरून, खांद्यांच्या रुंदपणावरून व उभं राहण्याच्या धाटणी-वरून तिच्या बांध्याची ऐट आणि मजबूतपणा स्पष्ट दिसत होता. "ही कोण मुलगी?" असा प्रश्न केल्याप्रमाणें रत्ना पहात राहिली. तिनं कार्ड उलटून मागचा मजकूर पाहिला त्यांत चार सहाच ओळी होत्या. "हें समुद्रकांठावरचं

एक हवेचं ठिकाण आहे. लहानशा खेडेगांवासारखंच आहे, परंतु फार रम्य आहे. इथं तीनच दिवस आम्ही राहणार आहोंत. नंतर लंडनला परत जाऊं, वहिनी, माझी मार्था तुला आवडते कां सांग. तुझं पत्र नेहमीप्रमाणें थॉमस कुकच्या पत्त्यावरच येऊं दे."

मागच्या बाजूचा फोटो पहात असतांना "ही कोण मुलगी?" या स्वतःच्या प्रश्नाचं रत्नानं आपल्या मनानं उत्तर काढलं होतं तें असं कीं असेल कोणी तरी. विलायतेत जाणाऱ्या आपल्या लोकांबरोबर ख्यालीखुशालीत हिंडायला तिकडच्या पुष्कळ गौरकाय तरुणी तयार असतात...पण असं अगदी गळ्यांत गळा घालून उभं रहायचं आणि फोटो काढून घ्यायचा?...तिकडल्या रीतीरिवाजांचा हा एक प्रकार असेल. त्याला कांही जास्त अर्थ नाहीं...

मनाचं जें असं समाधान रत्नानं करून घेतलं होतं तें पाठीमागच्या त्या मजकुरापुढें टिकेना. 'इथें तीनच दिवस आम्ही रहाणार आहोंत' असं वाचल्याबरोबर तिच्या त्या समाधानाला पहिला धक्का बसला होता. मात्र तो बसला तरी तिकडच्या रिवाजांत या गोष्टीचाही अंतर्भाव होत असेल अशी स्वतःची समजूत घालून तिनं आपलं समाधान सावरलं होतं. पण 'वहिनी, माझी मार्था तुला आवडते कां सांग' हें वाक्य वाचल्याबरोबर मात्र तिचं समाधान अजिबात ढासळलं, 'माझी मार्था' या शब्दप्रयोगाचा अन्वय तिला लावतां येईना. केवळ मैत्रिणीबद्दल असं लिहिणं तिला शक्य वाटेना. आणि समजा मैत्रिणीसंबंधी असा लिहिण्याचा प्रघात विलायती शिष्टाचारांत असला तरी ही मार्था कां कोण जी होती ती आपल्या वहिनीला आवडते कीं नाहीं तें श्रीधरनं कशासाठी विचारावं?...

रत्नानं कार्डावरचा मजकूर पुन्हा एकदां वाचला, कार्ड उलटून फोटोकडे पुन्हां एकदां बघून घेतलं, आणि मग कुमारकडे वळून तिनं हंसत विचारलं "आजच्या दिवस माझ्याजवळ राहूं देत हीं चित्रं?

तो म्हणाला "तें कां, तुला आवडलीं असलीं तर कायमचीच ठेव कीं तुझ्याजवळ!" आणि मग बाहेर काढलेल्या साऱ्या वस्तू तो भराभर पेटींत कोंबू लागला.

रात्री तिनं मुक्तावहिनींच्या कानांत हलकेंच सांगितलं, " कुमारला झोंप लागली म्हणजे माझ्या खोलींत या. तुमच्याशीं मला कांहीं बोलायचं आहे. " त्याप्रमाणें मुक्तावहिनी आल्यावर तिला प्रेमानं कॉटवर आपल्याजवळ बसवून घेऊन तिनं प्रस्तावना केली, " मी एक प्रश्न तुम्हांला विचारणार आहे. अन् त्याबद्दल तुम्हांला जें कांहीं माहीत असेल तें सगळं, माझ्यापासून कांहीं देखील लपवून न ठेवतां, मला सांगण्याचं वचन देत असाल तरच मी विचारणार आहे. नाहीं तर नाहीं. "

मुक्तावहिनींची चर्या गोंधळल्यासारखी झाली, परंतु ती म्हणाली, " विचारा. "

" विचारूं ? बघा हं. "

" इश्श, बघायचं आहे काय त्यांत ? तुम्ही असं हडसून खडसून कां बोलतां आहांत तेंच मला कळत नाहीं. विचारा की खुशाल काय तें. "

सकाळचं ते कार्ड रत्नानं आपल्या वाचण्याच्या पुस्तकांत ठेवलं होतं तें काढून मुक्तावहिनीपुढें धरून तिनं विचारलं, " ही मुलगी कोण ? तुम्हांला माहीत आहे ? "

तें कार्ड हातांत घेतां घेतां वहिनी म्हणाली " ही मार्था ! तुम्हांला माहीत नाहीं ? "

रत्नानं नुसती मान हालविली आणि खालचा ओठ दातांत आवळून धरला.

वहिनींनं क्षणभर तिच्याकडे टक लावून पाहिलं, व नंतर दुसराच कांहीं विचार मनांत आल्याप्रमाणें तिनं प्रश्न केला, " भावजी सरकारी नोकरींत असतांना एलिझाबेथ मार्टिन नांवाची एक युरोपियन बाई त्यांच्या नादीं लागली होती हें तुम्हांला माहीत आहे कां ? ती पुढें नवऱ्याला सोडून—"

रत्ना एकदम मध्येंच म्हणाली, " ती हकीगत मी उडत उडत ऐकली आहे. त्यांच्या तोंडून नव्हे. इतरांच्या. तें प्रकरण साधारण माहीत आहे मला, अन् माहीत असूनहि मला त्याचं कांहीं वाटत नाहीं. हे फार देखणे आहेत हा कांहीं यांचा अपराध नाहीं. त्या मार्टिन बाईपैकींच या मार्थाचं प्रकरण असलं तर

मला वाईट वाटण्यासारखं त्यांत कांहींच नाहीं, अन् तुम्ही त्याबद्दल मला आणखी कांहीं सांगूहि नका."

मुक्तावहिनी कांहीं वेळ गप्प राहिली. पण मग ती म्हणाली "मी तुम्हाला आणखी कांहीं सांगितलं नसतं. पण मला जें माहीत आहे तें सगळं, कांहीं लपवून न ठेवतां, सांगण्याचं वचन तुम्ही माझ्यापासून घेतलं आहे म्हणून मला सांगितलंच पाहिजे. मार्थाची गोष्ट मार्टीनबाईसारखी नव्हती. अगदींच वेगळी होती तिचं अन् भावजींचं लग्न झालं होतं."

रत्ना वेड्यासारखी पहातच राहिली.

एकीकडे वहिनींनं सांगितलेली गोष्ट ऐकून तिचं मन भयंकर धसकलं होतं, परंतु 'लग्न झालं होतं' यांतला 'होतं' हा शब्द आपण फार मोठ्यांदा ऐकला असं तिला वाटत होतं व आधारासाठीं तो शब्द तिनं कवटाळून धरला होता.

वहिनी पुढें म्हणाली "पण ही मार्था आगगाडीच्या एका अपघातांत मेली अन् त्याच वर्षी भावजी इकडे परत आले."

रत्ना अजूनहि तिच्याकडे वेड्यासारखीच बघत होती. मध्येंच बोलण्यासाठीं म्हणून तिचे ओंठ थोडेसे हालले, पण तिच्या तोंडून शब्द फुटला नाहीं. तिनं आपला ओंठ आणखी दाबला आणि मग झटकन् डोळ्यांना पदर लावण्यासाठीं तिनं मान खालीं केली. कांहीं वेळानं वर बघून तिनं विचारलं "वहिनी, तुम्ही ही गोष्ट यापूर्वी मला कां सांगितली नाहीं?"

"मला वाटलं भावजींनीं आपण होऊन तुम्हाला हें सारं सांगितलं असेल. तुम्ही आमच्याकडे राहूं लागलांत त्याला आतां जवळ जवळ दहा महिने झाले. तुम्ही दोघं एकमेकांच्या सहवासांत किती तरी आहांत. मी मुद्दाम हा विषय तुमच्याजवळ कशाला काढूं? मात्र मी तो तुमच्यापासून मुद्दाम लपवून ठेवला असंही नाहीं. ही गोष्ट तुमच्यापासून चोरून ठेवण्याचा भावजींचाहि हेतू असेल असं वाटत नाही. कारण त्यांत गुप्त असं कांहीच नाहीं. मार्था आज जिवंत असती तर गोष्ट निराळी होती. पण भावजी इकडे येण्यापूर्वीच ती मेली. तेव्हां भावजी तुमच्याशीं

प्रतारणा करीत आहेत अशांतलाहि भाग नाही. किंबहुना त्या मार्टिनबाईच्या संबंधांत भावजींच्यावर थोडा तरी लोकापवाद येण्यासारखा होता, या मार्थाच्या बाबतींत तसं कांहींच नाहीं. भावजींनी तुम्हाला ही गोष्ट केव्हांच सांगितली असेल अशी माझी समजूत. सांगितली नसेल तर तें जरासं आश्चर्य खरंच. पण त्यांच्या स्वभावांत विक्षिप्तपणा आणि लहरीपणा किती आहे हे आतां माझ्यापेक्षां तुम्हाला जास्त माहीत झालं आहे. तेव्हां ही गोष्ट जरी आज तुम्हाला प्रथमच नव्यानं, अन् भावजींकडून नव्हे माझ्याकडून कळत असली तरी तिचा तुम्ही आपल्या मनावर बिलकूल परिणाम होऊं देतां कामा नये. तुमचं त्यांच्यावर अगदी भयंकर प्रेम आहे हें मला अगदीं उघडच दिसत आहे. अन् भावजी विक्षिप्त, अहंकारी, लहरी, अन् हट्टी असले तरी त्यांना तुम्ही आपल्या प्रेमानं अगदी पुरत जिंकलं आहे याबद्दलही मला शंका नाही. तेव्हां तुम्ही आपल्या मनांत कसलाहि विकल्प आणतां कामा नये. अगदी आनंदांत राहिलं पाहिजे. तुमच्या अन् भावजींच्या लग्नाची आम्ही सारी जणं वाट पहात आहोत. काय, आलं कीं नाही लक्षांत ?

रत्नानं नुसती मान हालविली. हुंदका आवरून धरल्याप्रमाणें तिची चर्या झाली होती.

तिला झटकन जवळ घेऊन मुक्तावहिनी म्हाणली, " हं हं, हें काय ? डोळ्यांत पाणी काय म्हणून आणायचं ? त्यांचं तुमच्यावर फार प्रेम आहे. आता कसं हंसू आलं ? हंसा पाहूं मोठ्यांदा. "

" हें काय हो वहिनी ! " असं म्हणून रत्नानं तिच्या कुशीत आपलं मस्तक घातलं. त्या स्पर्शानं तिला प्रथम रडण्याचा मोठा कढ आला. पण तो लगेच विरला. आणि मग मान तशीच वहिनीच्या कुशीत ठेवून ती हंसत सुटली.

परंतु रत्नाचं तें हंसणं एकांतांत टिकण्यासारखं नव्हतं. श्रीधर मुंबईसच असता तर तो भेटल्याबरोबर तिनं त्याच्याजवळ मार्थाचा विषय काढला असता कीं तिनं तो आपल्या मनांत ठेवला असता कोण जाणे ! पण आज मुळीं श्रीधर मुंबईत नव्हताच. कलकत्ता, नागपूर, मद्रास, दिल्ली अशा दूरच्या

कुठल्या तरी बड्या व्यापाऱ्याचं त्याला मधूनच तारेनं आमंत्रण येई कीं अमुक बाबतीत तुमचा सल्ला हवा आहे, निघून या, आणि तो नाहींसा होई. त्याप्रमाणेंच आज तो परगांवी गेलेला होता. तो गेला की दहा-दहा बारा-बारा दिवसांत त्याचं पत्र येऊं नये हें ठरल्यासारखंच झालं होतं, व या खेपेसही त्याच्या पत्रावांचून आठवडा होऊन गेला होता. तो परत केव्हां येणार त्याची तिला कल्पना नव्हती. त्याच्या विक्षिप्त लहरी स्वभावाच्या खात्याला ही गोष्ट जमा करून स्वस्थ बसण्याची संवय रत्नाला खरं म्हणजे आतां झाली होती, परंतु आज ती तिच्या उपयोगी पडेना. ज्याचं आपल्यावर मनस्वी प्रेम आहे त्याला पदोपदीं आपली आठवण व्हावी, आपल्यावांचून चुकल्यासारखं व्हावं, आणि नुसतंच होऊं नये तर तसं त्यानं सांगावं, दूर जावं लागलं तर पत्रांत तसं लिहावं, अशी प्रेमांत सांपडलेल्या व प्रेमाच्या काव्याचा परोपरीनं उपभोग घेऊं इच्छिणाऱ्या व्यक्तीची साहजिक अपेक्षा असते. रत्नाचीहि तशी अपेक्षा होती, ती श्रीधरनं चुकून माकून नव्हे तर पद्धतशीरपणे नेहमींच अपूर्ण ठेवावी याचं जे दुःख ती आताशा समजुतदारपणा आणून विसरत असे ते तिला आज विसरतां येईना. आणि या दुःखाच्या निमित्तानं तिचं मन आणखी मोठाल्या तक्रारी पुढे आणूं लागलं. एलिझाबेथ मार्टिन या बाईच्या व श्रीधरच्या प्रेमसंबंधाच्या गोष्टी तिच्या कानावर आल्या होत्या परंतु त्या मनावर घ्यायच्या नाहीत असं तिनं ठरविलेलं होतं. श्रीधरशीं बोलतांना त्या गोष्टीचा उल्लेख तिनं कधीही केला नव्हता. किंबहुना त्याच्या प्रत्यक्ष सहवासांत ती असली कीं तिला खरोखरच त्या गोष्टीची आठवण देखील होऊं नये इतकी ती परमावधीच्या सुखांत असे. यांच्या पूर्वचरित्राशीं मला काय करायचं आहे, आतां ते माझे आहेत अन् पुढेंही सदा असेच माझे असतील अशी तिची प्रमाणिक भावना होती. श्रीधरहि तिच्याजवळ कधी देखील एलिझाबेथच्या नांवाचा उल्लेख करीत नसे, आणि तिला वाटे तो असं वागतो तेंच बरोबर आहे. परंतु आज मात्र नेहमीची ही समजूत तिला पटेना. तिच्या मनांत येऊं लागलं एलिझाबेथचं प्रकरण माझ्यापासून मुद्दाम लपवून ठेवल्याप्रमाणें यांनीं कां वागावं ?

यांनी मला विश्वासांत कां घेऊं नये ? यांनीं मला एखादे वेळेस असं कां सांगू नये की एलिझाबेथबद्दलची अशी अशी हकीगत आहे, परंतु त्यांत खऱ्या प्रेमाचा कांहीं भाग नव्हता, खरं प्रेम प्रथम तूंच मला शिकवलंस ?...म्हणजे एलिझाबेथच्या नांवाचा उच्चार देखील न करण्याचं श्रीधरचं जें धोरण तिला आजपर्यंत स्वाभाविक आणि बरोबर वाटत होतं तेंच तिला आतां दोषास्पद वाटूं लागलं. आपलं अंतःकरण पुरतं उघडं न करतां वागल्याप्रमाणे त्याचं हें वागणं होत आहे हाच विचार तिच्या मनांत बळावूं लागला. अर्थात मार्थाच्या हकीगतीकडेही ती त्याच दृष्टिकोनां न पाहूं लागली. श्रीधरचं आणि त्या इंग्रज मुलीचं लग्न झाल्याचं मुक्तावहिनींकडून तिला जसं कळलं तसंच तिच्या मृत्युमुळें त्या लग्नाचा आता कांहीं संबंध उरला नाहीं ही गोष्टही तिला कळली होती. अर्थात् आपल्याला फसविण्यासाठीं श्रीधर आपल्या चरित्रांतला एखादा रहस्यपूर्ण कलंक आपल्यापासून लपवून ठेवीत आहे असं वाटून घेण्याचं रत्नाला कांहींच कारण नव्हतं. परंतु आज जवळ जवळ वर्षभरांत त्यानं मार्थाचा उल्लेखही कधी केलेला नसावा हें रत्नाला फार चमत्कारिक वाटण्यासारखं खचित होतं. आणि ज्या अर्थी त्यानं मार्थाची गोष्ट आपल्याला सरळ सांगितली नाहीं त्या अर्थी आपल्याला त्यानं अजून पूर्ण विश्वासांत घेतलेलं नाहीं असं वाटून त्याचा तिला खेद वाटावा हेंही साहजिक होतं...

त्यामुळें मुक्तावहिनी उठून गेल्यावर ती जेव्हां अंथरुणावर एकटीच पडली तेव्हां तिचं हसणं आणि तिचा आनंद लगेच मावळला. 'भावजींच्या आणि तुमच्या लग्नाची आम्ही सारीजणं वाट पहात आहोंत' हें मुक्तावहिनींच्या तोंडचे शब्द प्रत्यक्ष ऐकतांच तिच्या अंतःकरणांत सुखाची लहर उठली होती, परंतु आतां त्याच शब्दांचं तिला दुःख वाटूं लागलं. कारण तिच्या मनांत वाढत गेलेलं आणि साचलेलं दुःख या विचाराचंच होतं की आपल्या व श्रीधरच्या लग्नाची अपेक्षा भोंवतालची सारीं माणसं करीत असून तें प्रत्यक्ष घडण्यांत हा एवढा विलंब श्रीधर कशासाठीं होऊं देत आहे ? रोज निजण्यापूर्वी अंथरुणावर पडल्या पडल्या ती आपल्या सुखदुःखांचा हिशोब करून पाही तेव्हां तिच्या मनांत येई, मी आणि श्रीधर एकत्र केव्हां राहूं लागणार ? ऑफिसांतलं काम आटपून त्यानं संध्याकाळीं आपल्या दोघां-

च्याच घरीं यावं, आपल्या दोघांच्या प्रेमाच्या गुजगोष्टीत तिसऱ्या कुणाचा वांटा नसावा, अष्टौप्रहर त्याची परोपरीची काळजी मला करता यावी, एकमेकाच्या आलिंगनांत झोपी जातांना दुसऱ्या दिवशींचे बेत मी अन् त्यानं मिळून करावेत, हें सुख मला केव्हा मिळणार ? या सुखासाठीं मी किती अधीर आहे ते श्रीधरला कळत नाहीं काय ? हा मला अशी वाट पहायला कां लावतो आहे ? शिक्षणानं आणखी ज्ञानानं मला मोठी करण्याचा याचा हा हटवादी प्रयोग कशासाठीं चाललेला आहे ? याचं माझ्यावर प्रेम आहे की माझ्या ज्ञानावर असणार आहे ? मी जशी आहे तशी याला पूर्ण आकर्षित करूं शकत नाही काय ?...

असल्या विचारांनी कधीं कधीं तिच्या मनावर मोठा कडवटपणा येई, व ती मनाशी क्वचित् असंही ठरवी कीं उद्यां इंग्रजी, फ्रेंच इत्यादि विषयांच्या मास्तरणी आल्या कीं एकेकीला चालती हो म्हणून हांकून द्यायचं, अभ्यासाची सारी पुस्तकं फाडून फेकून द्यायची, आणखी श्रीधरनं विचारलं तर त्याला स्वच्छ सांगायचं...

या ठिकाणीं मात्र प्रत्येक वेळेस तिची विचारमालिका तुटली होती. कारण छे, छे, श्रीधरला हें आवडायचं नाही ! असं चटकन् तिच्या मनांत येई, व तें आल्याबरोबर वैतागाच्या तिच्या साऱ्या कल्पना भरारा नाहींशा होत.

पण आज तिचं मन हट्टाला पेटलं होतं. मार्थाची गोष्ट प्रथमच आणि अकस्मात् कळल्यामुळें तिचं मन बिथरलं होतं हें खरं, परंतु विषादाचा आणि कांहीशा संतापाचा जो झटका तिच्या मनाला आला तो मार्थाशी श्रीधरचं लग्न झालं होतं याबद्दलचाही नव्हे, किंवा त्यानं ती गोष्ट तिला सांगितली नव्हती याचाहि नव्हे. ज्या गोष्टीसाठीं ती मनांतून विलक्षण उत्सुक होती ती अजून घडत नव्हती, ती न घडावी याचं कारण तिला कळत नव्हतं, तिला ज्ञानसंपन्न करण्याची श्रीधरची खटपट तिला अगदी मूर्खपणाची, खऱ्या प्रेमाला न शोभणारी, आणि म्हणूनच थोडीशी अपमानास्पद वाटत होती. अलिकडे तिला बरोबर घेऊन श्रीधर समाजात मिसळूं लागला होता. तो आपल्याला बरोबर घेऊन हिंडतो फिरतो व मोठ्या सन्मानानं आपल्याला वागवतो हें पाहून तिला आनंदहि होत असे. पण तिची कुणाशीं ओळख करून द्यायची झाली कीं तो म्हणे, या अमुक

अमुक, आणि तिचं व आपलं नातं सांगतांना " माझी मैत्रीण " एवढाच उल्लेख तो करी. तो ऐकला की तिच्या मनांत तीव्र असंतुष्टता निर्माण होई. हें शिकणं सवरणं, सुखांत राहणं, मोठं होणं, श्रीमंत प्रतिष्ठित समाजांत मिसळतांना त्यांच्यांत आपण सहज शोभूं असे रीतिरिवाज संभाळणं व सफाईदार इंग्रजी बोलणं, गंभीर विषयांच्या चर्चेतही भाग घेणं—इत्यादि साऱ्या गोष्टींना कांहीं अर्थ होता काय ? जें हवं म्हणून तिच्या जीवाला खरी ओढ लागलेली होती तें अजून दूरच होतं ! त्यामुळें बाकीच्या या व्यापांना कांही शोभा आहे असं तिच्या मनाला वाटेना. आपल्या प्रेमाची ही विटंबना चाललेली आहे असं तिच्या मनांत राहून राहून येई. तिच्या या असंतुष्टतेची आज परमावधी झाली, आणि त्यामुळें आपली असंतुष्टता श्रीधरपाशीं उघड करण्याचा निश्चय ती करूं लागली. उद्यांपासून—हो, उद्यांपासूनच शिकणं बिकणं अजिबात बंद करायचं, साऱ्या मास्तरणींना रजा द्यायची, पुस्तकं फाडायची फेंकायची नाहीत पण त्यांच्याकडे ढुंकूनही पहायचं नाहीं, आणि श्रीधर आतां गांवाहून परत आला व भेटला कीं त्याला सांगायचं,

" हें सारं मला असह्य झालेलं आहे. हें कशासाठीं चाललं आहे ? मी कोणत्या विश्वासानं पुणं सोडून तुझ्याबरोबर आलें ? केवळ मला मोठी शहाणी करण्यासाठीं तूं आपल्याबरोबर मला आणलंस कीं काय ? तुला पाहतांच पहिल्या दृष्टिभेटींतच माझं हृदय मी तुला दिलं अन् तूंहि मला पाहतांच मोहित झालास ना ? प्रेमाची उत्कटता तुला मला कळली, पुढें थोडासा सहवास वाढतांच ती एकमेकाला आणखी पटली. याहून अधिक काय पाहिजे तुला ? ज्ञानाच्या बाबतींत तुझ्या दर्ज्याला मी कधीं पोंचणं शक्यच नाहीं. तशी मी पोंचेपर्यंत वाट पहायची असेल तर कल्पांतापर्यंत पहावी लागेल. आणि मी ज्ञानानं मोठी झाल्याखेरीज तुझ्या योग्यतेची तुला वाटत नसेन तर तुझं प्रेमच मुलुखावेगळं म्हटलं पाहिजे. अशा प्रेमानं मला आणखी भाजूं नकोस. मला दूर व्हायला सांग. मी निघून जाईन. अगदी दुःखानं तुटलेली फुटलेली होईन, पण तुझ्यापासून दूर जाईन. कारण मला

आता हें सहन होत नाहीं. अरे, ज्यासाठीं जीव अगदीं अधीर झालेला आहे तें आज मिळेल, उद्यां मिळेल, असे किती दिवस मोजूं? कदाचित् मी वेडी असेन. कदाचित् तूं माझ्यावर लुब्ध झालास तेंच चुकीचं असेल. पण खरं खरं तें सांगतें कीं हें ज्ञान, हें शहाणपण, अगर मोठेपणा, यांपैकीं कशातच मला आनंद नाहीं. मला तूं हवास! कायमचा हवास! माझी योग्यता वाढवीत बसण्यापेक्षां माझी योग्यता नसतांनाही मी तुझी झाल्यें आहे, तूं मला आपली समजत आहेस, आणि तुझ्या प्रीतीच्या छायेत तूं मला सदैव ठेवलं आहेस, असं मला म्हणतां आलं तर तेंच सुख मला फार मोठं वाटेल. म्हणून म्हणतें मला आणखी वाट पहायला लावूं नकोस. माझं रूप, माझा देह, माझी प्रीति आणि माझं साधं भोळं मन, एवढाच नजराणा घेऊन मी तुझ्या पायाशीं आले आहे. माझ्याजवळ अधिक कांहीं नाहीं पण जे मी तुला देऊं शकत ते पूर्णत्वानं दिलं आहे. तेवढं तुझ्या सुखाला पुरेसं नाहीं काय? नसेल तर सांग, अन् मला कायमची दुःखांत अन् निराशेत लोट. तें मी सोशीन. पण आतां अधिक वाट पाहणं माझ्याच्यानं होणार नाहीं...

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ती न्हाणीघरांत दांत घाशीत होती तोंच बाल्या दाराशीं येऊन म्हणाला "तुम्हाला टेलिफोनवर बोलावलं आहे". ब्रश चघळीत तिनं विचारलं "कुणी रे?" तेव्हां तो म्हणाला "दुसरं कोण असतंय? काकांचा टेलिफोन आहे."

तिनं दचकून ब्रश एकदम तोंडांतून काढला. बाल्या निघून गेला 'दुसरं कोण असतंय?' हा त्याचा उद्‌गार तिला आठवला. त्याचं तिला सुख झालं नाहीं. तिच्या मनांत आलं, मी त्यांची अन् ते माझे असं हीं सारी माणसं मानताहेत, आणि मी मात्र नुसती वाट पहात बसलें आहे. तिचं मन एकदम खिन्न झालं. रात्रीं करून ठेवलेले सारे विचार आणि ठरवून ठेवलेली सारी बोलणी तिच्या मनांत गोळा झालीं. तिचा धीर आतां तुटला होता, आणि ती अवस्था श्रीधरपासून लपवून ठेवून आनंदानं वागणं तिला अशक्य होतं. आतां श्रीधर भेटला कीं आपल्या मनाच्या वेदना ती त्याच्यापुढें उघड करणार होती. परंतु न्हाणीघरांत उभं राहिल्या राहिल्या त्या क्षणीं तिच्या मनांत एकदम आलं, ज्या श्रीधरशीं आपण सदा

आनंदानं सुखाचींच बोलणीं केलीं त्याच्याशीं रागानं, कडवटपणानं, असमाधानानं बोलण्यासाठीं, मला अमुक पाहिजे म्हणून हट्ट करण्यासाठीं होणारी ती भेट व्हायलाच नको...

पण टॉवेलनं तोंड पुसतां पुसतांच ती दिवाणखान्यांत गेली. आणि तिनं टेलिफोनवरचा रिसीव्हर उचलून भिजलेल्या केसांनीं अर्धवट झांकलेल्या आपल्या कानाशीं धरला.

तिचा शब्द ऐकल्याबरोबर श्रीधर तिकडून आनंदांत म्हणाला "हॅलो, रतन, बरी आहेस ना ?"

"हुं."

"मी आत्तांच सहाच्या गाडीनं आलों."

"हुं."

"नुसतं हुं हुं काय चालवलं आहेस ? नीट बोल कीं."

"हूं."

"हे बघ रतन, आज तुझ्या शिकवण्या बंद, बरं का."

रत्नाचा हात एकदम कांपूं लागला. तिनं आवंढा गिळून विचारलं "म्हणजे काय ?"

"सांगतों, ऐक. प्रवासाहून परत येतांना मी मनाशीं कांही एक गोष्ट ठरविली आहे. अन् ती तुला केव्हां सांगेन असं झालं आहे."

रत्नाच्या एकदम मनांत आलं ज्याची मी विलक्षण वाट पहात आहें तीच गोष्ट हा आतां मला सांगणार काय ? तिनं श्वास सोडला तो तिकडे श्रीधरला खचित ऐकूं गेला असेल. त्यानं विचारलं "ऐकते आहेस ना ?" ती म्हणाली "ऐकतें."

तो पुढें सांगूं लागला "अन् जें मला सांगायचं आहे तें अगदी निवांत-पणी सांगितलं पाहिजे. इथं मुंबईत जमायचं नाहीं. आपण खंडाळ्याला जाऊं. दोन तीन दिवस राहून मग परत येऊं. माझ्या इथल्या कामांतून मी सुटी घेणार

आहे. आज संध्याकाळच्या साडेपांचच्या गाडीनं निघायचं आपण. तुझी तयारी कर. आतां तीन दिवस तुझ्या साऱ्या शिकवण्या बंद!"

आनंदानं नाचणारं आपलं हृदय कसं आवरावं तें रत्नाला कळेना. तिला विनोदाची लहर आली, अन् ती म्हणाली "अहो पण हें पहा, मला येतां येणार नाहीं. Sorry"

"मोठी शहाणी की नाहीं तूं. मी सारी व्यवस्था करून ठेवली आहे"

"पण तीन दिवस माझं शिकणं—"

"बंद राहूं दे!"

"वा हो! माझ्या ज्ञानामृतपानांत असा खंड पडला तर माझा अडाणीपणा—"

"असं, असं. रतन, तूं मोठी चावट आहेस बरं कां."

त्याच्या हंसण्याचा आवाज तिला ऐकूं आला. तिनं हंसता हंसतां विचारलं "पण काय हो—" पण तितक्यांत त्यानं टेलिफोनच बंद केला.

हातांतला रिसीव्हर टेलिफोनवर नीट परत ठेवण्याऐवजी दूर टेबलावर तसाच टाकून आपण निघालों हें तिच्या लक्षांत आलं नाही. टॉवेलचं एक टोंक चिमटींत धरून तो गरगरा फिरवीत "कुमार, ए कुमार!" अशा हाका मारीत ती मुक्तावहिनीच्या खोलींत शिरली. वहिनी स्वयंपाकघराकडे होती. कुमार अजून अंथरुणांतच निजलेला होता. त्याच्या कॉटजवळ ओणवं होऊन त्याची सुंदर झुलपं दोन्ही हातांनी कुस्करीत रत्ना पुन्हा म्हणाली "कुमार! ए कुमार!" त्यानं डोळे किलकिले करून तिच्याकडे पाहतांच ती म्हणाली "अरे, ऊठ, ऊठ! आपल्याला बाजारांत जायचं आहे!"

तिचा पदर ओढून बसला रहात कुमार म्हणाला "होय? काय आणायचं आहे तुला?"

रत्ना म्हणाली "अरे तुझे काका आले ना! उठ, उठ!"

बाजारांत जाण्याचा अन् काकाच्या येण्याचा काय संबंध असावा तें कुमारच्या लक्षांत येईना. पण त्यानं उठून रत्नाच्या गळयाला मिठी मारली अन् त्याला तसाच उचलून खांद्यावर घेऊन तिनं त्याला न्हाणीघराकडे नेलं.

ती त्याचे दांत घाशींत होती तेव्हां मध्येंच तिचा हात दूर करून त्यानं विचारलं " काकांच्यासाठीं मी बंगल्याचा नमुना तयार केला आहे तो आपण त्यांना दाखवायचा ना ?

" हो तर ! " असं म्हणून तिनं त्याचा मुका घेतला. त्याच्या तोंडाची टुथ--पेस्ट तिच्या ओंठाला लागली तेव्हां कुमार मोठ्मोठ्यांदा हंसू लागला.

रत्ना एकीकडे त्याचं तें गोड हंसणं ऐकत होती, आणि दुसरीकडे मघाशीं श्रीधर हंसला ते अजून तिच्या कानांना ऐकूं येत होतं... " जें मला सांगायचं आहे तें अगदी निवांतपणी सांगितलं पाहिजे. इथें मुंबईत तें जमायचं नाहीं !"... काय बरं सांगणार होता तो ?...ज्या घटकेची वाट पाहतां पाहता ती थकली होती ती आतां अशी अकस्मात् येणार होती काय ?...तिनं छोट्या टॉवेलनं कुमारचं तोंड कोरडं केलं. त्यानं विचारलं " काका खरंच आले काय ग ? " " खरंच आले ! " असं म्हणून तिनं त्याचा पुन्हा एक मुका घेतला.

# ६

आगगाडींतल्या प्रवासांत बहुधा असं होतं कीं प्रथम प्रथम संभाषण अव्याहत चालतं, पण मग विषय संपूं लागले कीं तें हळुहळु मंदावूं लागतं, आणि अखेर गाडीचे हलकावे आणि वारा या दोहोंचा परिणाम वाढत गेला कीं बसल्या बसल्या डुलक्या घेण्याची क्रिया सुरूं होऊन बोलणं आजिबात बंद पडतं. मग एकमेकांनीं मध्येंच डोळे किलकिले करावे, एकमेकांकडे पाहून किंचित् हसावं, फार तर एखाद दुसरा शब्द तोंडावाटे काढावा असा प्रकार मूक संमत्तीनं चालतो.

पाठीमागच्या गादीवर डोकं टेकून डोळे मिटून समोरच्या बाकांवर बसलेल्या रत्नाकडे खंडूकाका असेच पुनःपुन्हा डोळे किलकिले करून बघत होते. एकीकडे तोंडावर येणाऱ्या कांहींशा ऊष्ण वाऱ्याच्या झुळकेमुळें आणि थकल्यामुळें डोळे मिटून घ्यावेसं त्यांना वाटत होतं, तर दुसरीकडे ज्या रत्नावर त्यांनीं आजपर्यंत अपत्यवत् प्रेम केलं तिच्याकडे कितीहि बघितलं तरी त्यांना पुरेसं वाटत नव्हतं. अपरिमित आनंदानं तिचं मूळचं सौंदर्य असं खुललेलं त्यांनीं पूर्वीं कधीं पाहिलं नव्हतं, आणि त्यामुळें तिच्या लावण्ययुक्त प्रसन्न चेहऱ्याची शोभा कितीहि पाहिली तरी त्यांचं समाधान होत नव्हतं. किंबहुना ती शोभा जों जों अधिक पहावी तों तों आपल्या अंत:करणांतला आनंद अधिक वाढत आहे असं त्यांना आढळून येत होतं. रत्नाचे वडील निवर्तल्यानंतर अशी पूर्ण सुखाची घटका त्यांच्या वाट्याला आज प्रथमच येत होती.

आठ दिवसांपूर्वी रत्नाचं त्यांना पत्र आलं होतं. तिचं व श्रीधरचं लग्न रजिस्टर पद्धतीनं होणार होतं. लग्नाचा समारंभ रविवारी संध्याकाळीं मोठ्या थाटानं होणार होता. त्या समारंभाला हजर राहण्याचं आमंत्रण रत्नानं त्यांना दिलं होतं. तिनं लिहिलं होतं, "काका, तुम्हीं यायलाच पाहिजे बरं का. श्रीधरचे किती तरी स्नेही जमतील पण माझं असं तुमच्याशिवाय दुसरं कोण आहे? माझे वडील आज नाहीत याबद्दलचं माझं दुःख तुम्ही हजर असला तरच मी विसरूं शकेन. त्यांच्यामागं तुम्हीं माझ्यावर जी ममता..." पुढचा मजकूर पाण्यानं भरलेल्या त्यांच्या डोळ्यांना दिसेनासा झाला होता. एखाद्या लहान मुलाप्रमाणें डोळ्यांतून ओघळणारीं आंसवं टिपतां टिपतां हातांतलं लहानसं खादीचं फडकं त्यांना पुरलं नव्हतं...पत्राखालीं 'तुमची रत्ना' अशी सही तिनं केली होती, आणि त्याखालीं निराळ्या शाईत श्रीधरनं लिहिलं होतं "रत्नाचा आणि म्हणून तुमचाही श्रीधर" तें वाचून खंडूकाकांचा गळा एकदम दाटून आला होता.

लग्नाचा समारंभ खरोखरच मोठ्या थाटांत पार पडला होता. त्या वेळची श्रीधरची अन् त्याच्या समवयस्क मित्रांचीं तीं बोलणीं ऐकतांना व मुंबईच्या निवडक श्रीमंत प्रतिष्ठित कुटुंबांतल्या दक्षिणी, गुजराथी, पारशी, मुसलमान, युरोपियन बायकांचा घोळका रत्नाभोंवतीं जमलेला पाहतांना त्या एकंदर समाजापासून जरा दूरच बसलेल्या खंडूकाकांना सारखी रत्नाच्या बापाची आठवण येत होती. याहूनही अधिक मोठा थाट बाबुरावांनीं खचित उडवून दिला असता. आपल्या लेकीविषयीं त्यांना केवढं प्रेम आणि केवढा अभिमान होता! त्या प्रेमळ पित्याची गैरहजेरी म्हणजे या समारंभांत एक वैगुण्य आहे असं खंडूकाकांना राहून राहून वाटत होतं...आणि पुष्पाराणीचीहि त्यांना सारखी आठवण होत होती. त्यांची दृष्टि रत्नाकडे जेव्हां जेव्हां वळे तेव्हां पुष्पाराणीच मूर्तिमंत पुन्हां आपल्यासमोर उभी आहे असा त्यांना स्पष्ट भास होई. आईचा गोरेपणा रत्नाच्या वांट्याला आला नव्हता. त्या बाबतींत ती बापाच्या वळणावर गेली होती. पण बाकीचं तिचं सारं रूप किती हुबेहुब पुष्पाराणीसारखं होतं! यौवनाच्या

ऐन भरांत आलेली लेक म्हणजे आईची केवळ प्रतिमाच वाटण्यासारखी होती. तेच ते नाकडोळे, किंचित् दमून श्वास सोडल्याप्रमाणे हंसण्याची तीच ती तऱ्हा ! चित्रासारखं उभं राहणं, भारावल्यासारखं किंचित् मंदगती चालणं, मैत्रिणींशी बोलतांना सहजगत्या तिच्या खांद्यावर हात स्थिरावणं—सगळं कसं हुबेहुब तेच ! क्षणभर डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणारं लग्नाच्या समारंभाचं ते दृश्य विरून जाऊन त्याच्या जागी कित्येक वर्षांपूर्वीची जुनी दृश्यं खंडूकाकांच्या मनःचक्षूपुढें तरंगली होती. बाबुरावांनी पुष्पाराणीला प्रथम पाहताच तिचा कसा ध्यास घेतला, तिची पहिल्यानं एकांतांत भेट कशी घेतली, तिला पळवून आणण्यासाठी कसकशी साहसं केली आणि संपत्ति फेकली, त्याच्या शेकडो आठवणी त्यांच्या मनांत गर्दी करूं लागल्या होत्या...

समारंभाच्या दुसऱ्या दिवशी खंडूकाकांनी श्रीधरला विचारलं होतं, " रतनला चार आठ दिवस पुण्यास घेऊन जावं म्हणतों. "

त्यांनी श्रीधरची परवानगी विचारावी असं त्यांचं आणि रत्नाचं सकाळीच ठरलं होतं. रत्ना जवळच उभी होती. पण खंडूकाकांनी तो प्रश्न केलेला ऐकताच ती तेथून दूर पळून गेली. श्रीधर ओरडून म्हणाला " ए रतन, निघालीस कुठे ? हे काका बघ ना तुझ्याबद्दल काय विचारताहेत. " पण मान हालवून ती आंतल्या खोलीत निघून गेली होती. काका श्रीधरला म्हणाले होते " तिच्याही मनांत चार दिवस यायचं आहे पुण्याला. "

" असं होय ? म्हणजे तुमचा दोघांचा बेत आधीच ठरला आहे म्हणायचा ! " असं म्हणून श्रीधर हंसला होता.

त्यानं काकांच्या म्हणण्याला संमति तर दिली होतीच, पण शिवाय त्या दोघांना गाडीवर पोंचविण्यासाठी तो स्टेशनवरही आला होता. गाडी सुटण्यापूर्वी तो काकांना म्हणाला होता " पोंचल्याचं पत्र धाडा हं काका. " काका मान हालविणार तोंच रत्ना त्यांना म्हणाली होती " काका, मुळीच कबूल करूं नका पत्र धाडायचं. " श्रीधरनं रागावल्यासारखं करून तिला विचारलं होतं " मी

तुला सांगितलं आहे कां ? मी काकांना सांगतोय." तिनं उत्तर दिलं होतं " मी तरी तुम्हांला कुठे सांगते आहे ? मी देखील काकांनाच सांगितलं."

त्या गोड भांडणाचा अर्थ खंडूकाकना कळण्यासारखा नव्हता. त्यांनी रत्नाकडे पाहून प्रश्नात्मक चर्या केली. ती हंसत म्हणाली "अहो काका, गांवाला गेलं की पत्र धाडायची पद्धत नाहीं आमच्या घरच्या माणसांची."

ती हंसली होती, आणि "बरं, बरं" असा उद्‌गार काढून श्रीधरही मोठ्यांदा हंसला होता.

आणि तितक्यांत गाडी सुटली होती.

मग बराच वेळ काकांशी कांहीं बोलण्याऐवजी स्वतःशीच मोठ्या खुशीनं हंसत राहिल्याप्रमाणे रत्नाचा चेहरा त्यांना दिसला होता. 'आमच्या घरच्या माणसांची' हा किती जुन्या थाटाचा उल्लेख होता ! परंतु तसा उल्लेख करतांना रत्नाला विलक्षण सुख झालं होतं. या सुखाचीच तिनं वर्षभर वाट पाहिली होती. आता त्या सुखाचा आस्वाद ती परोपरीनं घेणार होती. आतां श्रीधर तिचा आणि ती त्याची...

तिच्या चेहऱ्यावरच्या हास्याचं कारण खंडूकाकांना कळणं शक्य नव्हतं परंतु म्हणून ते हास्य कमी मधुर होतं काय ?...

आतांहि खंडूकाका ज्या ज्या वेळी डोळे किलकिले करून तिच्याकडे बघत होते त्या वेळीं तेंच मधुर हास्य तिच्या चर्येवर त्यांना स्पष्ट दिसत होतं. तें दृष्टीस पडलं की त्यांच्या मनाला फार बरं वाटे, आणि मोठ्या समाधानांत ते आपले डोळे पुन्हां मिटून घेत.

गाडीच्या चाकांचा मोठाच खडखडाट झाला आणि हादरे बसले तेव्हां रत्नानं डोळे उघडले. तिनं क्षणभर इकडे तिकडे पाहिलं ते अशा अविर्भावानं की जणूं ती कोणत्या तरी मोठ्या सुखाच्या स्वप्नांतून जागी झाली होती व आपण गाडींत आहोंत यावर तिचा विश्वासच बसण्यासारखा नव्हता. मग जांभई

आली म्हणून डाव्या तळहाताची उलटी बाजू तोंडावर टेंकीत तिनं काकांना विचारलं " कोणतं स्टेशन आलं ? "

काका म्हणाले " आलं नाहीं, पण हा शेवटचा बोगदा ओलांडला अन् मोठं वळण संपलं की खंडाळा स्टेशन येईल. "

" होय ? " असा उद्‌गार काढून ती एकदम सावरून उठून बसली, व मग अगदी खिडकीजवळ सरकून बाहेर वांकण्यापूर्वी ती म्हणाली " काका, बाहेर जरा लक्ष द्या हं. मी तुम्हांला एक गंमत दाखविणार आहे. "

मोठा पूल ओलांडून गाडी पुढे गेली तेव्हां उंच उंच डोंगर अन् त्यावरची गर्द झाडी जवळून दिसूं लागली. रत्ना गाडीबाहेर हात काढून बोट दाखवीत म्हणाली " काका, तो पहा डोंगराच्या उतारावर झाडीनं जवळ जवळ अर्धा झांकलेला असा एकच एक तांबड्या पत्र्यांच्या छपराचा बंगला. दिसतो आहे कां तुम्हाला ?— "

काकांनी " हो हो, दिसला. दिसला " असं केलं.

रत्ना म्हणाली " दिसला ना ? तोच आमचा बंगला ! " आणि मग तिनं लगेच स्वतःला सुधारून घेतलं " म्हणजे मी आणि श्रीधर या बंगल्यांतच येऊन तीन दिवस राहिलों होतों. "

" असं होय ? फार छान दिसतं आहे ठिकाण " असं म्हणून काकांनी तिच्या आनंदांत भर घातली.

गाडी स्टेशनांत येऊन उभी राहिली तेव्हां बंगला जरा उजव्या बाजूस राहिला, पण तरी तो दिसण्यासारखा होता. गाडी पुढें चालूं झाली तेव्हां मात्र तो वेगानं दूर पडला. अखेर त्याच्या छपराचा फक्त एक लहानसा तांबडा ठिपका क्षणभर नजरेपुढें उरला, आणि मग तर तोहि दिसेनासा झाला. पण रत्ना बाहेर वांकून पहात होती ती किती वेळ तरी तशीच पहात राहिली. तिच्या प्रमाणेंच खिडकीतून वांकलेल्या खंडूकाकांपुढून बंगला केव्हांच अदृश्य झाला होता. पण रत्नाच्या नजरेला तो अजूनही अगदी समोर असल्याप्रमाणें स्पष्ट दिसत होता. त्या ठिकाणीं श्रीधरच्या सहवासांत तिनं सुखाच्या ज्या घटका

घालविल्या होत्या त्यांचीं विविध चित्रं तिला स्वच्छ दिसत होतीं. त्या तीन दिवसांत तिच्या आनंदांत क्षणभर देखील ओहोटी आली नव्हती. श्रीधरनं मार्थाची हकीकत तिला सांगितली त्यावेळेस देखील !

त्यानं त्या विषयाची प्रस्तावना केली तेव्हाच ती झटकन् त्याला आडवून म्हणाली होती " नको, मला कांहीं सांगू नकोस. तूं माझा आहेस एवढं एकच वाक्य तुझ्या तोंडून निघालं कीं मला पुरे. ज्यास्त कांहीं देखील मला ऐकायचं नाहीं. "

आणि खरोखरच तिची त्या क्षणाची भावना तशी होती. श्रीधरनं मार्थाशीं झालेल्या लग्नाचा उल्लेखदेखील तिच्याजवळ कधी केलेला नसावा याचा दोनच दिवसांपूर्वीं तिला खेद वाटला होता, राग आला होता. परंतु आतां तिच्या मनाचं असमाधान अल्पांशानं देखील उरलेलं नव्हतं. उलट एखाद्या अपराधाची कबुली दिल्याप्रमाणें आपण आपल्या प्रियकराला बोलायला लावावं याची तिला शरम वाटत होती. ती म्हणाली " नको, मला कांहीं सागू नकोस. तें समजण्यावांचून माझं अडलेलं नाहीं. "

पण तिच्या हातावरून हलकेच हात फिरवीत श्रीधर म्हणाला होता, " अं हं, तसं नाहीं. माझं सारं पूर्वचरित्र तुझ्यापुढें उघड करणं माझं कर्तव्य आहे. मला बोलूं दे. तूं कदाचित् विचारशील आधींच कां बोललां नाहीत, इतके दिवस कां थांबलांत ?"

(" होय रे श्रीधर, वाट पाहून पाहून माझा धीर तुटत चालला होता. कां थांबला होतास इतके दिवस ? " )

"—थांबलों त्याचीं दोन कारणं होतीं. तीं ऐकल्यावर कदाचित् मला चमत्कारिक माणूस म्हणशील. माझ्या विचारसरणीला पटून जें मी बोलतों अन् करतों त्यालाच जग चमत्कारिक म्हणतं मला माहित आहे. लोकांनीं मला विक्षिप्त अन् लहरी ठरवलं आहे, कांहींनी मला वेडाही ठरवलं आहे. आमच्या घराण्यांतच ही वेडाची लकेर आहे, तुला माहीत आहे ना ? हंसतेस काय ? खरंच आम्हीं सारीजणं थोडीं फार वेडीं आहोंत. पण तें जाऊं दे. इतके दिवस मी थांबलों होतों कोणत्या दोन

कारणांनीं तें मला सांगूं दे. एक कारण असं कीं माझं तुझ्यावर फार प्रेम होतं, परंतु मला आत्मविश्वास नव्हता. माझं एकदां लग्न झालेलं आहे हें तुला कळल्यावर तुझ्या मनाची प्रतिक्रिया काय होईल याची मला खात्री नव्हती. खरं प्रेम जमतं तें एकदम एका क्षणांत जमतं हा कवींचा संकेत कदाचित् थोडा फार खरा असेल. परंतु अशा प्रेमावर सर्वस्वीं विश्वास टाकून विवाहित आयुष्याला प्रारंभ केला तर त्यांतून अखंड सौख्य निर्माण होण्याची खात्री नाहीं असं मला वाटतं. म्हणून तुझा माझा दीर्घकाल सहवास घडल्यावर, माझ्या स्वभावाची तुला पुरती ओळख पटल्यावर, माझे दोष तुझ्या ध्यानीं आल्यावर, अन् माझ्या गुणांचा मोठेपणा जाणण्याइतका समज तुझ्या अंगीं आल्यावर—इतकं सारं झाल्यावर तुझ्याजवळ लग्नाची गोष्ट काढायची असा प्रयोग मी मनाशीं ठरविला होता. आणखी असंही योजून ठेवलं होतं कीं माझ्याशीं लग्न करतेस कां म्हणून विचारतांना आधीं माझं पूर्वचरित्र तुला सांगायचं... ”

त्याचं बोलणं रत्नाला मुळीच पटत नव्हतं. तिला म्हणावसं वाटत होतं, “ श्रीधर तूं वेडा आहेस हेंच खरं ! अरे अगदीं पहिल्यांदाच आपण दोघं एकातांत बोलत बसलों आणि तूं मला हळूंच जवळ ओढलंस त्या वेळेस जरी तुझ्या पूर्वचरित्रांतल्या हकीगती मला सांगितल्या असत्यास तरी त्या ऐकून माझं मन तुझ्याबद्दलच्या प्रीतीनं भरलेलंच राहिलं असतं ! अन् माझ्या तोंडा-जवळ तूं आपलं तोंड आणलंस, तुझ्या ऊष्ण श्वासानं माझ्या गालावर उभ्या राहिलेल्या कांट्याचं सुख माझ्या अंतःकरणापर्यंत धारेसारखं गेलं, तेव्हां तुझ्या अपेक्षित पहिल्या मृदु चुंबनासाठीं माझं मुख मी वरच केलं असतं... ”

परंतु ती कांहींच न बोलतां गप्प राहिली होती. त्यानं वर्षभर वाट पाहिली ही त्याची चूक असेल. परंतु त्यानं तसं कां केलं हें तो आतां सांगत होता. त्याच्या वागण्याची तिला आतां निदान संगति लावतां येत होती...ती ऐकत राहिली.

तो पुढें म्हणाला होता, “—आणि मी दुसरा एक प्रयोग करून पहात होतों तो तुझं शहाणपण, अन् तुझं ज्ञान वाढविण्याचा. माझ्या एक दोन स्नेह्यांच्या

जवळ मी तुझ्याबद्दल एखादे वेळीं बोलत असे. ते मला विचारीत 'तिच्याशीं लग्न लावल्यावर तिच्या अंगी विद्वत्ता येईल असं करणं तुला शक्य नाहीं काय ?' मी त्यांना उत्तर देई—रतन रागावूं नकोस पण मला खरंच असं वाटे—'विद्वत्ता संपादन करण्याची कुवत तिच्या ठिकाणीं नाहीं असं नंतर ठरलं तर !' लग्न झाल्यावर असा निराशेचा प्रत्यय येणं फार वाईट. तो मला पूर्वी एकदां आला होता. त्याची पुनरावृत्ति मला नको होती. मार्थाशीं मी लग्न केलं तें तिच्यावर माझं प्रेम बसलं म्हणूनच. परंतु तें तिच्या असामान्य विद्वत्तेवर बसलं. अन् प्रेमाच्या भरांत मला असं वाटलं कीं एकत्र आयुष्यांतल्या सुखाला विद्वत्ता पुरेशी आहे. शारीरिक लावण्य आणखी स्वभावाचं माधुर्य नसलं तरी कांहीं हरकत नाहीं. परंतु मार्थाचं आणखी माझं लग्न झाल्यापासून अल्पावधींतच मला कळून आलं कीं मी चुकलों. ती अपघातांत मेली म्हणून, नाहीं तर मला तिच्याबरोबर दीर्घकाल विवाहित आयुष्य काढणं फार कठीण गेलं असतं. तशी चूक मला आतां होऊं द्यायची नव्हती. तुझ्या सौंदर्यानं मी वेडावून गेलों. तुझ्या गोड स्वभावाचा मला मोह पडला. पण केवळ या आकर्षणाला बळी पडून तुझं माझं आयुष्य एकत्र गुंफण्याचा धीर मला होईना. माझा स्वभाव मी ओळखीत होतों. विद्या अन् ज्ञान तुझ्या ठिकाणीं असल्याशिवाय माझ्या वृत्तीला पूर्ण समाधान होणार नाहीं हें मला समजत होतं. माझ्या हातून पुढे कधीं तुला दु:खदायक गोष्टी घडतील असा संभव ठेवून मला तुझ्या आयुष्यांत प्रवेश करायचा नव्हता. तुझ्यासाठीं—"

रत्नाला एकदम काय वाटलं कुणास ठाऊक. "पुरे पुरे रे ! किती बोलतोस ? तुझ्या प्रेमाची मी शंका घेतली याबद्दल किती लाजवशील मला !" असं म्हणत तिनं त्याच्या गळ्याभोंवती मिठी घालून त्याचं झटकन् चुंबन घेतलं. आणि मग त्याचं मस्तक आपल्या मांडीवर घेऊन ती त्याच्या सुंदर केसांतून बोटं फिरवीत राहिली.

आणि तसं करतां करताच त्याच्या तोंडची मार्थाची हकीगत तिनं ऐकली.

'मौर्य आणि गुप्त राजांच्या काळांतील चलनपद्धती' या विषयावरच्या आपल्या इंग्रजी ग्रंथासाठीं वाचन करावयास म्हणून श्रीधर आपल्या इंग्लंड-मधील मुक्कामांत लंडन येथील जगप्रसिद्ध ग्रंथालयांत बरेच दिवस जात असे. मार्थाची व त्याची ओळख त्या ठिकाणीं झाली होती. पुढें ती वाढत गेल्यावर तिनं त्याच्या त्या अभ्यासांत व निरनिराळीं पुस्तकं वाचून टिपणं काढण्याच्या कामांत बरोबरीनं भाग घेतला होता. तिची असामान्य बुद्धि, आणि संशोधना-त्मक काम करण्याची तिची स्वाभाविक हौस व पात्रता पाहून तो थक्क झाला होता. डॉ. विल्यम व्हॅलंटाइन नांवाच्या एका डॉक्टराशीं श्रीधरची विशेष मैत्री होती. मार्थाचा व त्यांचाही परिचय असल्यामुळें त्यांच्या घरीं दोघांच्या गांठी भेटी वरचेवर पडूं लागल्या होत्या. सहवास वाढत गेला होता, आणि कुशाग्र-बुद्धिप्रमाणेंच तिच्या अंगीं स्वाभिमान, करार, स्वावलंबन इत्यादि गुणही असल्याचं श्रीधरला आढळून आलं होतं. ती मूळची ससेक्स परगण्यांतली होती, व लंडनला येऊन स्वतःच्या पायावर उभी राहिली होती. तिला आई नव्हती, बापाशीं तिचं कधींच पटलं नव्हतं, आणि ती बापाशीं भांडण करून घर सोडून आली होती ती घराचा उंबरठा पुन्हां न चढण्याची प्रतिज्ञा करून. इतकंच नव्हे, तिनं आपलं नांव देखील बदलून टाकून 'मार्था फिशर' हें नवीन नांव धारण केलं होतं. तिचं मूळचं नांव अगर गांव श्रीधरनं तिला कधीं विचारलं नव्हतं, तिनं त्याला कधीं सांगितलं नव्हतं. त्याला काय करायचं होतं त्याच्याशीं ?

चार महिन्यांच्या सहवासानंतर श्रीधरनं मार्थाशीं लग्न केलं होतं, व तीं दोघं एकत्र राहूं लागलीं होतीं. पुढें कांहीं एका कामाकरतां मार्था पॅरीसला जावयास निघाली. लंडनच्या स्टेशनवर तो तिला पोंचवायसाठीं गेला. तीच त्या दोघांची शेवटची भेट. कारण ती ज्या गाडीनं गेली ती डोव्हर स्टेशनाच्या अलिकडे एका मालगाडीवर आदळली. इतका भयंकर स्वरूपाचा अपघात इंग्लंडमध्यें पन्नास वर्षांत झाला नव्हता. शेकडों उतारू जागच्या जागीं ठार झाले. प्रेतं सांपडलीं तीं अशा छिन्नविछिन्न स्थितींत कीं कुणाची ओळख पटणं शक्य राहिलं नाहीं. अपघाताची बातमी कळतांच श्रीधर धांवून गेला. परंतु

उपयोग काय ? हॉस्पिटलमध्यें दाखल करून घेण्यांत आलेल्या जखमी उतारूंची यादी त्यानं काळजीपूर्वक पाहिली, तिच्यांत मार्था फिशर हें नांव नव्हतं. मृत माणसांच्या ढिगाऱ्यांतून तर आपलं माणूस ओळखून काढणं कुणालाच शक्य नव्हतं. श्रीधर परत लंडनला आला होता, आणि नंतर तीन महिन्यांचा अवधि उलटून गेला तरी जेव्हां मार्था परत आली नाहीं अगर तिचा कांहींच ठावठिकाण त्याला कळला नाहीं तेव्हां आगगाडीच्या त्या अपघातांत ती मृत्युमुखी पडली असली पाहिजे असं मानण्यावांचून त्याला गत्यंतरच उरलं नव्हतं... नंतर दोन चार महिन्यांनी तो मुळीं हिंदुस्थानास परत निघून आला होता...

"अशी मार्थाबद्दलची थोडक्यांत हकीगत आहे" असं म्हणून श्रीधर उगीच क्षणभर गप्प राहिला होता, व मग त्यानं म्हटलं होतं, "आतां एलिझाबेथ मार्टिनबद्दल तुला सांगायचं आहे—"

पण रत्नानं त्याचं तोंड आपल्या उजव्या हातानं झांकून धरलं होतं, आणि मान हालवीत ती म्हणाली होती "आतां तूं गप्प बसतोस कीं नाहीं ? हा विषय आता संपला. एका अक्षरानं देखील तो पुन्हां कधीं आपल्यांत निघतां कामा नये. मला कांहीं देखील ऐकायचं नाहीं, अन् तूं मला कांहीं देखील सांगूं नकोस..."

आणि तिनं खरोखरंच त्याला त्या वेळेस गप्प रहावयास भाग पाडलं होतं, व त्यानंतर खंडाळ्याचा मुक्कामांतला त्यांचा सारा वेळ एकमेकाला आपापल्या प्रीतीच्या गोष्टी सांगण्यांत, सहल करण्यांत, बंगल्यांत अगर रानावनांतल्या एकांत जागेंत घट्ट मिठी मारून प्रेमाचे मुके चाळे करण्यांत गेला होता.

श्रीधरनं येतांना दहावीस पुस्तकं बरोबर आणलीं होतीं, परंतु त्यांतल्या एकाला देखील तिनं त्याला हात लावूं दिला नाहीं. त्यानं पुस्तक चुकून उचललं कीं ती तें त्याच्या हातांतून काढून घेई व म्हणे "आपण दोघं एकांतासाठीं इथं आलों हें विसरलास वाटतं तूं ? आपल्या दोघांत तिसरं कुणीहि आलेलं मला खपायचं नाहीं."

तो म्हणे “ पुस्तक म्हणजे तिसरं कुणी वाटतं ? ”

पुस्तकाचा पुट्ठा उघडून पहिलं पान त्याच्यापुढें धरीत ती म्हणे, “ हें पाहिलंस कां या ग्रंथकाराचं नांव ? यांचे ग्रंथ तुझ्या किती आवडीचे आहेत तें मला माहीत आहे. हें पुस्तक तूं एकदां उघडलंस कीं त्यांत असा रमून जाशील कीं जणूं हे ग्रंथकारमहाशय तुझ्या आमंत्रणावरून इथें प्राप्त झाले असून या कोचावर असे तुझ्यामाझ्यामध्ये बसले आहेत, अन् तुझं त्याचं वादविवादाचं भयंकर रणकंदन चाललं आहे. मी इथें जवळ आहे याचं भान-देखील आपल्याला उरायचं नाहीं बरं कां महाराज ? पुस्तक म्हणजे तिसरं माणूस नाहीं तर काय ? माणसापेक्षां सुद्धां वाईट. आण तें इकडे. ”

त्यानं पुस्तक हातीं घेतां कामा नये हा कायदा तिनं अशा थराला नेला होता कीं ती स्नान करीत असतांना देखील त्यानं बाहेरून तिच्याशीं सारखं बोलत राहिलं पाहिजे असं तिनं त्याला बजावलं होतं. अखेर बरोबर आणलेल्या साऱ्या पुस्तकांचा श्रीधरनं गठ्ठा बांधला होता व वेष्टनाच्या कागदा-वर तांबड्या पेन्सिलीनं मोठ्या अक्षरांत लिहिलं होतं, ‘ Inflamable ! Not to be touched. ’ ( ज्वालाग्राही ! हात न लावणे ! ) तें पाहून हंसतां हंसतां रत्ना म्हणाली होती, “ हात न लावणें एवढं ठीक आहे. पण ज्वालाग्राही कसं रे ? ”

तो लटक्या गांभीर्यानं म्हणाला होता, “ ज्वालाग्राही नाहीं तर काय ? त्याला मी हात लावला कीं तुझ्या माझ्या भांडणाची ज्वाला भडकते ना ! ”

रत्नाला हंसूं आलं होतं.

तो पुढें म्हणाला होता, “ पण जाऊं दे. तीं पुस्तकं नकोतच आतां मला. आतां निराळ्याच एका ग्रंथाचा अभ्यास करण्याचं मीं ठरवलं आहे.”

“ तो कोणता ? ”

तिला झटकन जवळ ओढून तो म्हणाला, “ हा. ”

त्याचा विनोद तिला आवडला. त्यांत सामील होऊन ती हंसत म्हणाली, " असं होय ? नशीव उघडलं म्हणायचं या ग्रंथाचं. इतके दिवस जवळ असून त्याकडे धड पाहिलंही नव्हतंस. "

" तें कां बरं ? जरा वेळ सांपडला की हाच ग्रंथ मुखोद्गत करीत बसत असे ना ? "

' मुखोद्गत ' या शब्दावरचा श्लेष लक्षांत येतांच रत्नानं डोळे मोठमोठे करून रागावल्यासारखं केलं, ' मारूं काय ? ' असं विचारल्याप्रमाणें हात उगारला, आणि मग एकदम ती त्याचे केस कुस्करूं लागली. तिनं विचारलं, " मग ग्रंथ आवडला आहे की नाही ? आपला स्पष्ट आणि प्रामाणिक अभिप्राय कळूं द्या. "

" ऐका कीं. अभिप्राय तयार आहे. या ग्रंथाची बांधणी फारच नाजुक अन् मोहक आहे. मुखपृष्ठ इतकं चित्तवेधक आहे की ते पहातच तासन्तास बसावंसं वाटेल. ग्रंथाच्या अंतरंगाची मांडणी सुबोध आहे असा निर्णय दिला असता, परंतु सुभाषितकारांनी लिहून ठेवलंय कीं स्त्रीचं अंतरंग आपल्याला कळलं असा जो म्हणतो—"

ओवीच्या चरणांतले शब्द तोडून तालावर म्हणावे त्याप्रमाणें रत्ना म्हणाली " तो एक, पढतमूर्ख ! ' आणि मोठमोठ्यांदा हंसत तिनं आपलं मस्तक त्याच्या कुशीत घातलं होतं.

असे किती तरी गोड गोड प्रसंग त्या तीन दिवसांच्या मुक्कामांत घडले होते, आणि त्यांच्या आठवणी झाडींनं आच्छादिलेल्या त्या बंगल्यांत, रानावनांतल्या या जागीं त्या जागीं, कुठल्या तरी शांत निवांत पायवाटेवरील झाडाखालच्या प्रशस्त शीलेवर, खळखळणाऱ्या ओढ्याच्या कांठावर, अशा प्रकारें त्या वन्य पंचक्रोशींतल्या हजार ठिकाणीं सांठलेल्या होत्या...

लोणावळ्याच्या स्टेशनावर गाडी थांबली व जरा वेळानं पुढें निघाली, परंतु त्या कोणत्याच गोष्टीचं रत्नाला भान नव्हतं. सुखाच्या कित्येक घटका

तिला आठवत होत्या, व ती मनाशी म्हणत होती, आतां पुण्याहून श्रीधरला उद्यां पत्र धाडायचं त्यांत लिहायचं की खंडाळा स्टेशन आलं तेव्हां मी काकांना म्हटलं "काका, आमचा बंगला दाखवतें हं तुम्हाला!—आमचा म्हणजे ज्या ठिकाणी..."

कारण तिनं जरी पत्राबद्दल स्टेशनावर श्रीधरची चेष्टा केली होती तरी रोज नेमानं पत्रं धाडण्याचं तिनं आदल्या रात्री त्याच्या जवळ कबूल केलं होतं.

# ७

रत्ना श्रीधरच्या जवळ असती तर तो रोज तिच्या पत्राची कशी वाट पहात असे हें तिला प्रत्यक्ष दिसलं असतं, आणि तिला आनंद तर अर्थात् झालाच असता, परंतु आश्चर्य अधिक वाटून ती स्वतःशींच उद्गारली असती "पूर्वीचाच कां हा श्रीधर !" सकाळच्या पहिल्या बटवड्यांतच बहुधा पुण्याकडचं टपाल त्याला मिळे, त्यांत रत्नाचं पत्र असे. तो ऑफिसांत जायसाठीं पोषाख करून अगदीं तयारच असला अन् त्या वेळीं डाक आली तर बाकीचीं पत्रं ऑफिसांत गेल्यावर उघडून पाहतां येतील अशा विचारानं तो आपल्या छोट्या कातडी बॅगेंत घाली, परंतु रत्नाचं पत्र मात्र उघडून निवांतपणें सावकाश वाचल्यावांचून त्याला राहवत नसे.

आज तो असाच कपडे करून निघाला तेव्हां डाक आली. परंतु दोनच पत्रं होतीं. एक रत्नाचं होतं, आणि दुसरं विमानी टपालांतून आलेलं दिसत होतं. श्रीधरनं रत्नाचं पत्र आधीं वाचलं. कोटाच्या आंतल्या खिशांत त्याची घडी ठेवतां ठेवतां त्यानं विचार केला " चार आठ दिवसासाठीं म्हणून गेली आणि हिचा आपला रोज एक एक दिवस वाढतच आहे. म्हणे खंडूकाका सोडीत नाहींत ! सोडीत नाहींत म्हणजे काय ?...आज तार ठोकली पाहिजे कीं..." विमानमार्गानं आलेलं तें दुसरं पत्र नेहमींच्या क्रमाप्रमाणें तो बॅगेंतच टाकणार होता परंतु तितक्यांत त्याच्या मनांत आलं, एकच आहे वाचून टाकूं. त्यानं एकदां तें हातांतल्या हातांत उलट सुलट केलं. पण त्यावरून तें

कोणाकडून आलं असावं त्याचा त्याला तर्क करतां आला नाहीं. आंतला नोटपेपर काढून पाहतांच मात्र वरच्या डाव्या कोपऱ्यांत 'डॉ. विल्यम व्हॅलंटाइन' हीं निळ्या रंगांत एम्बॉस केलेलीं अक्षरंच त्याला दिसलीं. 'फार दिवसांनीं आमची आठवण झालेली दिसते आहे स्वारीला' असं स्वतःशीच म्हणत त्यानं पत्र वाचण्यास आरंभ केला—

"तुझं पत्र येऊन जवळ जवळ वर्ष होत आलं. तुझ्या जुन्या पत्त्यावरच हें पत्र पाठविणं भाग आहे. तूं आतां मुंबईस नसलास तरी हें पत्र तुला मिळेल अशी आशा आहे. तुला एक अत्यंत आनंदाची, आणि इतकी आश्चर्याची कीं ती अगदी अद्‌भुत वाटावी अशी बातमी कळविण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. आणि अधिक प्रस्तावना न करतां ती मी तुला सांगून टाकतों.

"मार्था—तुझी लाडकी मार्था—जिवंत आहे !—"

तें वाक्य वाचल्याबरोबर श्रीधरच्या हाताचीं बोटं एकदम आवळलीं गेलीं आणि पत्राच्या जाड उंची कागदाचा चुरगळा होतांना आवाज झाला !

श्रीधरच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. त्याच्या डोळ्यापुढें अंधारी आली. आणि तो मटकन् कोचावर कोसळल्याप्रमाणें खालीं बसला !

मार्था जिवंत होती ?...हा कसला विलक्षण दुष्ट डाव दैव खेळत होतं ?...

श्रीधरच्या डोक्यांत मोठमोठे प्रहार झाल्याप्रमाणे आवाज होऊं लागले. कानठळ्या बसूं लागल्या. खोली हेलकावे खात आहे असं त्याला वाटलं... किती वेळ तरी आपलं डोकं घट्ट दाबून, गुडघ्यावर कोपरें टेंकून तो तसाच बसून राहिला. डॉ. व्हॅलंटाइनच्या पत्रांतला पुढचा मजकूर वाचण्याचा त्याला कांहीं केल्या धीर होईना...परंतु तो वाचल्यावांचून गत्यंतर नव्हतं...त्या विचित्र अनपेक्षित बातमीच्या तडाख्यानं त्याला आलेली भोंवळ नाहींशी होईपर्यंत तो थांबला. आणि मग हातांतला चुरगळलेला कागद त्यानं पुन्हां उलगडून साफ करून डोळ्यांपुढें धरला. प्रथम कांहीं वेळ पत्रांतलीं अक्षरं

त्याला धड दिसत नव्हतीं. पण मग तीं हलके हलके स्पष्ट होऊं लागलीं. आणि जें वाचणं चुकवितां येण्यासारखं नाहीं तें वाचलंच पाहिजे अशा करारानं श्रीधरनं तें पत्र शेवटपर्यंत वाचून टाकलं.

मार्था जिवंत होती !—

त्या अपघातांत ती मेली नव्हती !

खरोखरच एक अद्भूत असा प्रकार घडला होता.

डॉ. व्हॅलंटाइन यांनी त्या अद्भुत प्रकाराबद्दल लिहिलं होतं, " असं दिसतं कीं त्या आगगाडीच्या अपघातांत मार्थाच्या डोक्यावर मोठा प्रहार झाला होता. रक्तस्रावही बराच झाला असावा. ती हॉस्पिटलमध्यें दाखल झाली तेव्हां ती शुद्धीवर नव्हती. जेव्हां ती शुद्धीवर आली आणि तिला नांव गांव विचारण्यांत आलं तेव्हां मार्था चाफेकर हे आपलं नांव तिनं सांगितलं नाहीं. ल्यूसी टर्नर हें लंडनला येण्यापूर्वीचं तिचं पहिलं नांव होतं, तें तिनं सांगितलं, आणि ससेक्स परगण्यांतल्या आपल्या गांवीं आपला बाप जॉन टर्नर राहतो असंही तिनं सांगितलं. अर्थात् हॉस्पिटलमध्यें दाखल झालेल्या लोकांची जी यादी तयार झाली त्यांत ल्यूसी टर्नर असंच नांव लिहिलं गेलं, आणि तुला तुझ्या मार्थाचं नांव त्या यादींत सांपडलं नाहीं. पुढें ती जरा बरी झाल्यावर हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनीं जॉन टर्नरला लिहून कळविलं कीं अपघातांत सांपडलेली तुमची लेक ल्यूसी आतां बरी झालेली आहे, तिला तुम्ही इकडे येऊन घेऊन जावं. त्याप्रमाणें जॉन टर्नर आला व ल्यूसी आपल्या बापाबरोबर आपल्या गांवीं निघून गेली. ती बापाशीं भांडून लंडनला आली, स्वतंत्रपणानं राहिली, तिची व तुझी भेट झाली, अन् पुढें तुमचं दोघांचं लग्न झालं, इत्यादि गोष्टींची स्मृतिच तिच्या डोक्यांतून अजिबात नष्ट झाली होती. असा स्मृति-भ्रंश पुष्कळदां होतो. तो झाला कीं रोग्याला आपल्या आयुष्यांतल्या कोठल्या तरी एका विवक्षित कालखंडाचं अजिबात अन् संपूर्ण विस्मरण घडतं. एखाद्या रोग्याच्या बाबतींत हें नष्ट झालेलं स्मरण पुन्हां कधींच परत येत नाहीं. मात्र असा प्रकार अपवादात्मक समजला जातो. बहुधा प्रकार होतो तो असा कीं

कमीअधिक काळानंतर लुप्त झालेली स्मृति हलके हलके परत येऊं लागते. विसरलेल्या काळांतील एक एक दुवा लहान मोठ्या निमित्तांनी आठवूं लागतो, व असं होतां होतां अखेर साऱ्या गोष्टींची स्पष्ट स्मृति जागृत होते. मार्थाच्या बाबतीत असंच झालं..."

मार्था जिवंत होती ?—अन् मग रत्ना ? रत्नाशीं त्याचं लग्न झालं तो एक भयंकर विटंबनाच की काय ? रत्ना त्याची केवळ रखेलीच ठरणार ?—

श्रीधरनं त्या पत्राचा चोळामोळा केला अन् ते आपल्या कोटाच्या खिशांत कोंबलं !...

बटन वर केलं की अंधार व्हावा त्याप्रमाणे त्याच्या डोक्यांत किती तरी वेळ अगदी अंधार पडल्यासारखं झालं. कांही वेळा पूर्वीचे घाव थांबले. कानठळ्या बंद झाल्या. किंबहुना त्याच्या शरीरांतलं रुधिराभिसरणच एकदम थबकल्यासारखं झालं. माणसांनी गजबजलेल्या जागेत अकस्मात् शुकशुकाट व्हावा तद्वत् त्याच्या मेंदूची स्थिति झाली. विचाराचं स्फुरणच सर्वस्वी बंद पडलं. डोकं जड आणि अगदी बधिर झालं. कुणी सुरीचं टोक त्याच्या डोक्यावर टेकलं असतं तरी त्याला त्याची संवेदना झाली नसती...

आणि मग कांही वेळानं रात्री बंद ठेवलेल्या कारखान्याची चक्रं एकदम चालू होऊन त्यांचा धाड धाड आवाज सुरू व्हावा त्याप्रमाणे विचारचक्रं एकदम सुरू होऊन त्याच्या डोक्यांत एकच कलकलाट माजला. त्या विचारांत संगति अगर रेखीवपणा अगर स्थिरता काडीमात्र नव्हती. वीज क्षणांत इकडे क्षणांत तिकडे चमकावी त्याप्रमाणे विचार पेटून भडकत होते.

उठून उभं राहून त्यानं आपल्या अंगांतले कपडे भराभर ओरबाडून काढून फेंकून दिले. नंतर टेलिफोनजवळ जाऊन ऑफिसचा नंबर घेऊन त्यानं सांगितलं "मी आज येणार नाही." तिकडून ऑफिसांतल्या कारकूनानं त्याला काय विचारलं कोण जाणे, पण उत्तरादाखल तो उंच आवाज काढून

सारखा ओरडत राहिला "मी येणार नाही ! मी येणार नाही !" जणू पावसाळी पुरानं दुथडी वाहणाऱ्या नदीच्या पलीकडल्या काठावर उभ्या राहिलेल्या कुणा तरी माणसाला तो आरोळ्या ठोकून सांगत होता "मी येणार नाही !"

टेलिफोनपाशी तो उभा असतानांच त्याला वाटल आपण आता खाली जमिनीवर पडणार. त्यानं रिसीव्हर टाकून दिला. गोळी लागलेला माणूस रक्ताच्या चिळकांड्या आवरण्यासाठी छाती दाबतो त्याप्रमाणे डाव्या हातानं छातीपासला शर्ट घट्ट चुरगळून धरून तो आपल्या खोलीकडे कसाबसा धडपडत गेला, आणि त्यानं कॉटवर अंग टाकलं !

त्याच्या शोधासाठी ऑफिसातून त्याचा मुख्य कारकून आणि घरून दादा, मुक्तावहिनी वगैरे मंडळी दुसऱ्या दिवशी दुपारी आली तोपर्यंत तो तसाच कॉटमध्ये पडून राहिलेला होता. त्या सर्वांनी मिळून त्याला किती तरी प्रश्न केले, पण त्यानं तोडांतून अक्षर देखील काढलं नाही. दांतखिळी बसल्या-प्रमाणे त्यानं तोंड घट्ट मिटून घेतलं होतं. त्याचा चेहरा एखाद्या पुतळ्याच्या चेहऱ्यासारखा दिसत होता. पापण्या न हालविता डोळे मोठाले करून अंतराळांत कुठे तरी तो पहात होता. त्याच्या नजरेत भयंकर भकासपणा आला होता...

मुक्तावहिनींनं कारकुनाकडून रत्नाला तार करविली 'असाल तशा निघून या !'

रत्ना आली.

श्रीधरला पाहतांच तिच्या हृदयांत चर्रर्र झाल. भोवताली माणसं होती तरी तिनं त्याला घट्ट आलिंगन दिलं व केविलवाण्या स्वरांत ती ओरडली "श्रीधर, अरे श्री ! मला ओळखलंस काय ?"

पण श्रीधरची नजर अंतराळांत लागलेली होती, ती खाली तिच्याकडे वळली नाही.

तीन चार नामांकित डॉक्टर बोलावण्यांत आले. परंतु त्यांनी विचार-लेल्या कोणत्याहि प्रश्नाचं उत्तरच मुळी श्रीधरकडून मिळेना. तो नुसता दूरवर

कुठे तरी पाहिल्यासारखं पहात राही. डॉक्टरांना शंका आली की पॅरॅलिसिसचा झटका येऊन त्याची वाचा गेली आहे की काय ? त्या शंकेनं ते त्याला तपासूं लागले. त्याबरोबर " मेलेलीं माणसं अशी जिवंत व्हायला लागलीं तर जिवंत माणसांना मरण्यावांचून गत्यंतर नाहीं ! " असं खणखणीत इंग्रजीमध्यें बोलून तो क्षणभर गप्प राहिला, आणि नंतर म्हणाला " डॉ. व्हॅलंटाइन, तुझ्या ज्ञानाची बढाई मला सांगतोस होय ? चुलीत घाल तुझं तें ज्ञान. म्हणे असं होतं कधीं कधीं ! तूं मला सांगतोस होय ? या विषयावरचा एक ग्रंथ मी वाचला आहे. त्यांतला एक परिच्छेद मला आठवतो. ऐक !"

आणि कुठल्या तरी इंग्रजी पुस्तकांतला उतारा त्यानं घडाघड म्हणून दाखवला, व मग थकल्याप्रमाणें डोळे मिटून त्यानं आपलं कपाळ हातावर टेकलं.

डॉक्टर एकमेकांकडे टकामका पहातच राहिले. डॉ. व्हॅलंटाइन हें नांव कुणीच पूर्वी ऐकलेलं नव्हतं. मुक्तावहिनी रडूं लागली. रत्नानं श्रीधरला घट्ट मिठी मारली व मोठ्यांदा हुंदके द्यावयास प्रारंभ केला.

श्रीधरला यापैकी कसलीच जाणीव नव्हती. जणूं तो या मंडळीत नव्हताच. दूर कोठें तरी एकटाच होता. त्यानं मान वर केली तेव्हां त्याच्या चर्येवर अंतःकरणाला पिळवटणाऱ्या दुःखाची छाया दिसली.

डाक्टरांना कांहींच निर्णय देतां येईना. त्यांनीं एवढंच सांगितलं कीं, " यांच्या मनाला कसला तरी मोठा धक्का बसला असावा. भयंकर स्वरूपाचं वेड यांना लागण्याचा संभव आहे. यांना हॉस्पिटलमध्यें पोंचवावं हें सगळ्यांत उत्तम. घरीं ठेवून घ्यायचं असेल तर फार काळजी घेतली पाहिजे. अहोरात्र यांच्यावर नजर ठेविली पाहिजे."

श्रीधरला हॉस्पिटलमध्यें पोंचविण्यास मुक्तावहिनी आणि रत्ना कांहीं केल्या संमति देईनात. त्यांनी त्याला घरींच ठेवून घेतलं आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सगळा बंदोबस्त ठेवला. परंतु श्रीधरची स्थिति झपाट्यानं अधिकाधिक वाईटच होऊं लागली. प्रथम तो बहुतांशीं नुसता खुळ्यासारखा

अंतराळांत बघत अगदी स्तब्ध बसत असे, पण आतां ओरडणं, अंगांतले कपडे ओरबाडणं, धावणं इत्यादि गोष्टी सुरू झाल्या. " मेलेली माणसं अशीं जिवंत व्हायला लागली " इत्यादि वाक्य तो पुनः पुनः बडबडे, आणि मग डॉ· व्हॅलेंटाईनशी संभाषण सुरू करी. या प्रकाराचा कार्डीमात्रदेखील अर्थ कुणाला कळेना. डॉक्टर पुनः पुनः सांगत कीं " कसल्या तरी घटनेचा किंवा बातमीचा भयंकर धक्का बसला आहे यांच्या मनाला. "

कसला धक्का बसला असावा त्याचा कांहीं तरी तर्क करतां यावा म्हणून डॉक्टर सगळ्यांना परोपरीनं प्रश्न विचारून पहात, परंतु त्यांतून कांहीच निष्पन्न होत नसे. रत्ना तर डॉक्टरांच्या प्रश्नांना उत्तरं देतां देतां रडावयासच लागे. कारण ती मनाशी म्हणे " माझं अन् त्यांचं कांहीं बिनसलं होतं की काय अशा शंकेनं तुम्ही काय हे वेडेवेडे प्रश्न करतां ? अहो, मी आणि तो सुखाच्या ऐन शिखरावर होतों. एकमेकांच्या प्रीतीचं सुख आम्हीं कसं घेत होतों तें काय सांगूं तुम्हांला ? चांडाळा दैवा, आमचं सुख तुला पहावलं नाही काय रे ? चारच दिवसांपूर्वी केवढ्या आनंदाच्या उन्मादांत आम्हीं होतों आणि आज हे काय झालं ? " तिला हुंदके आवरेनासे होत, आणि मग शेजारी बसलेल्या मुक्तावहिनींच्या मांडीवर ती डोकं टेकून ' आई ग ' असं बडबडत राही.

श्रीधर धांवाधांव आणि ओरडा करूं लागला तेव्हां मग मात्र डॉक्टरांनी रत्ना आणि मुक्तावहिनी यांच्या विरोधाकडे लक्ष न देतां त्याची हॉस्पिटलमध्यें रवानगी केली. तेथें त्याचा विकार सारखा अधिक बळावतच गेला. तो शांत एके जागीं अगदीच राहीना. त्याचं ओरडणं धांवणं मर्यादेबाहेर गेलं. घरच्या माणसांची भेट डॉक्टरांनीं बंद करून टाकली. चोवीस तास श्रीधरवर हॉस्पिटलच्या माणसांचा पहारा सुरू झाला. पण त्या पहाऱ्यांत श्रीधर पुरता दोन दिवसही राहिला नाहीं. मार्था जिवंत आहे, आपण रत्नाशीं जें लग्न केलं तें सर्वस्वीं बेकायदेशीर आहे, तो एक गुन्हाच आहे, व आपली रखेली यापलीकडे रत्नाला दुसरा दर्जा नाहीं—या कल्पनेच्या पहिल्याच धक्क्यानं

त्याच्या मनाचा तोल जो गेला तो त्याला कधीं सावरतांच आला नाही. रत्नाच्या आयुष्याची अशी घोर विटंबना आपल्या हातून झाल्यानंतर या जगांतून आपण नाहीसं झालं पाहिजे हा एकच ध्यास त्यानं जो घेतला तो त्याचा त्यालाच अगदी अनावर होत गेला. हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनी अगदी अष्टौप्रहर पहारा ठेवला होता. परंतु जीवाला विटलेलं माणूस अशाही पहाऱ्यांतून आपली सुटका करून घेतं. श्रीधरनं अशीच स्वतःची सुटका करून घेतली ! तिसऱ्या दिवशी पहांटे त्यानं आत्महत्या केली !

# ८

‘ बस ’ कंपनीच्या व्यवहाराला आतां पुष्कळच सुरळीत आणि शिस्तीचं स्वरूप आलं होतं. पुण्यांत बस कंपनी निघायचं घाटत होतं. तेव्हां कांहीं लोकांनीं ओरडा केला होता कीं बस सुरू झाली कीं पुण्याच्या टांगेवाल्यांचा धंदा बसून ते उपाशीं मरतील. आणि उलट कांहींनीं अशी टीका केली होती, कीं मुंबईतले लोक बसचा उपयोग करतात तसा पुण्याचे लोक करतील हा हिशोब चुकीचा आहे, पुण्यांत बस लोकप्रिय व्हायची नाहीं, कंपनीला वर्षभरांत दिवाळं काढावं लागेल. परंतु आतां या दोन्ही शंका चुकीच्या ठरल्या होत्या. बस सुरू झाली, इतकंच नव्हे तर तिच्या रहदारीचे आणखी रस्ते सुरू झाले तरी टांगेवाल्यांचा धंदा अगदी सुखरूप राहिला, आणि बसची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत जाऊन पुण्याच्या वाहनांत बसचा कायमचा अंतर्भाव झाला. बसचा प्रयोग कितपत यशस्वी होतो कोण जाणे अशी शंका बस कंपनीच्या मालकांच्या मनांत प्रारंभीं होती कीं काय कोण जाणे. कदाचित् असेलही. पण असली तरी आतां मात्र ती अगदीं उरली नव्हती हें उघड दिसत होतं. धंद्याचा जम उत्तम बसल्याची खात्री पटल्यावर मालक ज्या तऱ्हेनं धंद्यांत लक्ष घालतो त्या तऱ्हेनं कंपनीची माणसं कारभारांत शक्य त्या सुधारणा करूं लागलीं होतीं. कामगारांना नोकरीची शाश्वति वाटावी यासाठीं त्यांचे प्रयत्न चालले होते, माझा पगार थोडा वाढला होता आणि कामाचे तास नीट आंखून देण्यांत आले होते.

## बस नंबर बारा

बारा नंबरच्याच बसवर अजूनही मी डयूटीला होतों. पण एकदां सकाळी आणि मग पुन्हा संध्याकाळी अशी माझ्या कामाची वांटणी झाल्यामुळें मध्यंतरी पांच सहा तास मला चांगली विश्रांति मिळे. अशा प्रकारें नियमित फुरसत मिळूं लागली तेव्हां माझ्या आवडीच्या विषयाकडे माझं लक्ष साहजिक वळलं. गोष्टी लिहिण्याची माझी हौस मी पुरवूं लागलों, आणि त्यांपैकीं बऱ्याच जरी साभार परत येत तरी कांहीं कुठेना कुठें तरी प्रसिद्ध होत. एका संपादकानं परत केलेली गोष्ट दुसऱ्याकडे खपवितां येते हेंही मला हलके हलके कळूं लागलं, आणि साभार परत आलेली गोष्ट पाकिटांतून काढावी, दुसऱ्या पाकिटांत घालावी, आणि पत्ता बदलून पुन्हां पाठवावी अशा गनिमी काव्यानं साहित्यिक आघाडीवर मी लढूं लागलों. एखादं लिखाण सगळीकडूनच परत आलं तर अखेर मी तें 'सकाळ'कडे पाठवीत असे व तें 'सुधामावशी'च्या मांडीला मांडी लावून बिनतक्रार प्रसिद्ध होत असे.

लेखनाप्रमाणेंच वाचनाचीहि हौस मी भरपूर भागवून घेऊं लागलों. महिन्याकांठीं पांच दहा रुपयांची निवडक पुस्तकं मला विकत घेतां येऊं लागली. मी ज्या मोहोल्यांत खोली घेतली होती तिथें एक बऱ्यापैकीं 'पैसा वाचनालय' होतं. दुपारीं खाणावळींत जेवण उरकावं आणि परत येतांना वाचनालयांत शिरून चांगली दीड-दोन तास बैठक मारून मराठी, इंग्रजी दैनिकं, साप्ताहिकं, मासिकं एका पैशांत वाचून काढावीं असा माझा क्रम होता.

एके दिवशीं "इलस्ट्रेटेड विकली"चा ताजा अंक हातीं घेऊन मी एकेक पान उलटूं लागलों आणि पाहतों तों एका पानावर रत्नाचा फोटो मला दिसला. जवळजवळ वर्षभरानं ती नव्हे पण तिची प्रतिमा मला दिसत होती. तेंच ते मोठाले टपोरे डोळे, तेंच नितळ कपाळ, तोच तो अतिमोहक केशभार! चर्येंत मात्र थोडासा नवीनच खेळकरपणा आल्याचा मला भास झाला. माझ्या दृष्टीस ती रोज दोन वेळां पडत असे त्या दिवसांची मला आठवण झाली, आणि जणूं प्रत्यक्ष तीच दीर्घकालानंतर भेटल्याप्रमाणें मला आनंद झाला. मी

हलकेंच स्वतःशी पुटपुटलों ‘ गुड मॉर्निंग, ’ आणि तिनंही तें म्हटल्याप्रमाणें तिचे ओठ हालल्यासारखं मला वाटलं.

फोटोंत ती एकटी नव्हती. ज्या देखण्या पुरुषाबरोबर हिंडू फिरूं लागलेली ती मला दिसली होती तोच फोटोंत तिच्याजवळ उभा होता. त्या दोघांचं लग्न झाल्याची बातमी फोटोखाली छापलेली होती. मी किती वेळ तरी त्या दोघांच्या प्रसन्न आनंदी चेहऱ्यांकडे पहात राहिलो. दोघं एकमेकाला किती अनुरूप दिसत होतीं ! माझ्या मनांत आलं रत्ना आतां सदैव सुखांत राहील.

त्या दिवशी मी विलक्षण समाधानांत होतो. रात्री देखील रत्नाचाच विषय माझ्या डोक्यांत घोळत राहिला. ज्या दिवशी ती प्रथम माझ्या दृष्टीस पडली त्या दिवसापासून तिच्याविषयींचं कांहीं एक विलक्षण सात्विक असं आकर्षण माझ्या मनांत उत्पन्न झालं होतं, आणि त्या आकर्षणाचा अनुभव मला नेहमी सुखदायक झाला होता. जवळ जवळ वर्षभरांत ती मला प्रत्यक्ष दिसली नव्हती, परंतु माझ्या कल्पनेनं ती बसमध्यें चढण्यासाठीं आल्याचा, बसल्याचा, आणि बसमधून उतरल्याचा भास मी किती वेळां तरी मुद्दाम निर्माण केला होता. एखादे वेळीं कांहीं कारणानं मन विषण्ण झालं की तिची मूर्ति मी डोळ्यांसमोर आणावी आणि तिच्या सात्विक सौंदर्याकडे पाहिलं की माझ्या मनाला प्रसन्नता वाटावी. तिच्या सुखासाठीं मी कितीदां तरी प्रार्थना केली असेन. आणि आतां खरोखरच ती सुखी झाली होती.

माझ्या मनांत एकदम आलं आपला आनंद तिला पत्रानं कां कळवूं नये ? लगेच वाटलं छे, हा काय वेडेपणा ? परंतु पुन्हा मनांत आलं त्यांत वेडेपणा तो कसला ? तिचा माझा परिचय नव्हता, फक्त थोडीशी ओळख होती, परंतु माझ्या मनांत तिच्याविषयीं ज्या भावना सतत वाढत गेल्या होत्या त्यांत मला शरम वाटण्यासारखं अगर तिला वावगं वाटण्यासारखं काय होतं ? तिच्या विवाहाच्या बातमीनं मला जो आनंद झाला तो अगदी मनापासूनचा आणि सर्वस्वी सात्विक असाच होता. मी तो तिला कळविला तर तिला तें आवडणार नाहीं असा कांहीं संभव होता काय ? तिला

कितीं तरी अभिनंदनाचीं पत्रं आलीं असतील. त्यांत असूं दे कीं माझ्यासारख्या एका सामान्य बस् कंडक्टरचं पत्र...

मला राहवेना. मी उठलों. दिव्याचं बटन ओढलं आणि लिहूं लागलों. कसलाही विचार केला नाहीं. जें जसं सुचेल तसं लिहीत गेलों. परंतु त्या लिहिण्यानं जो आनंद मला झाला तसा आनंद माझ्या गोष्टी लिहितांनादेखील मला कधी झाला नव्हता. खऱ्या जिवंत साहित्याची कसोटी मला कळली.

सकाळीं उठलों तेव्हां रात्रीं जो विचार मला शिवलाहीं नव्हता तो एकदम मनांत आला. रत्नाला मीं पत्र लिहिलं खरं, परंतु मी तें रवाना करणार कसं ? तिचा पत्ता मला कुठें माहीत होता ? किंवा तो माहीत करून घेण्याचं साधन तरी मला कुठें सांपडण्यासारखं होतं.

नंतरच्या तीन चार दिवसांत रत्नाचा पत्ता कुणाजवळून मिळवितां येईल त्याचा मी पुष्कळ विचार केला. परंतु मला कांहीं मार्ग सांपडेना. त्याबद्दल कांहीं तरी खटपट मी खचित केली असती. परंतु पांचव्या दिवशीं मला दादांची एकदम तार आली. आमच्या घरच्या एका लहानशा शेतीच्या विक्रीचा कागद तयार करावयाचा होता. त्या कागदावर माझी सही होणं अवश्य होतं. मला एकदम निघून जावं लागलं. आणि मग ते पत्र माझ्या कागदांत तसंच राहिलं. अजूनहि तें माझ्याजवळ आहे.

गांवीं गेल्यावर कामामागून कामं निघालीं. पुढें दादा आजारी पडले. आणि तीन चार महिने मला तिकडेच रहावं लागलं. पुण्यास परत आलों तो अशा भीतीनं कीं आतां बहुधा दुसरी नोकरी पहावी लागणार. परंतु कंपनीचे लोक माझ्या कामावर खुष होते. माझी दोन महिन्यांची बिनपगारी रजा समजून इन्स्पेक्टरची एक जागा रिकामी होती ती त्यांनीं मला देऊं केली. पांच–दहा रुपये जास्तच पगार मला मिळणार होता. पण मीं म्हटलं, मला हें काम नको, बारा नंबरच्या बसवरच्या कंडक्टरचं माझं पूर्वीचं कामच मला

द्या. मला त्यांनीं वेड्यांत काढलं. पण त्याची मला पर्वा नव्हती. मला तें पूर्वीचंच काम हवं होतं. मनाला उगीचच आशा वाटे कीं त्या बसवर काम करीत असतांना रत्ना केव्हां तरी आपल्याका दिसेल...

आणि सुमारे एक महिन्यानंतर ती खरोखरच माझ्या दृष्टीस पडली !

एके दिवशीं सकाळीं सहा वाजून वीस मिनिटांनीं बस हिराबागेच्या कोपऱ्यावर उभी राहिली, आणि पाहतों तों त्या ठिकाणीं बसमध्यें चढण्यासाठीं रत्ना उभी होती.

अरुणोदय नुकताच झाला होता. दिशा धड उजळल्या नव्हत्या. जो उजेड होता तो पूर्वेकडचा कीं पश्चिमेकडे क्षितिजावर जवळजवळ टेकलेल्या चंद्राचा तें सांगतां येण्यासारखं नव्हतं. त्या उजेडांत रत्नाला मी ताबडतोब ओळखलं. परंतु मला वाटलं हा भास तर होत नाहींना ? तथापि तो भास नव्हता. खरोखरच रत्ना खालीं रस्त्यावर उभी होती. पांढरं स्वच्छ पातळ ती नेसली होती. तिच्या हातांत छोटी कातड्याची बॅग होती. 'गुड मॉर्निंग' असं मीं म्हटलं. परंतु लगेच मनांत आलं आपण हें बरोबर केलं कीं नाहीं कुणास ठाऊक ? तिनं उलट ' गुड मॉर्निंग ' म्हटलं नाहीं तेव्हां मला अगदीं ओशाळल्यासारखं झालं. आणि ती चढून बसली, गाडी सुरू झाली, व मी तिच्याजवळ गेलों त्याबरोबर माझ्या हृदयाचा थरकांप उडाला ! तिचं कपाळ पांढरं स्वच्छ होतं ! त्यावर कुंकुमतिलक नव्हता !...हायरे दैवा ! हें मी काय पहात होतों ! रत्नापुढें उभं राहण्याऐवजीं जागच्याजागीं जळून भस्म व्हावसं मला वाटलं ! जीवनांतल्या सौंदर्याच्या, सुखाच्या, न्यायाच्या शाश्वतीवरची माझी सारी श्रद्धा त्या एका क्षणांत भग्न झाली ! मी परत आपल्या जागीं आलों अन् डोळे घट्ट मिटून दाराला टेकून उभा राहिलों.

बस नेहमीप्रमाणें डोलत हेलकावे खात वेगांत चालली होती !

**समाप्त.**

## आमचें प्रकाशन

**प्रो. ना. सी. फडके**

वादळ
प्रतिज्ञा
प्रवासी
इंद्रधनुष्य
समरभूमि
वेचलेले मोती
गुजगोष्टी
धूम्रवलयें
आधुनिक गीता
नव्या गुजगोष्टी
अखेरचं बंड
(कमला प्रकाशन)

**ग. त्र्यं. माडखोलकर**

भंगलेलें देऊळ

**श्री. रा. ना. नातू**

पाऊलवाट [काव्य]

**श्री. द. वि. कीर्तने**

पवित्र प्रेम

**अ. ह. जोशी**

अनंत काळचे प्रवासी

**श्री. वि. स. खांडेकर**

सूर्यकमळें

**अनंत काणेकर**

शिंपले आणि मोती
चांदरात

**प्रो. भा. ल. पाटणकर**

बालकवींची समग्र कविता

**श्री. भा. वि. वरेरकर**

षोडशी
उघडझांप

**सौ कुमुदिनी प्रभावळकर**

स्त्रियांच्या कुबड्या
[स्त्रियांसाठी नाटिका]

**श्री. मा. कृ. शिंदे**

अर्थाचा अनर्थ [नाटिका]

**श्री. वि. श्री. मोडक**

बोलविता धनी

**— आगामी —**

'**गुजगोष्टी**' (३ री आवृत्ति)
'**एकदाच !**' सौ. कमला फडके एम्. ए.
'**कलंकशोभा**' प्रो. ना. सी. फडके
(२ री आवृत्ति)
'**पुन्हां केव्हांतरी**' श्री. वि. श्री. मोडक

**रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव मुंबई ४**

**कमला प्रकाशन खालील पुस्तकें यथावकाश सादर करील—**

| | |
|---|---|
| आशा | ( २ री आवृत्ति ) |
| उद्धार | ( ,, ) |
| मनोहरची आकाशवाणी | ( ,, ) |
| अटकेपार | ( ,, ) |
| निरंजन | ( ,, ) |
| अबोलीच्या गोष्टी-प्रो. फडके | |
| कम्युनिझम | |

? ( कादंबरी ) दत्तू बांदेकर

---

**शृंगार-करुण रसांनीं ओथबलेलें**

**प्रो. ना. सी. फडके**

यांचे

**सामाजिक संगीत नाटक**

# संजीवन

( फोटोंसह )

**सर्वत्र मिळतें.**

---

**प्रो. ना. सी. फडकेकृत**

# तोतया नाटककार

शंभर टक्के विनोदी, वाक्यागणिक टाळ्या घेणारे

उच्च दर्जाचें नाटक

**किंमत १२ आणे**

**सर्वत्र मिळतें.**

संमेलनप्रसंगीं करावयास सर्वथैव योग्य

प्रो. ना. सी. फडके

यांच्या

तीन कलात्मक, उद्‌बोधक एकांकी नाटिका

## १. आगलावी

किं. ४ आणे

## २. जडावाची देवी

( २ री आवृत्ति )

किं. ६ आणे

## ३. क्षमेसाठीं अपराध

किं. ४ आणे

सर्वत्र मिळतात.